couch puffy
THE BIG MONSOON SALE FLAT 50% OFF
ON DISPLAY / LAST PIECE
BUY 1 GET 1 FREE On Home Decor
B5, ड्रिम्झलँड, अमरावती | 99300-94691 8585-9552-85


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार १९ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४


पूनम इलेक्ट्रॉनिक्स & फर्निचर
फ्रीज, इन्वर्टर, मिक्सर, ओवन, टीव्ही, फ्रीज, वॉशिंग मशिन, अलमारी, सोफा, बेड
COMPANY DEALER: SAMSUNG Godrej Panasonic
ALSO AVAILABLE: LG Haier INTEX
मोती नगर, अमरावती. 0721-2540397 | 99216-02388

# सहनशक्तीची परीक्षा घेउ नका-अण्णांनी मौन सोडले

## सोनम वांगचुक यांच्या उपोषणावर मोठे विधान, केंद्राला केले आवाहन



**मुंबई/प्रतिनिधी :** सोनम वांगचुक यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी उपोषण सुरू करून २१ दिवस झाले आहेत. आज २१ व्या दिवशी केंद्र सरकारने त्यांना बळजबरीने आंदोलन स्थळावरून उचलून रुग्णालयात दाखल केले, असा आरोप करण्यात येत आहे. शांततेच्या मार्गाने सुरू असलेल्या आंदोलनावर सरकारची दडपशाही सुरू असल्याचा आरोप करत आता कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषण सुरू केले आहे. दरम्यान आता २० दिवसांपासून मौन बाळगून असलेल्या अण्णा हजारेंनीही या आंदोलनावर भूमिका मांडली आहे.अण्णा हजारे यांनी पीटीआय वृत्तसंस्थेशी संवाद साधताना सोनम वांगचुक यांच्या आंदोलनावर भाष्य केले. सरकारने वांगचुक यांच्या सहनशक्तीची परीक्षा घेउ नये. त्यांच्या मागण्यांवर हो किंवा नाही, असे उत्तर द्यावे. किमान चर्चा करण्यात तरी काय हरकत आहे?, अशी प्रतिक्रिया अण्णा हजारे यांनी दिली आहे.

शनिवारी सकाळी जंतर-मंतर येथे साध्या वेषात आलेल्या पोलिसांनी आंदोलकांची दिशाभूल करून सोनम वांगचुक यांना उचलून दिल्लीच्या सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. मात्र रुग्णालयातही आपण अन्नग्रहण किंवा इतर औषधे घेणार नसून उपोषणावर ठाम राहणार असल्याचा संदेश सोनम वांगचुक यांनी आपल्या पत्नीच्या माध्यमातून दिला.अण्णा हजारे माध्यमांना प्रतिक्रिया देताना म्हणाले, सोनम वांगचुक उपोषण करत असताना त्यांना उचलून रुग्णालयात दाखल केले गेले. सलोख्याने प्रश्न सुटत असतात. चर्चेविना प्रश्न सुटणार नाहीत. चर्चा करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करायला हवा. सरकारने सामंजस्याने प्रश्न सोडवावेत. बळजबरी केली तर परिस्थिती बिकट होते. काँग्रेसप्रणीत सरकार केंद्रात असताना लोकपाल कायद्याच्या मागणीसाठी अण्णा हजारे यांनी २०११ साली दिल्लीत उपोषण केले होते. ११ दिवस चाललेल्या या उपोषणाची दखल तेव्हाच्या काँग्रेस सरकारने घेतली होती. तसेच आंदोलकांशी चर्चाही केली होती. मात्र सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाकडे सरकारने सपशेल दुर्लक्ष केले असून ते दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप विरोधकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे शांत का आहेत? असाही प्रश्न उपस्थित होत होता. त्यामुळे त्यांचे विधान महत्त्वाचे ठरते. देशात लोकशाही संपवून हुकूमशाही सुरू झाली आहे. आपली चूक मान्य करूनही केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान राजीनामा का देत नाहीत. सत्ता ही सत्तेसाठी नसून जनतेसाठी असते, हे सरकारने विसरू नये, अशा शब्दांत काँग्रेसचे विधानपरिषदेचे गटनेते आमदार सतेज पाटील यांनी केंद्र व राज्य सरकारवर टीका केली होती. तसेच ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी अपेक्षा त्यांनी आज कोल्हापूर येथील आंदोलनात व्यक्त केली होती.

### जबरदस्तीने उपचार नकोत : पत्नी गीतांजली

**नवी दिल्ली :** 'नीट' परीक्षा पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी जंतरमंतर येथे बेमुदत उपोषणाला बसलेले प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि आंदोलक



सोनम वांगचुक यांना आज पहाटे प्रशासनाने उपोषणस्थळावरून सफदरजंग रुग्णालयात दाखल केले. या पार्श्वभूमीवर, आमच्या कुटुंबाच्या आणि गेल्या २० दिवसांपासून त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणा-या डॉक्टरांच्या संमतीशिवाय सोनम वांगचुक यांना तोंडावाटे किंवा शिरेवाटे कोणतेही औषध वा उपचार दिले जाउ नयेत, अशी मागणी वांगचुक यांच्या पत्नी गीतांजली जे. अंगमो यांनी केंद्र सरकारकडे केली आहे. गीतांजली जे. अंगमो यांनी एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, मी दिल्लीतील सफदरजंग रुग्णालयात आहे. येथे सोनम वांगचुक यांना दाखल करण्यात आले आहे. माझ्या, त्यांच्या कुटुंबाच्या आणि गेल्या २० दिवसांपासून त्यांच्या आरोग्यावर लक्ष ठेवणा-या डॉक्टरांच्या संमतीशिवाय त्यांना तोंडावाटे किंवा शिरेवाटे कोणतेही औषध किंवा उपचार दिले जाउ नयेत.सोनम वांगचुक यांची शुक्रवारी (दि. १८) प्रकृती ठीक होती. त्यांना रुग्णालयात आणण्याची काहीच गरज नव्हती. कलम ३२ अन्वये हा माझा अधिकार आहे, असेही त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# राम मंदीर काय तुमच्या बापाची जहागिरदारी नाही

## राम मंदिर चोरी प्रकरणावरून उद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल

**नागपूर/प्रतिनिधी :** अयोध्येतील राम मंदिरातील कथित चोरी प्रकरणाच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज नागपुरात रामरक्षा पठण आंदोलन केले. यापूर्वी त्यांनी दादर आणि ठाणे येथेही अशाच प्रकारचे आंदोलन केले होते. नागपुरातील या आंदोलनाला ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिका-यांनी मोठी उपस्थिती लावली. यावेळी ठाकरेंनी भाजपवर जोरदार टीका केली. उत्तर प्रदेश विधानसभा अध्यक्ष म्हणतात की ज्यांनी श्रद्धेने पैसे दिले नाहीत ते चोरीला गेले. यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, राम मंदीर तुमच्या बापाची जहागिरदारी नाही. आता भाजपा मुक्त राम या आंदोलनाची सुरुवात आहे. राम भक्तांच्या श्रद्धेवर हा दरोडा असल्याचे ठाकरे म्हणाले. अटल बिहारी वाजपेयी म्हटले होते अभी हिंदू मार नही खायेगा, आता हिंदू उनको माफ नही करेगी अशी भुमिका घेतली पाहिजे असे ठाकरे म्हणाले.



तरुणांना न्याय देणं हेच आमचं हिंदू राष्ट्र आहे. भागवत साहेब तुम्ही म्हणाले की दोन तीन अपत्य जन्माला घाला. पेपर फुटले ती मुलं आपली नाही का? असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला. बाबरी मशिद पाडली त्यावेळी बाळासाहेब एकटे उभे होते. भाजपवाले म्हणत होते की हे शिवसेनेचं काम असेल. बाळासाहेब यांनी ते अंगावर घेतले. अनेकांनी बलिदान केले ते या चोरांच्या पोटापाण्यासाठी नाही, राम मंदीर लुटारुंच्या विरोधात आम्ही आहोत. वर्गाच्या म?नीटरसारखं बोलू नका रामरक्षा बोलून दाखवा केदारनाथ मंदीरात चोरी झाली आहे असे ठाकरे म्हणाले.

गद्दारांनांही मला विचारायचं आहे की, तुमच्यात हिंमत आहे तर प्रश्न विचारावा. यांच्यात दम राहिला नाही. हे लाचार आहेत. भाजपने दगाबाजी केली म्हणून महाविकास आघाडी स्थापन केल्याचे ठाकरे म्हणाले. त्यावेळी हिंदुत्व सोडलं अशी टीका केली. मग तुम्ही का आता सोडलं? असा सवाल ठाकरेंनी केला.

राम मंदिर चोरीबाबतीत चौकशीची नाटक करु नका- राम मंदिर चोरीबाबतीत चौकशीची नाटक करु नका. निवृत्त न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करा. काही ही बोललं तर देशद्रोही ठरवतात असे ठाकरे म्हणाले. उत्तर प्रदेश विधानसभा अध्यक्ष म्हणतात की ज्यांनी श्रद्धेने पैसे दिले नाही ते चोरीला गेले आमचे तसेच आहे. राम मंदीर तुमच्या बापाची जहागिरदारी नाही असेही ठाकरे म्हणाले. राम भक्तांच्या बाजूला आहात की मंदीर चोरांच्या बाजूला आहात हे मोहन भागवत यांनी स्पष्ट करावं .मला रामरक्षा येत नसेल पण मला रामाची रक्षा करता येते. चोराहो मध्ये येउ नका. राम भक्तांच्या बाजूला आहात की मंदीर चोरांच्या बाजूला आहात हे मोहन भागवत यांनी स्पष्ट करावं असे ठाकरे म्हणाले. मी अनेक राज्यांत जाणार आहे. गावोगावी हा लढा नेला पाहिजे. शेतकरी कर्ज मुक्ती झाली नाही. लाडकी बहिण योजनेतील ९२ लाख महिला बंद केल्या. महिलांना मिळणा-या साड्या बंद केल्या अशी टीका ठाकरेंनी राज्य सरकारवर केली. सोनम वांगचुक आणि अभिजीत दिपके यांना समर्थन देण्यासाठी उद्या आंदोलन करणार असल्याचे ठाकरे म्हणाले. मी पहिल आंदोलन करेल आणि त्यांना नंतर दिल्लीत जाउन भेटेल असेही ठाकरे म्हणाले. सर्व पक्षांना मी उद्याच्या आंदोलनात आमंत्रित करतो. देशासाठी या आंदोलनात सहभागी व्हा असेही ठाकरे म्हणाले.

# ज्येष्ठ समाजवादी नेते, माजी आमदार डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन

**पुणे/प्रतिनिधी :** ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, ८५ व्या वर्षी त्यांनी अखरेचा श्वास घेतला. त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. विधिमंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले असून आपल्या कार्याची वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनानंतर समाजावादी विचारवंत, पत्रकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. कुमार सप्तर्षी यांचा मुलगा कबीर सप्तर्षी इंग्लंडहून आल्यानंतर सोमवारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील, अशी माहिती निकटवर्तीयांनी दिली. सोमवारी सकाळी दहा ते बारा वाजेपर्यंत त्यांचं पार्थिव अंत्यदर्शनासाठी कोथरुडमधील गांधी भवन इथं ठेवलं जाईल, त्यानंतर अंत्यसंस्कार होतील, अशी देखील माहिती संबंधितांनी दिली. दरम्यान, आमदार रोहित पवार यांनी कुमार सप्तर्षी यांना सोशल मीडियातून श्रद्धांजली वाहिली आहे.



ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. डा. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. आज समाज एका विचित्र परिस्थितीतून मार्गक्रमण करत असताना, द्वेष, हिंसा, आर्थिक विषमता यासारख्या प्रवृत्ती बळावत असताना ग्रामीण विकासाचा, मानवतेचा आणि गांधीवादाचा विचार घेउन चालणारे डॉ. कुमार सप्तर्षी सरांसारखे व्यक्तिमत्व आपल्यातून जाणे ही मोठी हानी आहे. विधानपरिषदेचे सदस्य म्हणून त्यांनी सभागृहात उमटवलेली छाप आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर केलेला संघर्ष कायम स्मरणात राहील. त्यांच्या माध्यमातून गांधी विचारांचा एक सच्चा पाईक आपल्यातून निघून गेला, माझी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! असे ट्विट रोहित पवार यांनी केले आहे. दरम्यान, कुमार सप्तर्षी हे विद्यार्थी दशेपासूनच चळवळीशी जोडले गेले होते. आपल्या सामाजिक व राजकीय आयुष्यात त्यांनी अनेक आंदोलने केली. तर, ९ ऑगस्ट १९७७ रोजी चंद्रशेखरजी यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्षात कुमार सप्तर्षी यांनी प्रवेश केला होता. त्यानंतर, जनता पक्षातर्फे १९७८ साली ते अहमदनगरमधून आमदार बनले होते.

# भारताची अंतराळात ऐतिहासिक झेप!

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** भारतीय अंतराळ संशोधनाच्या इतिहासात आजचा दिवस एका नव्या सुवर्णयुगाची सुरुवात करणारा ठरला आहे. भारताने आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून आपले पहिले खासगी कक्षीय रॉकेट विक्रम-१ यशस्वीरीत्या अंतराळात झेपावून इतिहास रचला आहे. हैदराबादस्थित आघाडीचे अंतराळ स्टार्टअप स्कायरूट एरोस्पेस द्वारे विकसित केलेल्या या राकेटच्या पहिल्या मोहिमेला मिशन आगमन असे नाव देण्यात आले आहे. या यशस्वी प्रक्षेपणामुळे आता भारताचा समावेश जगातील अशा मोजक्या देशांमध्ये झाला आहे, ज्यांच्याकडे खाजगी क्षेत्रात स्वतःचे रॉकेट प्रक्षेपित करण्याची क्षमता आहे.

शनिवारी सकाळी ११:३० वाजता श्रीहरिकोटाच्या पहिल्या लॉन्च पॅडवरून या ७ मजली उंच राकेटने धगधगत्या आगीच्या ज्वाळांसह निळ्या आकाशात झेप घेतली. हे प्रक्षेपण केवळ एका खासगी कंपनीचे यश नाही, तर भारताच्या अंतराळ क्षेत्रातील एक मोठी वैचारिक क्रांती आहे. आतापर्यंत अंतराळ मोहिमा ही केवळ सरकारी यंत्रणा म्हणजेच इस्रोची मक्तेदारी मानली जात होती. मात्र, या प्रक्षेपणाने भारताने उद्योग-चलित अंतराळ युगात अधिकृतपणे प्रवेश केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मोहिमेचे कौतुक करताना याला भारताच्या अंतराळ प्रवासातील एक ऐतिहासिक नवीन सीमा असे म्हटले आहे.

मिशन आगमन अंतर्गत हे राकेट पृथ्वीच्या खालच्या कक्षेत अंदाजे ४५० किलोमीटर उंचीवर उपग्रह स्थापित करण्यासाठी पाठवण्यात आले आहे. मात्र, ही मोहीम केवळ उपग्रह सोडण्यापुरती मर्यादित नाही, तर ती भविष्यातील एका मोठ्या जागतिक समस्येवर उपाय शोधण्याचे काम करत आहे. विक्रम-१ आपल्यासोबत एम्ब्रेस नावाची एक अत्यंत महत्त्वाची उप-मोहीम घेउन गेले आहे. यामध्ये रोबोटिक आर्म तंत्रज्ञानाचा वापर करून अवकाशात फिरणारा धोकादायक कचरा नष्ट करण्याचे किंवा बाजूला करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले जाणार आहे. भारतातील कोणत्याही खाजगी क्षेत्राद्वारे आयोजित केलेली ही अशा प्रकारची पहिलीच धाडसी चाचणी आहे. याशिवाय यात ग्रहा स्पेस आणि कास्मोसर्क्ह सारख्या कंपन्यांचे तंत्रज्ञान प्रात्यक्षिक पेलोड्स देखील समाविष्ट आहेत.



**अंतराळात जाणारा सोन्याचा हिरा!**

ही अंतराळ मोहीम तांत्रिकदृष्ट्या जितकी प्रगत आहे, तितकीच ती सांस्कृतिक आणि भावनिकदृष्ट्याही खास आहे. विक्रम-१ राकेटचे नाव भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक डॉ. विक्रम साराभाई यांच्या सन्मानार्थ ठेवण्यात आले आहे. त्यांच्या दूरदृष्टीला मानवंदना देण्यासाठी स्कायरूटने आपल्या पहिल्या राकेटला हे नाव दिले. या रॉकेटच्या आत एक लहान सोनेरी कॅप्सूल ठेवण्यात आली आहे, ज्यामध्ये भारताचे महान शास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई, सर सी. व्ही. रमण आणि मिसाईल मॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या अतिसूक्ष्म मूर्ती ठेवण्यात आल्या आहेत.

**अमेरिका, चीननंतरचा भारत तिसरा देश-** या मोहिमेला मिशन आगमन असे नाव देण्यात आले होते. विक्रम-१ला आंध्र प्रदेशमधील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातील प्रक्षेपण स्थळावरून यशस्वीरीत्या प्रक्षेपित करण्यात आले. भारतातील कुठल्याही खाजगी कंपनीने स्वतः विकसित केलेल्या ऑर्बिटल राकेटच्या माध्यमातून कृत्रिम उपग्रहांना स्थापित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. याबरोबरच खाजगी एअरोस्पेस कंपनीने यशस्वीरीत्या राकेट प्रक्षेपित करणारा भारत हा अमेरिका आणि चीननंतरचा तिसरा देश बनला आहे.

# 6 बंडखोर खासदारांच्या शिंदे सेनेतील विलिनीकरणाला लोकसभा अध्यक्षांची मंजुरी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राज्याच्या राजकारणात मागील काही दिवसांपासून मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या ६ खासदारांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, भाउसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील, संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर या खासदारांचा यामध्ये समावेश आहे.या ६ खासदारांनी शिंदेंच्या सेनेत प्रवेश केल्यामुळे ऑपरेशन टायगर यशस्वी झाल्याचा दावा शिंदेंच्या सेनेकडून केला जातो. मात्र, या ६ खासदारांच्या फुटीमुळे उद्धव ठाकरे यांना मोठा धक्का बसल्याचं बोललं जात होतं. या सर्व घडामोडीवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच आता आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून फुटून शिंदेंच्या सेनेत प्रवेश केलेल्या ६ बंडखोर खासदारांच्या शिंदे सेनेतील विलिनीकरणा लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा आणखी एक मोठा धक्का मानला जात आहे. दरम्यान,





ठाकरेंच्या शिवसेनेमधून फुटून शिंदेंच्या सेनेत गेलेल्या या ६ बंडखोर खासदारांची खासदारकी जाणार असल्याचा दावा सातत्याने शिवसेना (ठाकरे) पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात येत होता. त्या संदर्भात ठाकरे गटाने कायदेशीर पावलं टाकण्यास सुरू वातही केली होती असंही सांगितलं जात होतं. मात्र, असं असतानाच आज (१८ जुलै) लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शिवसेना (ठाकरे) पक्षातील ६ खासदारांच्या शिवसेना (शिंदे) पक्षात विलीनीकरणास मान्यता दिली असल्याची माहिती लोकसभा सचिवालयाने दिली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेमधून फुटून शिंदेंच्या सेनेत प्रवेश केलेल्या या ६ खासदारांच्या शिवसेना (शिंदे) पक्षात विलीनीकरणास लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिल्यामुळे आता हे ६ खासदार शिंदेंच्या सेनेचा अधिकृत भाग असणार आहेत. तसेच या निर्णयामुळे आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची लोकसभेतील खासदारांची संख्या वाढली आहे.

# 71वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार- शाहरुख प्रथमच बेस्ट ॲक्टर

## 'श्यामची आई' सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट, नाळ-2 चा भार्गव सर्वोत्कृष्ट बाल कलाकार







**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीत ७१ व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. शाहरुख खानला 'जवान' चित्रपटासाठी आणि विक्रांत मेस्सीला '१२ th फेल' चित्रपटासाठी संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला आहे. मराठी चित्रपटांसाठी 'श्यामची आई' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. त्यासोबतच नाळ-२ चित्रपटातील भार्गव जगतापला सर्वोत्कृष्ट बाल कलाकाराचा पुरस्कार मिळाला आहे. राणी मुखर्जीला 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नार्वे' चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला आहे. कटहलला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार देण्यात आला आहे. 'सिर्फ एक बंदा काफी है' या हिंदी चित्रपटाला सर्वोत्कृष्ट संवादाचा पुरस्कार मिळाला आहे. या चित्रपटाचे संवाद दीपक किंगराणी यांनी लिहिले आहेत. ७१ व्या राष्ट्रीय पुरस्कारात, शाहरुख खान आणि विक्रांत मेस्सी यांना संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे. शाहरुखला त्याच्या 'जवान' चित्रपटासाठी आणि विक्रांतला '१२ th फेल' चित्रपटासाठी हा पुरस्कार मिळाला आहे. 'जवान' हा एक ॲक्शन थ्रिलर चित्रपट होता. या चित्रपटात शाहरुख दुहेरी भूमिकेत दिसला होता. दुसरीकडे, विक्रांतचा चित्रपट एक चरित्रात्मक नाटक होता. हा चित्रपट आयपीएस अधिकारी मनोज कुमार शर्मा आणि त्यांची पत्नी आयआरएस अधिकारी श्रद्धा जोशी यांच्या जीवनावर आधारित होता.





**राणी मुखर्जी यांनाही पहिल्यांदाच हा पुरस्कार मिळाला आहे**

राणी मुखर्जीचा २५ वर्षांच्या कारकिर्दीतील हा पहिलाच राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आहे. तिचा 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नार्वे' हा चित्रपट एका सत्य घटनेवर आधारित कायदेशीर नाटक आहे. हा चित्रपट साफ्टवेअर इंजिनियर सागरिका चक्रवर्ती यांच्या 'द जर्नी ऑफ अ मदर' या आत्मचरित्रापासून प्रेरित आहे. आशिमा चिब्बर दिग्दर्शित या चित्रपटात राणीने सागरिकाची भूमिका साकारली आहे. २०११ मध्ये, जेव्हा सागरिका तिचा पती अनुरूप भट्टाचार्यसोबत नार्वेमध्ये राहत होती, तेव्हा तिच्या मुलांना नार्वेजियन अधिका-यांनी काढून घेतले. सागरिका तिच्या मुलांच्या ताब्यासाठी न?र्वेजियन सरकारशी लढते. तो प्रवास चित्रपटात दाखवण्यात आला आहे. कटहलला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार देण्यात आला आहे.आदित्य धर यांच्या 'आर्टिकल ३७०' चित्रपटाला शनिवारी ७२व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये २०२४ वर्षातील सर्वोत्कृष्ट फीचर फिल्मचा पुरस्कार मिळाला. तर, 'श्रीकांत' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आणि यामी गौतमला प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार देण्यात आला. त्याचबरोबर, 'ब्रमायुगम'साठी मम्मूटी आणि 'चंदू चॅम्पियन'साठी कार्तिक आर्यन यांना संयुक्तपणे प्रमुख भूमिकेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार देण्यात आला. घोषित विजेत्यांमध्ये तमिळ चित्रपट 'रायन'ला सर्वोत्कृष्ट तमिळ चित्रपट, 'कमेटी कुर्रोल्लू'ला सर्वोत्कृष्ट तेलुगु चित्रपट, 'लाहरी'ला सर्वोत्कृष्ट ओडिया चित्रपट, 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी'ला सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट आणि 'सुनीता'ला सर्वोत्कृष्ट मणिपुरी चित्रपटाचा पुरस्कार मिळाला.

सबसे सस्ते 3 दिन
दि. 17 18 19 जुलै
शुक्रवार | शनिवार | रविवार
फ्रेश स्टॉक
डायरेक्ट फॅक्टरी सेल
आराधना®
होलसेल शॉपिंग मॉल
बनारसी शालू • डिझायनर साड्या • घागरा ओढनी • सलवार सुट
ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सँडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. ✆ 2574594
L -2, बिझीलँड, नांदगावपेठ, अमरावती.

# १० वरिल उर्वरित

## अकोल्यात बनावट नोटांचे रॅकेट

खऱ्या नोटांप्रमाणे वापरण्यासाठी रेल्वे गेट परिसरातून जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर तिची खातरजमा करण्यात आली. त्यानंतर ही माहिती पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांना देण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने विशेष पथक तयार करून कारवाईचे नियोजन करण्यात आले.पोलीस अधीक्षक अर्चित चांडक व अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वाखाली गुडधी परिसरातील आलियाबाद रोडवर सापळा रचण्यात आला. संशयित व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव चंदन भीमराव घांडोरे (वय ४३, रा. गुडधी) असे सांगितले. त्याच्या अंगझडतीत ५०० रुपयांच्या २१ नोटा आढळून आल्या. पंचांसमक्ष तपासणी केली असता त्या भारतीय चलनातील बनावट नोटा असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी नोटा जप्त करून आरोपीला अटक केली.चंदन घांडोरे याच्याकडे सापडलेल्या नोटा कुठून मिळाल्या याची चौकशी केली असता त्याने त्या जहीरोद्दीन जबीरोद्दीन (रा. पठाणपुरा, मुर्तिजापूर) याच्याकडून घेतल्याची कबुली दिली. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तातडीने मुर्तिजापूर येथे रवाना झाले. आसरा फाटा चौकात सापळा रचून जहीरोद्दीनला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या अंगझडतीत ५०० रुपयांच्या १७३ बनावट नोटा आढळून आल्या. या नोटांची किंमत ८६ हजार ५०० रुपये असून त्या देखील जप्त करण्यात आल्या.जहीरोद्दीन याच्याकडे चौकशी केली असता त्याने या नोटा विठ्ठल संजय वारोकार (वय ३५, रा. गुडधी) याच्याकडून घेतल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी विठ्ठल वारोकार यालाही ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान विठ्ठल वारोकार याने या बनावट नोटा बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील एका व्यक्तीकडून आणल्याची माहिती दिली. त्यामुळे या बनावट नोटांच्या पुरवठ्यामागे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा संशय अधिक बळावला असून डोणगावसह इतर ठिकाणी तपास सुरू करण्यात आला आहे.प्राथमिक तपासात आरोपी या बनावट नोटा बाजारात खऱ्या नोटांप्रमाणे वापरण्याच्या तयारीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने वेळीच कारवाई केल्यामुळे या बनावट नोटा बाजारात चलनात येण्यापूर्वीच जप्त करण्यात यश आले. त्यामुळे मोठ्या आर्थिक फसवणुकीचा धोका टळल्याचे पोलिसांनी सांगितले.या प्रकरणी चंदन भीमराव घांडोरे, जहीरोद्दीन जबीरोद्दीन आणि विठ्ठल संजय वारोकार या तिघांविरुद्ध सिव्हील लाईन पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १८० व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट नोटा तयार करणारे, त्यांचा पुरवठा करणारे तसेच या रॅकेटमागील मुख्य सूत्रधारांचा शोध सिव्हील लाईन पोलीस घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात पार पडली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, अब्दुल माजीद, महेंद्र मलिये, रवी खंडारे, किशोर सोनोने, भास्कर धोत्रे, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, श्रीकांत पातोंड, अमोल दिपके, आकाश मानकर, अभिषेक पाठक, राज चंदेल, धिरज वानखेडे, कमलेश धर्माधिकारी, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी सहभाग घेतला.

## अमरावतीच्या तरुणीची नाशिकमध्ये

करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. मृत तरुणीचे नाव वैष्णवी आवारे (वय २०, रा. अमरावती) असे असून, संशयिताचे नाव साहिल अशोक लाव्हारे (वय २३, रा. यवतमाळ) असे आहे. दोघांमध्ये गेल्या काही वर्षांपासून प्रेमसंबंध होते. ते काही काळ एकत्र 'लिव्ह-इन रिलेशनशिप'मध्ये राहत होते. मात्र, काही कारणांमुळे त्यांच्यात वाद झाल्यानंतर वैष्णवी सुमारे पंधरा दिवसांपूर्वी साहिलला न सांगता नाशिकला आली होती. येथे ती इंदिरानगर परिसरातील एका रो-हाऊसमध्ये 'पेइंग गेस्ट' म्हणून राहत होती.नाशिक मध्ये आल्यानंतर तिच्या नातेवाईकांनी सिडको परिसरातील एका युवका सोबत तिचे लग्न ठरविले होते. याची माहिती मिळाल्यानंतर साहिल तीन दिवसांपूर्वी नाशिकमध्ये आला होता. तो वैष्णवीचा शोध घेत होता. शुक्रवारी रात्री इंदिरानगर येथील रथचक्र परिसरातील उद्यानात वैष्णवी तिच्या मैत्रिणी सोबत गप्पा मारत असताना साहिल तेथे पोहोचला. त्याने वैष्णवीला लग्नाबाबत जाब विचारत पुन्हा अमरावतीला सोबत चल, असा आग्रह धरला. मात्र, वैष्णवीने त्यास स्पष्ट नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या साहिलने सोबत आणलेल्या धारदार शस्त्राने वैष्णवीच्या गळ्यावर वार केला. गंभीर जखमी झालेल्या वैष्णवीला मदत करण्यासाठी तिच्या मैत्रिणीने आरडाओरडा केला. परिसरातील नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिल्यानंतर इंदिरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीच्या आधारे आरोपीचा शोध सुरू करण्यात आला. मात्र, गळ्यावर झालेल्या गंभीर वारामुळे वैष्णवीचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तिचा मृतदेह शव विच्छेदनासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. घटनास्थळी गुन्हे शाखा आणि न्याय वैद्यक प्रयोग शाळेच्या पथकानेही पाहणी करून पुरावे संकलित केले.

## आफाक शेख हत्याकांडातील

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रुक्मिणी नगर परिसरात जुन्या वैमनस्यातून २४ वर्षीय आफाक शेख अखिल शेख याची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर सर्व आरोपी फरार झाले होते. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आरोपींची ओळख पटवून दोन अल्पवयीन मुलांसह मयूर उर्फ 'माया' (वय १८) याला ताब्यात घेतले होते. मात्र, हल्ल्याचा मुख्य सूत्रधार 'रामा' पोलिसांना हुलकावणी देत फरार होता. दरम्यान, अपघातात गंभीर जखमी झाल्यानंतर 'रामा'ला रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्या सुरक्षेसाठी विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. रुग्णालय परिसराचे अक्षरशः पोलीस छावणीत रूपांतर झाले आहे.या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या मयूर कुराडे याला न्यायालयाने २० जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. शुक्रवारी सायंकाळी फ्रेजरपुरा पोलिसांनी कडेकोट बंदोबस्तात आरोपीला चीचफैल परिसरातील मुख्य आरोपी 'रामा'च्या घराजवळ नेऊन तपास केला. पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या कारवाईत न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) पथकही उपस्थित होते. सुमारे दोन तास चाललेल्या या कारवाईदरम्यान आरोपीच्या निशाणीदाखल हत्येत वापरण्यात आलेले साहित्य आणि अन्य महत्त्वाचे पुरावे जप्त करण्यात आले. पोलिसांच्या हाती काही महत्त्वाचे धागेदोरे आणि पुरावे लागले असून त्यांची फॉरेन्सिक तपासणी केली जाणार आहे. या तपासाच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## उधारीच्या वादातून ट्रक

ओळख उमेश गौरीशंकर मिश्रा (वय ५२, रा. म्हाडा कॉलनी, चंद्रपूर) अशी पटली. त्यानंतर मोर्शी पोलीस ठाण्यात मर्ग दाखल करून सखोल तपास सुरू करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी स्थानिक गुन्हे शाखेसह १० विशेष तपास पथके तयार केली. घटनास्थळावरील पुरावे, तांत्रिक माहिती आणि डिजिटल डेटाचे विश्लेषण करण्यासाठी प्रथमच अत्याधुनिक एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. या विश्लेषणातून हरदेव सिंह मुनासा सिंह देवल (रा. राजुरा, जि. चंद्रपूर) आणि मनप्रीत सिंह कश्मीर सिंह (मूळ रा. अमृतसर, सध्या कच्छ, गुजरात) यांच्यावर संशय निश्चित झाला. त्यानंतर पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने एका आरोपीला जळगाव जिल्ह्यातील रावेर येथून तर दुसऱ्याला गुजरातमधील अहमदाबाद परिसरातून ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात आरोपी आणि मृतक यांच्यात उधारीच्या पैशांवरून वाद झाल्याचे उघड झाले आहे. त्यातून आरोपींनी उमेश मिश्रा यांची हत्या करून त्यांचा मृतदेह ट्रकच्या केबिनमध्ये ठेवला. त्यानंतर मृताची ओळख पटू नये आणि पुरावे नष्ट व्हावेत, या उद्देशाने ज्वलनशील पदार्थ टाकून ट्रकला आग लावल्याचे तपासात समोर आले आहे. गुन्हा करून पसार होण्यासाठी आरोपींनी पांढऱ्या रंगाच्या आयशर वाहनाचा वापर केल्याचेही निष्पन्न झाले.

## बनावट बियाणे विक्री प्रकरणी

खारतळेगाव पोलीस करत आहेत. शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच बियाणे खरेदी करावे असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## राजापेठ पोलिसांनी उघडकीस

हद्दीतील कवरनगर व स्वस्तिकनगर परिसरातही चोरी केल्याची माहिती दिली. आरोपीच्या कबुलीजबाबावरून गुन्हामधील सुमारे १५ हजार रुपये किमतीचा कथई रंगाचा बोकड तसेच सुमारे ९,९०० रुपये किमतीचे बांधकाम साहित्य चोरी केल्याचे निष्पन्न झाले.

## ४.४५ कोटीचा गांजा ग्रामीण

हद्दीत ४७ गुन्ह्यांमधील मुद्देमाल नष्ट करण्याची प्रक्रिया राबवण्यात आली. जप्त केलेला मुद्देमाल नष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांची परवानगी घेण्यात आली. त्यानुसार नागपूर जिल्ह्यातील एमआयडीसी बुटीबोरी येथील महाराष्ट्र इन्व्हायरो पावर लि. या कंपनीत हा सर्व गांजा जाळण्यात आला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपअधीक्षक किरण वानखडे, पोलीस निरीक्षक अशोक लांडे, पोउपनि सागर हटवार आणि त्यांच्या पथकाने हे कारवाई पार पाडली.

## धारणी पोलिसांची अवैध रेती

त्यानुसार धारणी पोलीस ठाण्याचे निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी बैरागड येथील फॉरेस्ट नाका रोडवर सापळा रचला. पोलिसांनी एका ट्रॅक्टर-ट्रॉलीची तपासणी केली असता त्यामध्ये एक ब्रास रेती भरलेली आढळली. चालकाकडे रेती वाहतुकीचा कोणताही वैध परवाना किंवा वाहनाची आवश्यक कागदपत्रे नसल्याचे निष्पन्न झाले. चौकशीत चालकाची ओळख शेख जुबेर शेख इकराम (वय २२, रा. बैरागड) अशी पटली. त्याने ट्रॅक्टर मालक शेख जावेद शेख लतीफ पटेल (वय ४०, रा. बैरागड) यांच्या सांगण्यावरून रेतीची वाहतूक करत असल्याची कबुली दिली.

## अमरावतीत वेश्याव्यवसायाच्या

क्रमांक ४०२ येथे नियोजनबद्ध सापळा रचण्यात आला. कारवाईदरम्यान मंगला विनोद पळसपगार आणि सुशांत अरविंद पळसपगार यांना अटक करण्यात आली. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियमातील कलम ३, ४, ५ तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कोठडीत आरोपी मंगला पळसपगार हिने दिलेल्या माहितीनुसार, तिचा पती विनोद पळसपगार (फरार) हा मध्य प्रदेश आणि पश्चिम बंगालमधील एजंटांच्या माध्यमातून महिलांना अमरावतीत आणत होता. त्यानंतर शहरातील विविध उच्चभ्रू भागांमध्ये भाड्याने घेतलेल्या दोन बीएचके फ्लॅटमध्ये वेश्याव्यवसाय चालविला जात असल्याचे तपासात समोर आले आहे. प्राथमिक तपासात मंगला पळसपगार हिने यापूर्वी साईनगर, देशमुख ले-आऊट, गोंडबाबा मंदिर परिसर आणि सध्या सामरा नगर येथे हा व्यवसाय सुरू ठेवल्याचे निष्पन्न झाले आहे. तिचा सख्खा भाऊही मंगलधाम परिसरात अशाच प्रकारचा व्यवसाय करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून त्याचीही चौकशी सुरू आहे. तपासादरम्यान आरोपींकडील मोबाईलमधून ॅंज्ज्लेहो द्वारे ग्राहकांशी संपर्क साधून महिलांची छायाचित्रे पाठविणे, प्रति महिला सुमारे २,५०० रुपये दर ठरविणे आणि आर्थिक व्यवहार करण्याचे पुरावे मिळाले आहेत. मोबाईलमधील चॅट, संपर्क यादी, फोनपे व इतर डिजिटल व्यवहारांचे तांत्रिक विश्लेषण सुरू असून त्यातून आणखी अनेक धागेदोरे समोर येण्याची शक्यता आहे. तपासात काही महिलांना या व्यवसायात जबरदस्तीने किंवा आमिष दाखवून सहभागी करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. तसेच शहरात अशाच प्रकारची आणखी काही रॅकेट कार्यरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली असून त्यादृष्टीने सखोल तपास सुरू आहे. काही ग्राहकांचे व्हिडिओ चित्रीकरण करून त्यांचा गैरफायदा घेतल्याचाही प्राथमिक तपासात उल्लेख असून या प्रकरणाचीही चौकशी सुरू आहे. दरम्यान, अमरावती शहर पोलिसांनी नागरिकांना घर किंवा फ्लॅट भाड्याने देताना भाडेकरूंची ओळख, आवश्यक कागदपत्रे, कायदेशीर करार आणि शक्य असल्यास पोलीस पडताळणी करण्याचे आवाहन केले आहे. परिसरात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले असून माहिती देणाऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे, तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रोशन चटे आणि राजापेठ डीबी पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## अमरावती ग्रामीण पोलीस दलाला

ठिकाणी, यात्रा, उत्सव तसेच दुर्गम भागातील पोलीस कर्तव्यादरम्यान स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उपयोगी ठरणार आहेत. तसेच पावसाळ्यात कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक संरक्षण मिळावे यासाठी रेनकोटचे वितरण करण्यात आले.

याचवेळी जिल्हा क्रीडा निधीतून अत्याधुनिक पद्धतीने सुसज्ज करण्यात आलेल्या व्यायामशाळेचे उद्घाटनही करण्यात आले. या व्यायामशाळेमुळे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक व्यायाम साहित्य उपलब्ध होणार असून त्यांच्या शारीरिक तंदुरुस्ती, आरोग्य आणि कार्यक्षमतेत वाढ होण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत अमरावती ग्रामीण पोलीस दलात निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींचाही गौरव करण्यात आला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहकार्याने आयोजित रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या ११५ युवक-युवतींना प्रशिक्षणाची संधी मिळाली असून, त्यापैकी मेळघाटातील अतिदुर्गम भागातील सात प्रशिक्षणार्थींना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते प्रतीकात्मक नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले.

जिल्हाधिकारी अशिष येरेकर यांच्या सहकार्याने पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी तसेच पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## दोन युवा बॉडी बिल्डर्सचा

वाहन एमएच ४३ एएल ३२५३ ने गुरुवारी सकाळी हिंगोली येथे गेले होते. आपले काम आटोपून रात्रीच्या वेळी ते पुसदेकडे परत येत असताना कळमनुरी जवळ रात्री साडेदहा वाजता हा अपघात घडला. चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव वेगात असलेली कार थेट रस्त्यावरील सिमेंटच्या डिव्हायडरवर जोरात जाऊन आदळली. ही कार सात ते आठवेळा पलटी झाली. हा अपघात इतका भीषण होता की कारच्या दर्शनी भागाचा चक्काचूर झाला. या भीषण धडकेत परिमल राठोड आणि उदय गजरे या दोन्ही तरुणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात मृत पावलेले दोघेही तरुण पुसदचे रहिवासी होते. हे दोघेही शरीरसौष्ठव क्षेत्रात अत्यंत वेगाने प्रगती करत होते.

## दिव्यांग युवकाची गळफास

देण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडून सुमारे ६० ते ७० हजार रुपये घेतल्याचा उल्लेख त्यांनी मृत्यूपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीत केल्याची माहिती असून त्या व्यक्तीने कोरा चेक पण दिला असल्याचे घरच्या लोंका चे म्हणणे आहे. घटनेच्या दिवशी दिनेश गाडगे यांची पत्नी आणि मुलगी शाळेचे कपडे खरेदी करण्यासाठी बाहेर गेले होते. घरातून बाहेर पडताना पत्नीला 'बाहेरून दार लावून घे, मी आत झोपतो,' असे त्यांनी सांगितल्याची माहिती मिळाली. त्यानंतर घरात कोणी नसताना त्यांनी गळफास घेऊन जीवन संपविल्याचे समोर आले.घटनेची माहिती मिळताच अचलपूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

## नशेत स्वतःचे घर पेटवून

रूप धारण केले. यात सोफा, दिवाण, शोकेस, टीव्ही आणि फ्रीजसह घरातील सर्व सामान जळून राख झाले. दीड लाखाचे नुकसान यामध्ये झाले. घराला आग लावल्यानंतर ही आरोपी थांबला नाही तर त्याने पत्नीला घराबाहेर ओढत नेले आणि तिच्या सोबत मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच वरूड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपी भूषण गोमकाले याच्या विरुद्ध विविध कलमा अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

## राजकमल चौकात भाजपाचे हनुमान

की, राम मंदिराला विरोध करणाऱ्यांना आणि सनातन धर्माचा अपमान करणाऱ्यांना सद्बुद्धी मिळावी. यानंतर रामरक्षा पाठही घेण्यात आला.जोपर्यंत रामाचे नाव आहे, तोपर्यंत सनातन धर्म जिवंत आहे' अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, सभागृह नेता चेतन गावंडे, प्रदेश प्रवक्ता शिवराय कुलकर्णी, जयंत डेहनकर, किरण पातुरकर ,नितीन गुडधे, नगरसेवक तुषार भारतीय, संजय तीरथकर, एड. प्रशांत देशपांडे, मिलिंद बांबल, आशीष अतकरे, बलदेव बजाज, गजानन देशमुख, संजय कटारिया, चेतन पवार, विवेक गुल्हाने, राजेश पड्डा, विकी शर्मा, राजू कुरील, विक्की शर्मा, कन्हैया मित्तल, राजू शर्मा, विनोद तानवैस, लखन राज, राधा कुरील, स्वाती कुरकर्णी, लवीना हर्षे,नूतन भुजाडे, कल्याणी तायडे, सुधा तिवारी, संगीता शिंदे यांच्यासह भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

---

**दि अमरावती जि.प.शिक्षक सहकारी बॅंक लि.अमरावती**
**कॉग्रेस नगर रोड, रेल्वे पुलाजवळ, अमरावती**
**फोन नं. ०७२१-२६७४६८४, २६७१०४३**

**-निविदा सुचना-**

दि अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बॅंक लि.,यांचे मुख्य कार्यालय व बॅंकिंग कामकाज तात्पुरत्या स्वरुपात नविन भाडयाच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने विद्यमान कार्यालयातील फर्निचर, संगणक साहित्य, इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, तिजोरी, सेफ कपाटे, टेबल, खुर्च्या तसेच इतर संपूर्ण बॅंकिंग साहित्य सुरक्षितपणे नविन भाडयाच्या इमारतीत स्थलांतरित करणे आणि काही साहित्य, जसे लॉकर व इतर वस्तु/ साहित्य बॅंकेच्या निर्देशानुसार इतर शाखांमध्ये वाहतुक करुन पोहोचविणे या कामासाठी अनुभवी, पात्र व सक्षम संस्था/ कंत्राटदार/वाहतुकदार यांच्याकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

निविदा धारकांची प्रत्यक्ष साहित्याची पाहणी करुनच आपला दर निविदा फॉर्म मध्ये नमुद करावा. दि.१९/०७/२०२६ ते दि.२४/०७/२०२६ पर्यत रु.५००/- GST सह भरणा करुन दुपारी ३.०० वाजेपर्यत निविदा फॉर्म विक्रीस उपलब्ध राहिल. दि.२४/०७/२०२६ ला दुपारी ४.३० वाजेपर्यत अनामत रक्कम रु.५०००/- बॅंकेमध्ये भरणा करुन भरलेले सिलबंद निविदा फॉर्म स्विकारले जाईल.

नियम व अटी तथा कामाचा तपशील मुख्यालय, अमरावती येथे पहावयास मिळेल. निविदा उघडणे वा रदद करणे इत्यादी अधिकार बॅंकेने राखुन ठेवले आहे.

**अमरावती**
**दिनांक-१९/०७/२०२६**

*अध्यक्ष* *सरव्यवस्थापक*
*दि.अम.जि.प.शिक्षक सह बॅंक लि., अमरावती*

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.ए.बी.कटटे ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१३१९/२०२६**
**शरद व इतर व चेतन व इतर**
**पुढील ता.१९.०८.२०२६**

**अर्जदार :**
१. **शरद विष्णु ठाकरे,** वय ५२ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.बोडणा ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
२. **पुष्पा प्रल्हाद गौरखेडे,** वय ६५ वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा.वार्ड नं.२, गुरुदेव नगर, तिवसा जि.अमरावती
३. **लक्ष्मण विष्णु ठाकरे,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.बोडणा, ता. चांदूर रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- ममता किसन कराळे....... मयत तर्फे वारस**
१. **चेतन किसन कराळे,** वय वर्षे, व्यवसाय - मजुरी, रा.रायपुर कासारखेडा, ता.पुलगाव, जि.वर्धा
२. **लता शंकरराव कडू,** वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम, रा.खिरसाना, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत विष्णु नागोराव ठाकरे** हे दि.०२.०९.२०१९ रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार शरद व इतर वि चेतन व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शरद व इतर वि चेतन व इतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.बी.कळदाते,२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२४४/२०२६
**सचिन व ईतर -विरुध्द निरंक**
पुढील ता.२७.०८.२०२६

**अर्जदार :**
1. Sachin Onkarrao Kharbade, Age 42 Yrs. Occu.: Business
2. Sau. Anita Ashokrao Ghatol, Age 46 Yrs. Occu.: Household, R/o. Ward No. 5, Kakad Dara, Tq. Talegaon, Dist. Wardha
3. Onkarrao Pundlikrao Kharbade, Age 74 Yrs. Occu.: Nil
1 and 3 both R/o. Mahatma Fule Chowk, Old Town, Rahatgaon, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **प्रमिला ओंकार खरबडे** हे **दिनांक २६.०८.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सचिन व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सचिन व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

# जाहीर सोडचिठ्ठी

**जाहिर सोडचिठठी घेणार - पार्टी नं.१ - सौ.दिशा राहुल काळबांडे**
वय २६ वर्षे, रा..तिवसा, ता.तिवसा जि. अमरावती

**जाहिर सोडचिठठी देणार - पार्टी नं.२ - राहुल गोवर्धनजी काळबांडे**
वय ३३ वर्षे, रा.वरखेड, ता.तिवसा, जि.अमरावती

१. आम्ही दोघे पार्टी नं.१ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्या दबावात न येता, मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१, माझे पतीला दिनांक १९ जुलै २०२६ ला जाहीर सोडचिठठी देत आहे.

२. आमचा विवाह ३१ एप्रिल २०२४ ला बौध्द पध्दतीने झालेला आहे. मागील २ वर्षापासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापुढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसरिक कलहातून कुणाचीही जिवितहानी होवू नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

३. यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक-दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती-पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते इथेच संपुष्टात येत आहे.

**स्थळ** - अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक** - १९ जुलै २०२६

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार**

**पत्नी - सौ.दिशा राहुल काळबांडे**

---

प्रोसेस क्र. ३७८०/२०२६

# जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश -०६, यांचे न्यायालय**

एम.ए.सी.पी.क्र. ८६/२०२६ ने.ता.१९/०८/२०२६

**अर्जदार - शुभ सुरेंद्रसिंग राठोड**

--- विरुध्द ---

**गैरअर्जदार - मोहम्मद अफसर मोहम्मद अकबर व इतर**

**गैरअर्जदार - १. मोहम्मद अफसर मोहम्मद अकबर**
**रा.हिरापुर, अचलपुर, जि.अमरावती- ४४४ ८०६**

**APPLICATION U/S.166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION**

ज्याअर्थी वरील पिटीशनर **शुभ सुरेंद्रसिंग राठोड,** यांनी **जिल्हा व सत्र न्यायालय - ०६, अमरावती** यांचे न्यायालयात नुकसान भरपाई मिळण्याकरीता दावा दाखल केला आहे.

त्याअर्थी वरिल गैरअर्जदार क्र.१ मोहम्मद अफसर मोहम्मद अकबर, यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी दाव्याचे सुनावणीसाठी दि.१९.०८.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायालय - ०६, अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक

शिक्का
**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग),**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज १३७०/२०२६**
**अरुणराव + दोन- वि -निरंक**
**पुढील ता.१८.०८.२०२६**

**अर्जदार :**
1. **Arunrao Vasudevrao Kawane**, Age about 62 Yrs. Occu.: Farmer, R/o. Nandura Bk, Tq. & Dist. Amravati
2. **Kokila Manohar Tekade,** Age about 79 Yrs. Occu.: Household, R/o. Wani Satargaon, Amravati
3. **Hemalata Atul Vade,** Age about 49 Yrs. Occu.: Household, R/o. Mu. Fattepur, Post.- Suruli, Warud, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Wasudev Sitaram Kawane** हे दिनांक १६/०८/२००२ रोजी **नांदुरा बु. अमरावती** येथे मयत झाले व **Kamal Wasudev Kawane** या दि.१४/१०/२०१९ रोजी नांदुरा बु.अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Arunrao Vasudevrao Kawane +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Arunrao Vasudevrao Kawane +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

श्री समर्थ शिक्षण संस्था द्वारा संचालित
(रजि नं. एफ-११८, अमरावती)

**श्री समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अमरावती**

# पाहिजेत

श्री समर्थ उच्च माध्यमिक विद्यालय, देवरणकर नगर, अमरावती येथील क.म.वि. घड्याळी तासिकेवर सत्र २०२६-२७ करिता खालील नियुक्ती करावयाची आहे.

| अ. क्र. | विषय | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | इंग्रजी, मराठी | एम.ए.बी.एड |
| २ | संस्कृत | एम.ए.बी.एड |
| ३ | भौतिकशास्त्र | एम.एस.सी.बी. एड |

तासिका तत्वावरील मानधन शासनाच्या नियमानुसार. वरील पदासाठी इच्छुक उमेदवारांनी मुळ कागदपत्रासहित स्वखर्चाने थेट मुलाखतीस श्री समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, देवरणकर नगर येथे बुधवार दिनांक अमरावती २२/७/२०२६ ला दुपारी १२ः00 वाजता उपस्थित राहावे.

**सचिव,**
**शाळा समिती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर,५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज १३२०/२०२६**
**प्रविणा + २ -वि-निरंक**
**पुढील ता.१३.०८.२०२६**

**अर्जदार :**
1. **Pravina Dilip Amale**, Age about 56 Yrs. Occu.: Household, R/o. Abhiyanta Colony, Vidyut Nagar, V.M.V. Amravati
2. **Nikita Dilip Amale,** Age about 37 Yrs. Occu.: Household, R/o. Abhiyanta Colony, Vidyut Nagar, V.M.V. Amravati
3. **Mithilesh Dilip Amale,** Age about 29 Yrs. Occu.: Pvt.Job, R/o. Abhiyanta Colony, Vidyut Nagar, V.M.V. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार : Nil**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Dilip Namdeorao Amale** हे दिनांक १८.०५.२०२५ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Pravin Dilip Amale +2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **Pravin Dilip Amale +2** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१४.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, १९ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला अधिक गती देत ? सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे - जिल्हाधिकारी

### विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेचा आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी, मतदार यादीतील माहितीची अचूकता, गणना प्रपत्रांचे वेळेत वितरण, संकलन, डिजिटायझेशनसाठी सर्व संबंधितांनी परस्पर समन्वयाने नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण' आढावा बैठकीत ते बोलत होते. मोहिमेला अधिक गती देत सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने आणि सूक्ष्म नियोजन करून काम करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त परदेशी तसेच जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी (ERO),



सहायक मतदार नोंदणी अधिकारी (AERO), पर्यवेक्षक आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) दूरदृश्यप्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) या बैठकीला जोडले गेले होते.

बैठकीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. गणना प्रपत्रांचे वितरण व संकलन, प्राप्त प्रपत्रांची तपासणी, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, माहितीचे वेळेत आणि अचूक डिजिटायझेशन तसेच प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाची नियमित पाहणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी पुढे बोलतांना सांगितले की, मतदार यादीची शुद्धता, अद्ययावतता आणि विश्वासार्हता ही लोकशाही प्रक्रियेचा महत्त्वाचा पाया आहे. त्यामुळे एसआयआर मोहिमेतील प्रत्येक टप्पा अत्यंत जबाबदारीने आणि काटेकोरपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रत्येक गणना प्रपत्राची अचूक नोंद, आवश्यक कागदपत्रांची योग्य पडताळणी आणि माहितीचे वेळेवर डिजिटायझेशन याकडे विशेष लक्ष द्यावे. कोणतेही काम प्रलंबित राहणार नाही, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी नियमित आढावा घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती वाढविण्यासाठी आणि सर्व शंका-समस्यांचे निराकरण करण्यासाठी राजकीय पक्षांशी सातत्याने संवाद ठेवणे आवश्यक आहे. जिल्हास्तरावर राजकीय पक्षांच्या बैठका नियमितपणे आयोजित केल्या जात आहेत. त्याच धर्तीवर तालुकास्तरावरही सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या बैठका आयोजित करून मोहिमेच्या प्रत्येक टप्प्याची माहिती द्यावी, त्यांच्या सूचना जाणून घ्याव्यात आणि आवश्यक समन्वय साधावा, असे निर्देशही त्यांनी दिले.या मोहिमेची माहिती जिल्ह्यातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी व्यापक जनजागृती आणि प्रचार-प्रसिद्धीवर विशेष भर देण्यात यावा. एकही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही.

## पावसाचा खंड कालावधीत पिकांची शास्त्रीय पद्धतीने काळजी घ्यावी

### कृषी विभागाचे शेतक-यांना मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

यंदाच्या खरीप हंगामात काही भागांमध्ये पावसाचा खंड पडल्याने जमिनीतील ओलावा कमी होत असून खरीप पिकांवर पाण्याचा ताण येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घाबरून न जाता शास्त्रीय पद्धतीने पिकांचे व्यवस्थापन करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह यांनी केले आहे.

जमिनीत पुरेसा ओलावा नसताना उगवणीनंतर वापरावयाची तणनाशके तसेच विविध संप्रेरके, बुरशीनाशके आणि कीटकनाशकांची अनावश्यक फवारणी टाळावी. पाण्याच्या ताणाच्या अवस्थेत रासायनिक फवारणीमुळे पिकांवर अतिरिक्त ताण निर्माण होण्याची शक्यता असते.

जमिनीत किंचित ओलावा असल्यास हलका डवऱ्याचा फेर देऊन अंतरमशागत करावी. मात्र खोल मशागत टाळावी. मशागत करताना पिकांच्या मुळांना इजा होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी.

सलग सात ते आठ दिवस पावसाचा खंड राहून पिके सुकण्याची लक्षणे दिसू लागल्यास कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्याने १३:०:४५ (पोटॅशियम नायट्रेट) हे खत १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारावे. ज्या शेतकऱ्यांकडे संरक्षित सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे त्यांनी ठिबक किंवा तुषार सिंचनाद्वारे हलके पाणी देऊन पिकांवरील ताण कमी करावा.

सोयाबीन पिकात खोडमाशी, चक्रभुंगा, हिरवी उंटअळी, तंबाखूची पाने खाणारी अळी व केसाळ अळी यांच्या व्यवस्थापनासाठी प्रथम एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करावा. गरज भासल्यास पाच टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी. तसेच कामगंध सापळे, पिवळे चिकट सापळे आणि पक्षी थांबे यांचा वापर करावा. रासायनिक कीटकनाशकांचा वापर केवळ कृषी तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करावा. हळद पिकामध्ये लागवडीनंतर ४५ ते ५० दिवसांनी शिफारशीनुसार नत्राची मात्रा द्यावी.

मात्र खताचा योग्य परिणाम होण्यासाठी संरक्षित सिंचन उपलब्ध असल्यास सिंचन करणे आवश्यक आहे.

हळद, संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू तसेच इतर फळबाग आणि भाजीपाला पिकांमध्ये पावसाच्या ताणाच्या काळात रासायनिक उत्पादनांचा अनावश्यक वापर टाळावा. त्याऐवजी ट्रायकोडर्मा, पीएसबी, सुडोमोनास आणि मेटारायझियम यांसारख्या जैविक निविष्ठांचा कृषी तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली वापर करावा.

## गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



■ प्रतिनिधी | वाशिम ■

इनरव्हील क्लब ऑफ वाशीम सेंट्रल, डिस्ट्रिक्ट ३०३ यांच्या वतीने १६ जुलै रोजी येथील देवपेठ शाळेतील ४० गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. 'Nurturing Young Minds–Celebrating Young Girls' या उद्दिष्टाला अनुसरून राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वह्या व इतर आवश्यक शालेय साहित्य देण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधून शिक्षणाचे महत्त्व, नियमित अभ्यास, शिस्त, स्वावलंबन आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी मेहनतीचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल सकारात्मक प्रेरणा निर्माण झाली.

कार्यक्रमाला क्लबच्या अध्यक्षा रुचिका विसपुते, सचिव हेमलता विसपुते यांच्यासह योगिनी मापारे, सीमा राठोड, रुपाली देशमुख यांची उपस्थिती होती. उपस्थितांनी या सामाजिक व शैक्षणिक उपक्रमाचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी नवी प्रेरणा मिळत असल्याची भावना व्यक्त केली.

## स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र २० जुलैपासून सुरू

### व्यावसायिक वाहनांच्या योग्यता प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अनिवार्य

■ प्रतिनिधी | वाशिम ■

केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून सर्व प्रकारच्या व्यावसायिक वाहनांसाठी योग्यता प्रमाणपत्र तसेच योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रामार्फत करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ मधील नियम ५६ नुसार व्यावसायिक वाहनासाठी वैध योग्यता प्रमाणपत्र असणे बंधनकारक असून, नियम ३९ नुसार नोंदणीकृत नसलेले वाहन सार्वजनिक रस्त्यावर चालविण्यास मनाई आहे.

या अनुषंगाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात दि. २० जुलै २०२६ पासून नवीन स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे. सुमारे ६९७ चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या केंद्रात १०३ चौरस मीटर क्षेत्रावर कार्यालयाची इमारत असून, दोन तपासणी मार्ग आणि दोन निरीक्षण खड्डे उपलब्ध आहेत. या केंद्रात दररोज सुमारे ८० व्यावसायिक वाहनांची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

वाहनधारकांनी योग्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरणासाठी http://vahan.parivahan.gov.in/AFMS या संकेतस्थळावर जाऊन राज्य, जिल्हा आणि वाहनाच्या प्रकारानुसार तपासणी मार्ग निवडावा. त्यानंतर उपलब्ध केंद्र निवडून पूर्वनियोजित वेळ आरक्षित करावी. वाहनाच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर प्राप्त होणारा एकवेळ संकेतांक (ओटीपी) नोंदवून विहित शुल्क ऑनलाइन भरावे. वाहनाच्या नोंदीमध्ये भ्रमणध्वनी क्रमांक अद्ययावत नसल्यास तो प्रथम अद्ययावत करून घ्यावा. प्रारंभी केंद्राचे कामकाज सुरळीत राहावे यासाठी मर्यादित वाहनांची नोंदणी स्वीकारण्यात येणार असून, पुढील काही दिवसांत केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल.

वाहनधारकांनी पूर्वनियोजित दिवशी वाहन तपासणीसाठी उपस्थित राहताना वाहन सुस्थितीत ठेवावे. तसेच वाहनाची सर्व वैध कागदपत्रे, तसेच लागू असल्यास वाहन स्थान शोध यंत्रणा (व्हीएलटीडी), वेग मर्यादा नियंत्रक (एसएलडी) आणि परावर्तित परावर्तक पट्ट्यांबाबतची आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आनंद मेश्राम यांनी केले आहे.

## कारंजा शहरात SIR कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

### आ. सई डहाके यांनी घेतला आढावा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भारतीय जनता पार्टी, कारंजा शहरच्या वतीने आमदार सईताई डहाके यांच्या सूचनेनुसार शहरातील प्रभाग क्र. ९ मधील मोठे राममंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या एर्हि कॅम्पला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कॅम्पदरम्यान प्रशासनाकडून मतदार गणना प्रपत्र भरण्याचे काम व्यापक प्रमाणात सुरू असून नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी आमदार सईताई डहाके यांनी कॅम्पला भेट देऊन उपस्थित ँध्द अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. सुरू असलेल्या मोहिमेचा आढावा घेत नागरिकांची नोंदणी सुरळीतपणे होत आहे का, याची माहिती त्यांनी घेतली. तसेच भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व नगरसेवकांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचण्याच्या महत्त्वपूर्ण सूचना केल्या.

एर्हि कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपा शहर पदाधिकारी, नगरसेवक आणि कार्यकर्ते अथक परिश्रम घेत असून नागरिकांना आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करत आहेत.

दरम्यान, दि. १९ जुलै रोजी कारंजा शहरातील प्रभाग क्र. २, ५, ६, ७, ८, ९ आणि १४ मध्ये एर्हि कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या कॅम्पमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गणना प्रपत्र भरून शासनाच्या या महत्त्वपूर्ण मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन भाजपा कारंजा शहराध्यक्ष अमित संगेवार व नगर परिषदेच्या गटनेत्या सौ. शालिनी प्रशांत ठाकरे यांनी केले आहे.

एर्हि मोहिमेमुळे पात्र नागरिकांची अचूक नोंदणी होऊन प्रशासनाचे काम अधिक प्रभावी होण्यास मदत होत असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

**विदयमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १३२/२०२६ — चौ. ता. २७/०७/२०२६

शांता व इतर विरूध्द निरंक

**अर्जदार :** १. शांता संपत वानखेडे -वय अं. ६० वर्षे, धंदा-घरकाम. २. रविंद्र संपत वानखेडे -वय अं. ५८ वर्षे, धंदा- नोकरी ३. रेखा भारत इंगोले- वय अं. ५५ वर्षे, धंदा -खाजगी नोकरी. ४. महेंद्र संपत वानखेडे -वय अं. ५३ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी. ५. जितेंद्र संपत वानखेडे (मयत) तर्फे वारस ५.१ शितल जितेंद्र वानखेडे- वय अं. ३६ वर्षे, धंदा- घरकाम. ५.२ धिरजकुमार जितेंद्र वानखेडे वय अं. २१ वर्षे, धंदा- शिक्षण. ५.३ राजकुमार जितेंद्र वानखेडे - वय अं. १७ वर्षे, धंदा- शिक्षण अर्जदार क्र. ५.३ तर्फे अ. पा.क्र. आई अर्जदार क्र. ५.१ स्वतः अर्जदार क्र.१, २, ४, ५.१ ते ५.३ सर्व रा. खोडे माउली नगर, सिव्हील लाईन, वाशिम, अर्जदार क्र. ३ रा. सोहल गैवाल, ता. कारंजा जि. वाशिम

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वाना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क. १ ही मयत नामे संपत कोंडूजी वानखेडे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ते ५ हे मयत नामे संपत कोंडूजी वानखेडे यांचे मुले व मुलगी आहे. अर्जदार क्र. ५.१ ही मयत नामे संपत कोंडूजी वानखेडे यांची सुन आहे. अर्जदार क्र. ५.२ व ५.३ हे संपत कोंडूजी वानखेडे यांचे नातू आहेत. मयत नामे संपत कोंडूजी वानखेडे हे दिनांक २३/०४/२०२३ रोजी मृत्यू पावलेत. तसेच मयत संपत कोंडूजी वानखेडे यांचा मुलगा मयत नामे जितेंद्र संपत वानखेडे हे दिनांक १८/०४/२०२६ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर वाशिम

## जाहीर नोटीस

**विदयमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १३३/२०२६ — चौ. ता. ०६/०८/२०२६

केशव व इतर विरूध्द निरंक

**अर्जदार :** १. केशव भिवाजी वानखेडे वय अं. ३९ वर्षे, धंदा- शेती २. माधव भिवाजी वानखेडे (मयत) तर्फे वारस २.१. राजनंदनी माधव वानखेडे अं. ३२ वर्षे, धंदा - घरकाम २.२. जय माधव वानखेडे वय अं. १६ वर्षे, धंदा - शिक्षण. २.३. आर्या माधव वानखेडे वय अं. १२ वर्षे,- शिक्षण. ३. कल्पना केशव उचित वय अं. ४४ वर्षे, धंदा - घरकाम. अर्जदार क. २.२ व २.३ तर्फे अ. पा. क. अर्जदार क. २.१ स्वतः अर्जदार - क्र. १, २.१ ते २.३ तर्फे इराळा पो. कळंबेश्वर ता. मालेगाव जि. वाशिम अर्जदार क्र. ३ रा. नागठाणा ता. जि. वाशिम

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वाना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क. १ ते ३ हे मयत नामे भिवाजी रावजी वानखेडे यांचे मुले व मुलगी आहे. अर्जदार क. २.१ ही मयत नामे भिवाजी रावजी वानखेडे यांची सुन आहे. अर्जदार क्र. २.२ व २.३ हे भिवाजी रावजी वानखेडे यांचा नातू व नात आहे. मयत नामे भिवाजी रावजी वानखेडे हे दिनांक १७/११/२०२३ रोजी मृत्यू पावलेत. तसेच मयत भिवाजी रावजी वानखेडे यांचा मुलगा मयत नामे माधव भिवाजी वानखेडे हे दिनांक ०२/०३/२०२३ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. ०६/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक ०३/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर वाशिम


## शिरपूर येथे ११० तर चिवरा येथे १०० संशयितांची क्षयरोग तपासणी; जागतिक डेंग्यू दिनानिमित्त जनजागृती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जागतिक डेंग्यू दिनानिमित्त प्राथमिक आरोग्य केंद्र शिरपूर व आरोग्य उपकेंद्र चिवरा येथे क्षयरोग शोध मोहिमेसह जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या अंतर्गत फिरत्या क्ष-किरण वाहनातील डिजिटल एक्स-रे मशिनद्वारे संशयित क्षयरुग्णांची तपासणी करण्यात आली.



प्राथमिक आरोग्य केंद्र शिरपूर येथे क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ११० संशयितांची डिजिटल एक्स-रे तपासणी केली. यावेळी ६९ संशयितांचे स्पुटम नमुने संकलित करण्यात आले. तसेच लिंक वर्कर प्रशांत सूर्य व प्रशांत सुर्वे यांनी ६४ नागरिकांची एचआयव्ही तपासणी केली. तर आरोग्य उपकेंद्र चिवरा येथे टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी हँडहेल्ड एक्स-रे मशिनद्वारे १०० संशयितांची तपासणी केली. हा उपक्रम जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सतीश परभणकर, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. निरज शिंदे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अश्विनी खासबागे व वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमादरम्यान डॉ. गजानन मिटकरी, गीता देशमुख, निशिगंधा काळे, अर्चना पांडे, सीताराम लाखाडे, भास्कर गुढदे, गणेश रघुवंशी, स्वप्नील सरनाईक, आशिष मोहळे, गोपाल तायडे, रमेश सोमटकर, सय्यद मोसीन, प्रवीण इंगळे, शैलेश हिरपूरकर, नितीन अस्टोनकर, गजानन वाघमारे, दिपिका उमरे, ओम भाटुडकर, सुरेखा मोरे, स्मिता देशपांडे, विलास कळमकर, गणेश राऊत, प्रशांत तूरक तसेच आशा कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. यावेळी उपस्थित नागरिकांना क्षयरोग, डेंग्यू व हिवताप प्रतिबंध, लक्षणे आणि उपचाराबाबत आरोग्य शिक्षण देऊन जनजागृती करण्यात आली.

## राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या विविध अर्थसहाय्य योजनांसाठी प्रस्ताव मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारत सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता यांच्या समान निधी व असमान निधी योजनांद्वारे राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२६-२७ या वर्षासाठी या योजनांचा लाभ घेण्यासाठी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांकडून विहित नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

समान निधी योजनेंतर्गत ग्रंथालय इमारत बांधकाम व विस्तारासाठी कमाल २५ लाख रुपये अर्थसहाय्य उपलब्ध आहे. या योजनेव्यतिरिक्त इतर समान निधी योजनांचे प्रस्ताव केंद्रीय पातळीवर स्वीकारले जाणार असल्याने त्यासाठी प्रस्ताव सादर करू नयेत.

असमान निधी योजनांमध्ये ग्रंथालय सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना ग्रंथ, साधनसामग्री, फर्निचर तसेच इमारत बांधकाम व विस्तारासाठी अर्थसहाय्य, 'ज्ञान कोपरा' विकसित करण्यासाठी अर्थसहाय्य, विशेष आधुनिकीकरणासाठी सहाय्य, ग्रंथालयांच्या ५०, ६०, ७५, १००, १२५ व १५० वर्षांच्या महोत्सवी कार्यक्रमांसाठी अर्थसहाय्य, राष्ट्रस्तरीय चर्चासत्र, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग व जनजागृती कार्यक्रमांसाठी सहाय्य तसेच 'बालकोपरा' स्थापन करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

## वैदिक गणितामुळे कठीण प्रमेय क्षणार्धात सोडविता येतात !

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विद्याभारती वाशिम जिल्ह्यातर्फे दि. १५ जुलै आणि १६ जुलै रोजी वाशिम येथे रेखाताई राष्ट्रीय कन्या शाळेच्या सभागृहात दोन दिवसाची वैदिक गणित कार्यशाळा वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती.कार्यशाळेचा समारोप गुरूवार दि. १६ रोजी संपन्न झाला.

समारोपीय कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या वैदिक गणित तज्ञ शेफालीताई जोशी, नागपूर ह्या होत्या.

समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून रा.स्व.संघाचे जिल्हासंघचालक अभियंता शंकरराव ढोबळे हे होते.तर विशेष अतिथी म्हणून माजी आमदार विधीज्ञ विजयराव जाधव होते.

विशेष उपस्थितीत नगर परिषद वाशिमचे बांधकाम सभापती राहुल तुपसांडे आणि न.प.च्या स्थायी समिती सदस्या जयश्रीताई वानखेडे ह्या होत्या.

मंचावर विद्याभारती विदर्भ प्रांत उपाध्यक्ष विधीज्ञ सत्यानंद कांबळे, विद्या भारती प्रांत

वैदिक गणिततज्ञ शेफाली जोशी



सहमंत्री विद्यावाचस्पती प्रा.दिलीप जोशी, संस्थेच्या सचिव लुंबिनी कांबळे यांची उपस्थिती होती.

वैदिक गणित हा गणितिय दृष्टीकोन देणारा प्राचीन विषय असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय ज्ञान परंपरेचा दिव्य भाग आहे.वैदिक गणितामुळे अवघड प्रमेय चुटकीसरशी सोडवता येतात.वैदिक गणित आता जगमान्य झाले असून त्याचा उपयोग जीवनाच्या सर्व क्षेत्रात केल्या जात असल्याचे प्रतिपादन विद्या भारतीच्या विदर्भ प्रांत वैदिक गणित संयोजिका तथा वैदिक गणित तज्ञ शेफालीताई जोशी नागपूर यांनी केले.त्यांनी या प्रसंगी चार अंकी संख्या गुणिला चार अंकी संख्येचा गुणाकार पंधरा सेकंदाच्या आत विद्यार्थी कसे करतात याचे प्रात्यक्षिक दाखविले.यावेळी उपस्थितांनी अवाक होऊन तोंडात बोटे घातली.

यावेळी उपस्थितांनी उत्सुकता म्हणून अवघड गुणाकार विद्यार्थ्यांना सांगितल्यावर विद्यार्थ्यांनी काही सेकंदात सोडविल्यावर सर्वांनी आश्चर्य व्यक्त केले.पायथागोरसचे प्रमेय कितीतरी आधी वैदिक गणितात असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी ते देखिल तीस सेकंदाच्या आत सोडवून दाखविले.अनेक कठीण प्रमेय विद्यार्थ्यांनी सहज सोडवून दाखविले.

यावेळी माजी आमदार विजयराव जाधव, सभापती राहुल तूपसांडे आणि जयश्रीताई वानखेडे यांनी मनोगतातून वैदिक गणितामुळे विद्यार्थ्यात झालेल्या बदलाबद्दल कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष प्रा.अनिल धुमकेकर यांनी तर सूत्रसंचालन जिल्हा मंत्री प्रा.श्रीकांत जोशी यांनी केले. दीपप्रज्वलन आणि सरस्वती वंदनेने प्रारंभ होऊन शांतीमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३२ ■ रविवार, १९ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# चिमुरडीला न्याय, आरोपीला फाशी; वर्ध्यात जनआक्रोशाचा उद्रेक

## भरपावसात हजारोंचा मोर्चा, वर्धा बंदला व्यापाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**वर्धा जनमाध्यम :** रोठा परिसरातील १२ वर्षीय चिमुरडीवरील अत्याचारानंतर तिची दगडाने हत्या करणाऱ्या आरोपीला फाशीची शिक्षा द्यावी, प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी शनिवारी वर्धा शहरात जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. वर्धा बंदलाही व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त साथ देत सकाळपासून आपली दुकाने बंद ठेवली. दुपारनंतर टप्प्याटप्प्याने दुकाने सुरू करण्यात आली.

रोठा येथील १२ वर्षीय अल्पवयीन मुलगी शाळेतून घरी आल्यानंतर आरोपी राहुल राजू मडावी (३०) याने तिच्यावर अत्याचार करून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने दगडाने तिची निर्घृण हत्या केल्याचा आरोप आहे. घटना उघड होताच सावंगी पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीला अटक केली असून न्यायालयाने त्याला २१ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या घटनेनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली असून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी होत आहे.

पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, या उद्देशाने विविध सामाजिक, राजकीय आणि व्यापारी संघटनांनी एकत्र येत वर्धा बंदची हाक दिली होती. शहरातील प्रमुख बाजारपेठा, व्यापारी प्रतिष्ठाने आणि व्यावसायिकांनी या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भरपावसात छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेला जनआक्रोश मोर्चा मार्केट लाईन, जिल्हा रुग्णालय मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. तेथे जिल्हाधिकाऱ्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

डॉ. अभ्युदय मेघे, शिवराज शिंदे, सुधीर पांगुळ आणि चंद्रशेखर मडावी यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चात महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. शहरासह ग्रामीण भागातील नागरिक, विविध संघटनांचे पदाधिकारी, युवक आणि ज्येष्ठ नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले. चिमुरडीला न्याय द्या, आरोपीला फाशी द्या अशा घोषणांनी संपूर्ण शहर दणाणून गेले.

# आईच्या हत्येप्रकरणी मुलाला जन्मठेप

## पत्नीच्या वादातून संतापलेल्या आरोपीने आईची लाकडी दांड्याने केली हत्या; सत्र न्यायालयाचा कठोर निर्णय

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील माटोडा (बेनोडा) येथे पत्नीसोबत झालेल्या कौटुंबिक वादानंतर स्वतःच्या आईची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपीला वर्धा जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. विद्यमान सत्र न्यायाधीश श्री. अली यांनी आरोपी हेमराज तुमसरे (वय ४२, रा. माटोडा , ता. आर्वी) याला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवत सश्रम जन्मठेप, पाच हजार रुपयांचा दंड आणि दंड न भरल्यास सहा महिन्यांच्या अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

प्रकरणातील माहितीनुसार, ११ मे २०२३ रोजी रात्री जेवण वाढण्याच्या कारणावरून आरोपीचा पत्नी ललिता हिच्याशी वाद झाला. त्यानंतर आरोपीने पत्नीला मारहाण केली. त्यामुळे ती मुलगी सलोणीला घेऊन शेजारील नातेवाईकांच्या घरी निघून गेली. पत्नीचा शोध घेऊनही ती न सापडल्याने आरोपी संतप्त झाला. २२ मे २०२३ रोजी मध्यरात्री घरी परतल्यानंतर त्याने आई कौशल्याबाई यांच्याकडे पत्नीबाबत विचारणा केली. त्यावेळी आईने पत्नीला मारहाण करू नकोस, असे सांगितल्याचा राग मनात धरून आरोपीने लाकडी दांड्याने बेदम मारहाण करत तिची हत्या केली.

या प्रकरणी आर्वी पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलिस निरीक्षक भानुदास पिदूरकर यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोक्ता आनंद ठाकरे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. साक्षीदारांना न्यायालयात वेळोवेळी हजर करण्याचे काम पोलीस हवालदार राजू बाळापूरे यांनी केले. तसेच आर्वी पोलिस ठाण्याचे ठाणेदार तथा केस दत्तक अधिकारी पोलिस निरीक्षक सतीश डेहनकर यांनी साक्षीदारांचे मार्गदर्शन करून खटल्यात महत्त्वाची भूमिका बजावली.



प्रत्यक्ष साक्षीदार, वैद्यकीय पुरावे आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे न्यायालयाने आरोपी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

# जो चुकला नियमाला, तो मुकला जीवनाला'चा संदेश

## स्कूल बस व ऑटोचालकांसाठी सुरक्षा कार्यशाळा

**वर्धा जनमाध्यम :** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी परिवहन समितीअंतर्गत न्यू इंग्लिश कॉन्व्हेंट, वर्धा येथे शुक्रवारी (१८ जुलै) स्कूल बस व ऑटो रिक्षा चालक-मालकांसाठी एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. जो चुकला नियमाला, तो मुकला जीवनाला हा संदेश देत वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यशाळेत वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी शालेय वाहनांमध्ये आपत्कालीन दरवाजा, अग्निशामक यंत्र, प्रथमोपचार पेटी आदी सुरक्षा साधने अनिवार्य असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना मदतनीसाने सोबत राहणे, ऑटो रिक्षामध्ये चालकाच्या शेजारी विद्यार्थ्यांना बसवू नये, क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थी घेऊ नयेत, अनधिकृत वाहने वापरू नयेत, वाहनचालकांचे पोलिस पडताळणी प्रमाणपत्र असावे, वाहनात मोठ्या आवाजात संगीत वाजवू नये आणि अतिवेग टाळावा, अशा महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या.




यावेळी अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबतही जनजागृती करण्यात आली. अमली पदार्थांच्या व्यसनामुळे शारीरिक, मानसिक, आर्थिक हानी होऊन गुन्हेगारी प्रवृत्ती वाढू शकते, असे सांगत नको अमली पदार्थांची नशा, आयुष्याची होईल दुर्दशा हा संदेश देण्यात आला.

याशिवाय आपत्कालीन सेवा क्रमांक ११२ (पोलीस), १०८ (रुग्णवाहिका), १०९८ (चाइल्ड हेल्पलाईन) तसेच महिला सुरक्षा हेल्पलाईनची माहितीही चालकांना देण्यात आली.

ही कार्यशाळा जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तथा वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस निरीक्षक विलास पाटील यांच्या आदेशानुसार आयोजित करण्यात आली. यावेळी शाळेच्या प्राचार्या गावंडे मॅडम, खत्री सर तसेच स्कूल बस व ऑटो रिक्षा चालक-मालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्यांवर पोलिसांचा दणका

## ड्रंक अँड ड्राइव्ह कारवाईत दोघांवर गुन्हे

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक नियंत्रण शाखेने शुक्रवारी (१७ जुलै) विशेष ड्रंक अँड ड्राइव्ह मोहीम राबवत दारूच्या नशेत वाहन चालविणाऱ्या दोन चालकांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत एक ॲक्टिव्हा मोपेड व एक हिरो होंडा दुचाकी जप्त करण्यात आली असून दोन्ही चालकांवर मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले.



पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर विशेष नाकाबंदी व ब्रेथ ॲनालायझर तपासणी मोहीम राबविण्यात आली. ईतवारा परिसरात वाहतूक शाखेच्या पथकाने तपासणीदरम्यान एमएच-३२-बीए-४५३० क्रमांकाच्या ॲक्टिव्हा मोपेडचा चालक सुनील अरुणराव दुरतकर (वय ३७, रा. केळकरवाडी, गोंड प्लॉट, वर्धा) हा मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविताना आढळला. ब्रेथ ॲनालायझर चाचणीत अल्कोहोल आढळल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

त्यानंतर एमएच-३२-एपी-४९४६ क्रमांकाच्या हिरो होंडा दुचाकीचा चालक किशोर नागोराव पराते (वय ४८, रा. इंझापूर वॉर्ड क्र. १, बोरगाव मेघे) याची तपासणी करण्यात आली. त्याच्या शरीरात अल्कोहोल आढळून आल्याने त्याच्या विरुद्धही कलम १८५ अन्वये कारवाई करण्यात आली. वाहतूक शाखेच्या माहितीनुसार, २०२६ मध्ये आतापर्यंत ड्रंक अँड ड्राइव्हच्या २५८ कारवाया, ५८ परवाने निलंबनासाठी प्रस्तावित, हेल्मेट नियमभंगाच्या ३,४८५ कारवाया तसेच अवैध प्रवासी वाहतुकीच्या ११३ कारवाया करण्यात आल्या आहेत.

# १२ वर्षीय मुलीवरील अत्याचार-हत्येप्रकरणी आरोपीला फाशीची शिक्षा द्या

## वडनेरमध्ये नागरिकांचा निषेध मोर्चा मुख्यमंत्र्यांना दिले निवेदन

**हिंगणघाट जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यातील तिगावजवळील रोठा येथे १२ वर्षीय अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचारानंतर करण्यात आलेल्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ हिंगणघाट तालुक्यातील वडनेर येथे सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी निषेध मोर्चा काढला. यावेळी आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत मुख्यमंत्री यांच्या नावे वडनेर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले.



निवेदनात या घटनेचा तीव्र निषेध नोंदवून अशा अमानवी कृत्यामुळे संपूर्ण राज्य हादरल्याचे नमूद करण्यात आले. महिलां व बालिकांच्या सुरक्षेसाठी कठोर उपाययोजना करण्याबरोबरच आरोपीवर जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरातील कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व गुरुदयालसिंग जुनी यांनी केले. यावेळी पंढरी शिवणकर, नारायण कुंभारे, संजय लोकरे, ज्ञानेश्वर माणिकपुरे, रायबहादूर जुनी, अजिंक्य गुजरकर, आनंदसिंग टाक, सिद्धांत भगत, रुपेश मेश्राम, हेमंत ब्राह्मणे, प्रशांत दरोडे, राजेंद्र भोरे, किशोर शेख, दिनेश चंदनखेडे, सचिन महाजन यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते. दोषींना कठोर शिक्षा झाल्यासच समाजात कायद्याचा धाक निर्माण होऊन अशा घटनांना आळा बसेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# करही नाही, सुविधाही नाही

## दहा वर्षे २० कुटुंबांची प्रशासनाकडून फरफट

### मनसेचा आंदोलनाचा इशारा

**वर्धा जनमाध्यम :** बोरगाव (मेघे) येथील सर्वधर्मनगरीत गेल्या दहा वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या सुमारे २० कुटुंबांना ग्रामपंचायतीकडून मालमत्ता कर आकारणीही होत नाही आणि मूलभूत सुविधाही मिळत नसल्याचा गंभीर आरोप करीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने जिल्हा परिषद प्रशासनावर हल्लाबोल केला आहे. या प्रश्नावर तातडीने तोडगा काढावा, अन्यथा तीव्र लोकशाही मार्गाने जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला.



मनसेचे वर्धा तालुकाध्यक्ष धर्मदीप हिवरकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, सर्वधर्मनगरीतील कुटुंबांनी स्वतःची घरे उभारून अनेक वर्षांपासून वास्तव्य केले आहे. मात्र, ग्रामपंचायतीने अद्याप त्यांच्या घरांची कर आकारणी केली नसल्याने त्यांना कर पावती मिळत नाही.

परिणामी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यास अडथळे निर्माण झाले असून पिण्याचे पाणी, रस्ते व नाल्यांसारख्या मूलभूत सुविधांपासूनही नागरिक वंचित आहेत.

ग्रामपंचायतीकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासकीय कर्मचारी केवळ टाळाटाळ करीत असल्याचा आरोप मनसेने केला.

जिल्हा परिषद प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कर नोंदणी पूर्ण करावी व परिसरातील विकासकामे सुरू करावीत, अशी मागणी करण्यात आली. यावेळी वैशाली उखाडे, सोनू कांबळे, देवानंद डूबडूबे, प्रेम नागेश्वर आणि सोनू खात उपस्थित होते.

# भर रस्त्यात बंद पडू लागल्या दुचाकी

## इथेनॉल मिश्रित पेट्रोलवर संशय

### आष्टी तालुक्यात वाहनचालक हैराण; एका दिवसात शंभरहून अधिक वाहने नादुरुस्त झाल्याचा दावा

**आष्टी शहीद जनमाध्यम :** तालुक्यातील विविध पेट्रोल पंपांवर उपलब्ध असलेल्या इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळे दुचाकी वाहनांमध्ये तांत्रिक बिघाड होत असल्याची तक्रार वाहनचालकांकडून पुढे येत आहे. विशेषतः ई२० इंधनाचा वापर केल्यानंतर अनेक दुचाकी भर रस्त्यात अचानक बंद पडत असल्याचा दावा नागरिकांनी केला असून, त्यामुळे वाहनचालकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.



शनिवार, १८ जुलै रोजी तालुक्यात शंभरहून अधिक दुचाकी वाहने नादुरुस्त झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अनेक वाहनचालकांना वाहने रस्त्यावरच ढकलत गॅरेजपर्यंत नेण्याची वेळ आली. या प्रकारामुळे शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार तसेच ग्रामीण भागातून ये-जा करणाऱ्या नागरिकांचा मोठा वेळ वाया गेला.

दरम्यान, विविध ऑटोमोबाईल गॅरेज आणि सर्व्हिस सेंटरमध्ये नादुरुस्त वाहनांची मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले. एकाच वेळी मोठ्या प्रमाणात वाहने दुरुस्तीसाठी आल्याने मेकॅनिकवर अतिरिक्त ताण निर्माण झाला असून, अनेक ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत.

वाहनचालकांच्या म्हणण्यानुसार, जुन्या मॉडेलच्या अनेक दुचाकी ई२० इंधनासाठी पूर्णपणे अनुकूल नसल्याने इंजिन मिसफायर होणे, स्टार्ट न होणे, वेग कमी होणे किंवा वाहन अचानक बंद पडणे अशा समस्या जाणवत आहेत. त्यामुळे संबंधित तेल कंपन्या, पेट्रोलियम विभाग आणि परिवहन प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन वस्तुस्थिती स्पष्ट करावी तसेच वाहनचालकांना योग्य मार्गदर्शन करावे, अशी मागणी होत आहे.

# धुळफवारणीचा विसर; डासांच्या विळख्यात सिंदी शहर

## साथीचे आजार वाढले, पालिकेच्या उदासीनतेवर नागरिकांचा आक्रोश

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** पावसाळा सुरू होताच सिंदी शहरात डासांचा प्रचंड उपद्रव वाढला असून ताप, सर्दी, खोकला आणि इतर साथीच्या आजारांनी नागरिक हैराण झाले आहेत. शहरातील रुग्णालयांमध्ये रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना नगरपालिकेचे प्रशासन मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अद्यापही शहरात धुळफवारणी सुरू न झाल्याने पालिकेच्या कारभाराविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

शहरातील अनेक नाल्यांमध्ये सांडपाणी आणि शौचालयांचे ओव्हरफ्लो पाणी मिसळत असल्याने घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यातून डासांची मोठ्या प्रमाणात उत्पत्ती होत असून साथीच्या आजारांना खतपाणी मिळत आहे. प्राथमिक आरोग्य केंद्राकडून डास निर्मूलन आणि



स्वच्छतेबाबत वारंवार सूचना देण्यात आल्या, तरी पालिका प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे पावसाळ्यापूर्वी करावयाची नालेसफाईची कामे आता सुरू करण्यात आली असून यावरून पालिकेच्या नियोजनशून्य कारभाराचा पर्दाफाश झाला आहे. मागील वर्षीही धुळफवारणीसाठी नागरिकांना लेखी निवेदन देऊन मागणी करावी लागली होती. शहरातील अनेक सार्वजनिक विद्युत खांबांवरील बंद दिवेही वेळेवर सुरू होत नसल्याने नागरिकांना अंधार आणि असुरक्षिततेचा सामना करावा लागत आहे. कर भरूनही मूलभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पालिका आमचा जीव गेल्यावरच धुळफवारणी करणार का? डासांचे निर्मूलन नेमके कधी होणार असा प्रश्न सिंदीकरांनी उपस्थित केला असून तातडीने धुळफवारणी, स्वच्छता मोहीम आणि डास निर्मूलनाची प्रभावी उपाययोजना करण्याची जोरदार मागणी होत आहे.

# डॉक्टरांवरील हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवारी आर्वीत २४ तास आरोग्यसेवा बंद

## आपत्कालीन सेवा सुरू राहणार; आयएमएच्या आंदोलनाला स्थानिक डॉक्टरांचा पाठिंबा

**आर्वी जनमाध्यम :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या हिंसक हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने (आयएमए) २० जुलै रोजी सकाळी ६ ते २१ जुलै सकाळी ६ वाजेपर्यंत राज्यभर २४ तास नियमित आरोग्यसेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनाला प्रतिसाद देत आर्वी डॉक्टर असोसिएशननेही सोमवारी दवाखाने बंद ठेवण्याची घोषणा केली आहे.

आंदोलनादरम्यान बाह्यरुग्ण विभाग, नियोजित शस्त्रक्रिया आणि नियमित वैद्यकीय सेवा बंद राहतील. मात्र आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, प्रसूती सेवा आणि अन्य जीवनावश्यक उपचार पूर्ववत सुरू राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.




डॉक्टरांवरील हल्ला हा संपूर्ण आरोग्य व्यवस्थेवरील हल्ला असून, आरोग्य कर्मचाऱ्यांची सुरक्षा ही सुरक्षित रुग्णसेवेची पहिली अट असल्याचे आयएमएने म्हटले आहे. संघटनेने शासनाकडे डोंबिवली हल्ल्यातील आरोपींवर कठोर कारवाई, महाराष्ट्र मेडिकेअर कायद्यात सुधारणा, रुग्णालयांमध्ये २४ तास सुरक्षा व्यवस्था, आरोग्य क्षेत्रातील हिंसाचाराविरोधात शून्य सहिष्णुता धोरण आणि डॉक्टरांना कायदेशीर संरक्षण देण्यासह विविध मागण्या केल्या आहेत. शासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास १ ऑगस्टपासून राज्यभर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशाराही आयएमएने दिला आहे.


## जाहीर नामा

ये सुचित किया जाता है की,

मेरा पुरा नाम और सही नाम मुजिबूर रहेमान महेबूब खान है.

मुजेबूर रहेमान खान और मुजिबूर रहेमान खान ये दोनो एक ही व्यक्ती है...!

संपर्क :- मुजिबूर रहेमान खान

पत्ता:- काजी वॉर्ड हिंगणघाट, जिल्हा वर्धा ४४२३०१

मो.न. ७९७२८८३१४१

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावली

## ■ आंदोलनस्थळावरून रुग्णालयात हलवले, ■ समर्थकांमध्ये चिंतेचे वातावरण

नवी दिल्ली : सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण सुधारणा आणि पर्यावरण संवर्धनासाठी ओळखले जाणारे सोनम वांगचुक यांना सलग २१ दिवसांच्या आमरण उपोषणानंतर प्रकृती गंभीर झाल्याने शनिवारी पहाटे दिल्लीतील जंतर-मंतर येथील आंदोलनस्थळावरून तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. त्यांची तब्येत बिघडत असल्याने डाक्टरांच्या पथकाने वैद्यकीय तपासणी केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.वांगचुक यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमधील कथित गैरव्यवहार, परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेचा अभाव आणि शिक्षण क्षेत्रातील सुधारणांच्या मागणीसाठी हे उपोषण सुरू केले होते. त्यांच्या आंदोलनाला देशभरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच विविध सामाजिक संघटनांचा पाठिंबा मिळत आहे.

**९ किलोपेक्षा अधिक वजन घटले**

उपोषणाच्या काळात वांगचुक यांच्या आरोग्यावर सातत्याने डॉक्टरांचे लक्ष होते. वैद्यकीय अहवालानुसार त्यांचे ९ किलोहून अधिक वजन कमी झाले असून रक्तदाब आणि शरीरातील साखरेचे प्रमाणही चिंताजनकरीत्या घसरले आहे. डाक्टरांनी दीर्घकाळ उपोषण सुरू राहिल्यास यकृत,



मूत्रपिंड आणि हृदयासारख्या महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम होण्याचा धोका असल्याचा इशारा दिला होता.

**दिल्ली उच्च न्यायालयाचे आदेश**

वांगचुक यांच्या प्रकृतीबाबत दाखल झालेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि दिल्ली प्रशासनाला त्यांच्या आरोग्याची दररोज वैद्यकीय तपासणी करण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयाने आवश्यक वाटल्यास डाक्टरांच्या सल्ल्यानुसार तातडीने उपचार करण्यासही परवानगी दिली होती.

**आंदोलनस्थळी गोंधळ-**वांगचुक यांना रुग्णालयात हलविण्यात येताच जंतर-मंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. समर्थकांनी घोषणाबाजी करत सरकारने आंदोलनकर्त्यांशी तातडीने चर्चा करावी, अशी मागणी केली. काही आंदोलकांनी पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित करत त्यांना जबरदस्तीने हलविल्याचा आरोप केला.

**२० जुलैच्या संसद मोर्चाकडे लक्ष**

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी २० जुलै रोजी संसद भवनावर मोठा मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. आयोजकांच्या मते, लाखो विद्यार्थी आणि नागरिक या आंदोलनात सहभागी होण्याची शक्यता असून सरकारने शिक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि आंदोलनाच्या मागण्यांवर ठोस भूमिका घ्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

**देशभरातून चिंता व्यक्त-** वांगचुक यांच्या प्रकृतीबद्दल विविध सामाजिक कार्यकर्ते, कलाकार, राजकीय नेते आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी वांगचुक यांच्या आरोग्याची काळजी घेत सरकारने संवादाचा मार्ग स्वीकारावा आणि आंदोलनावर सकारात्मक तोडगा काढावा, असे आवाहन केले आहे. सध्या सोनम वांगचुक यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती डाक्टरांच्या देखरेखीखाली आहे. त्यांच्या प्रकृतीविषयी अधिकृत वैद्यकीय बुलेटिनची आणि आंदोलनाच्या पुढील भूमिकेची सर्वांना प्रतीक्षा आहे.

# जंतर-मंतरवर राडा! अभिजीत दिपके यांच्यावर महिलेने फेकली शाई, आंदोलनस्थळी गोंधळ

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** दिल्लीतील जंतर-मंतरवर काकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दिपके यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे. याच दरम्यान एक धक्कादायक घटना घडली आहे. एका महिलेने अभिजीत दिपके यांच्यावर शाई फेकली, ज्यामुळे आंदोलनस्थळी एकच गोंधळ उडाला. मात्र तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी तत्परता दाखवत त्या महिलेला पकडलं आणि पोलिसांच्या स्वाधीन केलं. सध्या पोलीस या महिलेची कसून चौकशी करत आहेत. आपल्यावर शाई फेकल्याच्या या घटनेनंतर अभिजीत दिपके यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म वर एक पोस्ट शेअर केली आहे. निळा माझा आवडता रंग आहे असं म्हटलं. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्लीपोलिसांनी ताब्यात घेउन उपचारासाठी सफदरजंग रुग्णालयात दाखल केलं आहे. यानंतर अभिजीत दिपके यांनी आमरण उपोषण सुरू केलं आहे.



# हा तर सत्तेचा माज, जो कायम चालणार नाही

**मुंबई :** सोनम वांगचुक यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर आंदोलन सुरूच राहणार असल्याची मोठी घोषणा क?क्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली आहे. या संपूर्ण घटनेवर अनेक नेत्यांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी देखील या सर्व घटनेवर सोशल मीडियावर पोस्ट करत प्रतिक्रिया दिली आहे. जितेंद्र आव्हाड यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवर पोस्ट करत लिहिले, हे भ्याड सरकार आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कासाठी आंदोलनास बसलेल्या सोनम वांगचुक यांना केंद्र सरकारने दिल्ली पोलिसांच्या मदतीने हटवले. यासोबतच आंदोलनकर्त्यांवर देखील पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला. गेल्या २० दिवसांपासून सोनम वांगचुक हे आंदोलनाला बसले होते. पण या गेंड्याच्या कातडीच्या सरकारने त्यांच्याशी साधी चर्चा करण्याचा देखील शिष्टाचार दाखवला नाही. हा सत्तेचा माज आहे, जो कायम चालणार नाही हे इथल्या उन्मत्त सत्ताधा-यांनी लक्षात घ्यावे.., असा इशाराही त्यांनी सरकारला दिला आहे.




# सोनम वांगचुक यांना हटवल्यानंतर अभिजीत दिपके आक्रमक

**नवी दिल्ली :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाला शनिवारी सकाळी नवे वळण मिळाले. नीट परीक्षेतील कथित अनियमिततेविरोधात उपोषण करणारे पर्यावरण अभ्यासक सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवून रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांमध्ये संतापाची लाट उसळली. या घडामोडीनंतर काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी स्वतः आमरण उपोषण सुरू करण्याची घोषणा केली आहे.अभिजीत दिपके यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले की, आजपासून ते उपोषणाला बसत असून २० जुलै रोजी नियोजित मोर्चाही पूर्वनियोजितप्रमाणे काढण्यात येणार आहे. सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवून हे आंदोलन संपेल, असा सरकारचा समज असेल तर तो चुकीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आंदोलन अधिक तीव्र स्वरूपात सुरूच राहील, असा इशाराही त्यांनी दिला. दिपके यांनी यावेळी केंद्र सरकारवरही जोरदार टीका केली. त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी पुन्हा एकदा केली. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील या प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी अभिजीत दिपके यांनी गंभीर आरोपही केले. आंदोलनादरम्यान सोनम वांगचुक यांच्याशी गैरवर्तन करण्यात आल्याचा तसेच स्वतःला मारहाण झाल्याचा आरोप त्यांनी केला. या घटनेमुळे आंदोलनस्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



# सोनम वांगचुक प्रकरणावर विरोधक आक्रमक

**मुंबई / प्रतिनिधी-** दिल्लीतील जंतरमंतर येथे नीट पेपरफुटी प्रकरणी सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान उपोषणाला बसलेले सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले आहे. सलग २१ दिवसांपासून सुरू असलेल्या उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या या भूमिकेचे राज्यातही तीव्र पडसाद उमटत आहेत. नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. शरद पवार यांनी सांगितले की, आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी म्हणजे केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा. देशातील शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी त्यांच्यावर होती. मात्र ती योग्य प्रकारे पार पाडण्यात अपयश आले. त्याचा फटका हजारो विद्यार्थ्यांना बसला. एवढे गंभीर प्रकरण असतानाही केंद्र सरकार केवळ बघ्याची भूमिका घेत आहे, असा आरोप त्यांनी केला. पाच-सहा दिवसांपासून त्यांना अटक होण्याची शक्यता व्यक्त केली जात होती आणि अखेर तेच घडले. मात्र सोनम वांगचूक यांना अटक करून हे आंदोलन थांबणार नाही. विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी सुरू झालेला हा लढा पुढेही सुरू राहणार आहे, असे पवार म्हणाले. पवार यांनी पुढे सांगितले की, या आंदोलनाला आता विविध राजकीय पक्षांचा पाठिंबा मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित हा प्रश्न असल्याने सरकारने दडपशाहीचा मार्ग न स्वीकारता संवाद साधावा आणि मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.




## अघोषित आणीबाणी -विजय वडेट्टीवार



काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोनम वांगचूक यांच्यावरील पोलिस कारवाईवरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. सत्य, अहिंसा आणि संविधानाच्या मार्गाने आंदोलन करणा-या एका निःशस्त्र गांधीवादी शास्त्रज्ञाला हजारो पोलिसांचा गराडा घालणे, हे केंद्र सरकारच्या असुरक्षिततेचे लक्षण आहे. सलग २० दिवस उपोषणामुळे अशक्त झालेल्या सोनम वांगचुक यांना संवाद न साधता जबरदस्तीने हटवणे ही लोकशाही नव्हे, तर हुकूमशाहीची ओळख आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर चर्चा करण्याऐवजी शिक्षणमंत्र्यांना वाचवण्यासाठी सरकारने दडपशाहीच्या सर्व मर्यादा ओलांडल्या असून, ही घटना अघोषित आणीबाणीची आठवण करून देणारी आहे, अशी घणाघाती टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

## लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक-रोहित पवार



सोनम वांगचूक प्रकरणावर आमदार रोहित पवारांनीही सरकारवर निशाणा साधला आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना जबरदस्तीने उपोषणस्थळावरून हलवून रुग्णालयात दाखल केले. यातून केंद्र सरकारला नेमका काय संदेश द्यायचाय? आम्ही आंदोलन मोडून काढू, पण आंदोलकांची मागणी मान्य करणार नाही, हाच तो संदेश आहे ना? अशी जबरदस्ती करण्यापेक्षा सरकार निष्क्रिय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा का घेत नाही? सरकारचा हा अहंकार लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहे.

## ही तर निव्वळ हुकूमशाही,दडपशाही- संजय राउत



खासदार संजय राउत म्हणाले, सोनम वांगचुक हे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी गेल्या २१ दिवसांपासून स्वतःच्या प्राणांची आहुती द्यायला बसले होते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची त्यांची प्रमुख मागणी होती, पण सरकारने तो राजीनामा घेतला नाही. त्यांच्या प्रश्नांचा निकाल लावण्याऐवजी पोलिसांनी त्यांना जबरदस्तीने उचलून रुग्णालयात नेले. सरकारने जाणीवपूर्वक बघ्याची भूमिका घेत थेट दडपशाहीचा अवलंब केला आहे. हा देश किती हुकूमशाहीच्या मार्गाने चालला आहे, हेच यातून दिसते.

## रामरक्षा आंदोलनावरून लक्ष वळवण्याचा डाव- दानवे



नागपूरमध्ये शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राममंदिर लुटीविरोधात रामरक्षा आंदोलनआणि मोठा एल्गार पुकारण्यात आला आहे. या बहुचर्चित आंदोलनावरून देशाचे आणि मीडियाचे लक्ष हटवण्यासाठीच जाणीवपूर्वक सोनम वांगचुक यांना आजच्याच दिवशी दडपशाहीच्या मार्गाने अटक करून रुग्णालयात हलवण्यात आले, असा दावा अंबादास दानवे यांनी केला आहे.

## हुकूमशाहीच्या मार्गाने आंदोलन चिरडले : ठाकरे



शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी परीक्षा पेपरफुटीविरोधातील आंदोलनावरून केंद्र सरकारवर जोरदार टीका केली आहे. भारताची लोकशाही संपत चालल्याचे जग पाहत आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा पेपरफुटीविरोधात केलेले शांततापूर्ण आंदोलन सरकारने दडपशाहीच्या बळावर मोडून काढले. स्वतःच्या अपयशावर संवाद साधण्याऐवजी हुकूमशाहीच्या मार्गाने आंदोलन चिरडण्याचे काम सुरू आहे, अशा शब्दांत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

## वांगचुक यांच्या आंदोलनाला जरांगेंचा पाठिंबा



२० दिवसांपासून उपोषण सुरू असतानाही केंद्र सरकार त्याची दखल घेत नाही. विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लागले असताना सरकार एका मंत्र्याला का पाठीशी घालत आहे? देशासाठी विद्यार्थी आणि जनता महत्त्वाची नाही का? असा सवाल मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांनी उपस्थित केला आहे.

# महाराष्ट्रातील खासगी रुग्णालयांमध्येही आता इच्छामृत्यूचे नियम लागू

**मुंबई / प्रतिनिधी-**महाराष्ट्र सरकारने रुग्णांच्या हक्कांशी संबंधित एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्यातील सरकारी आणि खासगी रुग्णालयांसाठी समान नियम लागू करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. निष्क्रिय इच्छामृत्यू आणि लिव्हिंग विल या संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी आता खासगी रुग्णालयांनाही करावी लागणार आहे. यासाठी राज्य सरकारने आवश्यक समिती स्थापन करण्याचे आदेशही जारी केले आहेत.लिव्हिंग विल म्हणजे एखाद्या व्यक्तीने पूर्ण शुद्धीमध्ये आणि स्वेच्छेने तयार केलेले असे लिखित निवेदन, ज्यामध्ये भविष्यात गंभीर किंवा असाध्य आजारामुळे स्वतः निर्णय घेणे शक्य नसल्यास कोणत्या प्रकारचे वैद्यकीय उपचार घ्यायचे किंवा टाळायचे, याबाबतची इच्छा नमूद केलेली असते. अशा इच्छेचा आदर करून उपचारांबाबत पुढील निर्णय घेतले जातात.या निर्णयामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत एकसमान धोरण लागू होणार असून, सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये गंभीर रुग्णांच्या उपचारांबाबत अधिक



स्पष्ट, पारदर्शक आणि कायदेशीर प्रक्रिया राबवली जाईल. रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण आणि आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात सन्मानाने निर्णय घेण्याचा अधिकार अधिक प्रभावीपणे अमलात आणण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाउल मानले जात आहे.

**खासगी रुग्णालयांनाही समान नियम-** यापूर्वी अशा प्रकरणांमध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये विशिष्ट प्रक्रिया राबवली जात होती. मात्र आता खासगी रुग्णालयांनाही त्याच कायदेशीर चौकटीचे पालन करावे लागणार आहे. त्यामुळे रुग्ण कोणत्याही रुग्णालयात उपचार घेत असला तरी त्याच्यासाठी एकसमान प्रक्रिया आणि निकष लागू होतील.

**समितीची महत्त्वाची भूमिका**

राज्य सरकारच्या आदेशानुसार प्रत्येक पात्र प्रकरणाची तपासणी आणि निर्णय प्रक्रियेसाठी समितीची स्थापना करण्यात येणार आहे. संबंधित रुग्णाची वैद्यकीय स्थिती, लिव्हिंग विलची वैधता आणि सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटींची पूर्तता झाली आहे का, याची समितीकडून सखोल पडताळणी केली जाईल. त्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल.

**रुग्णांच्या हक्कांचे संरक्षण**


सरकारच्या या निर्णयामागील प्रमुख उद्देश म्हणजे रुग्णांच्या स्वायत्ततेचा आणि सन्मानाने जगण्याबरोबरच सन्मानाने मृत्यू स्वीकारण्याच्या अधिकाराचा आदर करणे. असाध्य आजारामुळे कृत्रिम जीवनरक्षक यंत्रणांवर अवलंबून असलेल्या रुग्णांच्या बाबतीत निर्णय घेताना स्पष्ट आणि पारदर्शक प्रक्रिया उपलब्ध व्हावी, यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

**सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अंमलबजावणी**

निष्क्रिय इच्छामृत्यू आणि लिव्हिंग विलसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीच काही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. महाराष्ट्र सरकारचा हा निर्णय त्या मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगानेच घेण्यात आला आहे. त्यामुळे वैद्यकीय, नैतिक आणि कायदेशीर बाबींमध्ये समतोल राखत रुग्णांच्या इच्छेचा सन्मान करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# नीट पेपरफुटीनंतर आता गुणांचा घोटाळा?

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** नीट परीक्षेचा घोळ काही संपता संपत नाहीये. पेपरफुटीनंतर आता नीट परीक्षेचा निकाल वादात सापडला आहे. उत्तरपत्रिकेनुसार अपेक्षित मार्क आणि स्कोअर कार्डवरील मार्कमध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप परीक्षार्थींनी केला आहे. त्यामुळे आता नीटच्या निकालात घोटाळा आहे की काय अशी चर्चा सुरू झाली आहे. या निकालामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम असून त्यांनी कोर्टात दाद मागण्याची तयारी सुरू केली आहे. नीट यूजी २०२६ चा निकाल पुन्हा एकदा वादाच्या भोव-यात सापडला आहे. बीडमधील काही विद्यार्थ्यांनी उत्तरपत्रिकेनुसार अपेक्षित गुण आणि स्कोअर कार्डवरील गुणांमध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप केला आहे. बीडच्या सोहम गवते या विद्यार्थ्याला उत्तरपत्रिकेनुसार ५२२ गुण अपेक्षित असताना स्कोअर कार्डवर अवघे ९५ गुण आले आहेत. त्यामुळे सोहमने या निकालावर आक्षेप घेतला आहे.गवते कुटुंब या अनपेक्षित निकालामुळे धक्क्यामध्ये आहे. एवढी मेहनत घेउन नीट परीक्षेमधील गोंधळ आमच्या विद्यार्थ्यांचे भविष्य खराब करेल या भीतीने सोहमच्या वडिलांना अश्रू अनावर झाले आहेत. तर सोहमलादेखील मोठा धक्का बसला आहे. यावेळी त्याला कसं सावरलं हे आम्हाला माहिती, असं सोहमच्या आईने सांगितले आहे. उत्तरपत्रिकेनुसार अपेक्षित मार्क आणि स्कोअर कार्डवरील मार्क या तफावतीमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी असून, निकालात दुरुस्ती न झाल्यास न्यायालयात जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणावर नॅशनल टेस्टिंग एजन्सीकडून काय स्पष्टीकरण येते, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. नीट निकालातील या त्रुटीमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला असून, एनटीएने याची तातडीने दखल घेउन वस्तुस्थिती स्पष्ट करण्याची मागणी पालकांकडून केली जात आहे.




# वांगचुक सफदरजंग रुग्णालयात


**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** दिल्लीतील जंतर-मंतरवर गेल्या २० दिवसांपासून आमरण उपोषणाला बसलेले प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला आता एक नवे वळण मिळाले आहे. प्रकृती खालावल्यामुळे दिल्ली पोलिसांनी वांगचुक यांना जंतर-मंतरवरून हटवून थेट सफदरजंग रुग्णालयात दाखल केले आहे. वांगचुक हे नीट पेपर लीक प्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्याची मागणी करत २८ जूनपासून अन्नत्याग आंदोलन करत आहेत. वांगचुक यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर आता एकच चर्चा रंगली आहे की, दिल्लीत एम्स, आरएमएल आणि एलएनजेपीसारखी अतिशय नामांकित सरकारी रुग्णालये असतानाही पोलिसांनी त्यांना सफदरजंग रुग्णालयातच का नेले? यामागचे मुख्य कारण आता समोर आले आहे.डॉक्टरांच्या वैद्यकीय अहवालानुसार, गेल्या २० दिवसांच्या उपोषणामुळे सोनम वांगचुक यांचे वजन तब्बल ८ किलोपेक्षा जास्त कमी झाले आहे. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. दीर्घकाळ उपोषण सुरू राहिल्यास त्यांच्या शरीरातील अंतर्गत अवयवांवर गंभीर परिणाम होउ शकतो, अशी भीती ड?क्टरांनी व्यक्त केली होती. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयात त्यांच्या प्रकृतीबाबत सुनावणी झाली. न्यायालयाने प्रशासनाला वांगचुक यांची दररोज वैद्यकीय तपासणी करण्याचे आणि गरजेनुसार ड?क्टरांच्या सल्ल्याने उपचार करण्याचे आदेश दिले होते. याच आदेशाचे पालन करत पोलिसांनी त्यांना रुग्णालयात हलवले.



दिल्लीत अनेक जागतिक दर्जाची खाजगी आणि मोठी सरकारी रुग्णालये उपलब्ध असतानाही पोलिसांनी सफदरजंग रुग्णालयाची निवड केली. यामागचे सर्वात मोठे कारण म्हणजे, सफदरजंग रुग्णालय हे दिल्लीतील सर्वात मोठे सरकारी मल्टी-स्पेशालिटी रुग्णालय आहे.

# अहमदाबादमधील फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट; 8 ठार, 15 जखमी

**अहमदाबाद /वृत्तसंस्था-** गुजरात येथील अहमदाबाद येथे एका टाक्याच्या फॅक्टरीत मोठा स्फोट होउन आग लागल्याने आठ कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी १८ जुलै रोजी घडली आहे. या स्फोटाचा आवाज अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू आला. त्यामुळे संपूर्ण परिसरात अफरातफर माजली. प्राथमिक माहितीनुसार या स्फोटात आठ लोकांचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहे. अहमदाबाद येथील महमूदपुरा भागातील गॅट्रेड रोड येथील टॅलेंट फायरवर्क्स फॅक्ट्रीत मोठा स्फोट होउन आग लागली. त्यामुळे संपूर्ण भागात मोठा आवाज आल्याने घबराट पसरली. या दुर्घटनेत आता पर्यंत आठ जणांचे प्राण गेले आहेत. या स्फोटाची माहिती समजताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या. आणि जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करीत बचाव मोहीम सुरु केले आहे.



# एसटीची 13.56 टक्के भाडेवाढ म्हणजे महायुती सरकारचा सर्वसामान्यांच्या खिशावर आणखी एक डल्ला-वडेट्टीवार

**मुंबई /प्रतिनिधी-** एसटीच्या भाडेवाढीवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. एसटीची १३.५६ टक्के भाडेवाढ म्हणजे महायुती सरकारने सर्वसामान्यांच्या खिशावर मारलेला आणखी एक डल्ला आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ आणि इतर कारणांमुळे वाढत असलेल्या आर्थिक भारामुळे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने एसटीच्या प्रवासी भाड्यामध्ये तब्बल १३.५६ टक्के एवढी वाढ केली आहे. राज्य परिवहन प्राधिकरणाने भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिल्याने ही भाडेवाड लागू झाली आहे. आता या भाडेवाढीवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारवर जोरदार टीका केली आहे. एसटीची १३.५६ टक्के भाडेवाढ म्हणजे महायुती सरकारने सर्वसामान्यांच्या खिशावर मारलेला आणखी एक डल्ला आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली आहे.



एसटी महामंडळाने केलेल्या भाडेवाढीवर टीका करताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, महागाईने आधीच होरपळलेल्या जनतेवर महायुती सरकारने पुन्हा एकदा भाडेवाढ लादली आहे. विशेष म्हणजे जानेवारी २०२५ मध्येही एसटीच्या भाड्यात सुमारे १४.९५ टक्के वाढ करण्यात आली होती. म्हणजे अवघ्या दीड वर्षात सलग दोन वेळा भाडेवाढ करून सरकारने सामान्य प्रवासी, शेतकरी, विद्यार्थी आणि कामगारांच्या खिशावर घाला घातला आहे.डिझेलचे दर, देखभाल खर्च आणि कर्मचा-यांच्या भत्त्यांचे कारण पुढे केले जात आहे. पण सरकारने स्वतःचा उधळपट्टीचा खर्च कमी करण्याऐवजी त्याचा भार जनतेवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे. एसटीला सक्षम करण्यासाठी नियोजन, आर्थिक सुधारणा आणि पुरेसे अनुदान देण्याऐवजी प्रवाशांकडूनच वसुली करण्याचा मार्ग सरकारने निवडला आहे. एकीकडे नको असलेले हजारो कोटींचे प्रकल्प महाराष्ट्रावर थोपले जातात आणि दुसरीकडे एसटीसाठी सामान्य प्रवाशांवर भाडेवाढ लादली जात आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला.एसटी ही सर्वसामान्यांची जीवनवाहिनी आहे, महसूल वसुलीचे साधन नाही. महायुती सरकारने ही भाडेवाढ तातडीने मागे घ्यावी आणि जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## सुधारणांची कसोटी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा संगणकाधारित पद्धतीने घेण्याचा निर्णय ऑगस्ट २०२७ पर्यंत पुढे ढकलण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थी संघटनांच्या मागण्या, आयोगाच्या अधिकाऱ्यांचे मत आणि प्रशासनाची तयारी यांचा विचार करून आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार तसेच राज्याचे मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्यासमवेतच्या बैठकीत ही परीक्षा एक वर्षासाठी स्थगित करण्याची विनंती आयोगाला केली. गेल्या काही दिवसांत या विषयावर दोन परस्परविरोधी मते पुढे आली. एका बाजूला तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परीक्षा अधिक पारदर्शक, जलद, कार्यक्षम करण्याची भूमिका होती. दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांचा प्रश्न होता की, सुधारणा योग्य आहेत; परंतु त्या राबविण्याची वेळ आणि तयारी पुरेशी आहे का? दोन्ही भूमिका आपापल्या जागी योग्य आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची स्थापना १९६० मध्ये झाली. सहा दशकांत आयोगाने हजारो अधिकाऱ्यांची निवड केली. परंतु अलीकडील काळात परीक्षा वेळेवर न होणे, निकालांमध्ये विलंब, न्यायालयीन वाद, आरक्षणासंबंधीचे प्रश्न, कोव्हिडमुळे निर्माण झालेला अडथळा, वाढती उमेदवारसंख्या आणि भरती प्रक्रियेतील अनिश्चितता यामुळे आयोगाच्या परीक्षा वादाच्या केंद्रस्थानी आल्या. अनेकदा विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. काही वेळा परीक्षा पुढे ढकलल्या. काही भरती प्रक्रिया न्यायालयीन वादात अडकल्या. यामुळे आयोगाच्या प्रतिमेवर परिणाम झाला आणि परीक्षा व्यवस्थेत व्यापक सुधारणांची मागणी जोर धरू लागली. याच काळात देशभरातील भरती व्यवस्थेचे स्वरूप झपाट्याने बदलत गेले. बँकिंग क्षेत्रातील भरती, कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा, रेल्वे भरती, विविध केंद्रीय संस्थांच्या परीक्षा आणि राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या अनेक परीक्षा संगणकाधारित पद्धतीने होऊ लागल्या. परीक्षा आयोजित करण्याचा खर्च कमी झाला, निकाल जाहीर करण्याचा कालावधी कमी झाला आणि उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनातील मानवी हस्तक्षेपही घटला. एआय, डेटा विलेषण, बायोमेट्रिक प्रमाणीकरण आणि डिजिटल देखरेख यांसारख्या आधुनिक साधनांचा वापर वाढू लागला. यामुळे सर्व समस्या सुटल्या असे नाही. विविध भरती परीक्षा आणि प्रवेश परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिका गळती, तांत्रिक अडचणी, सर्व्हर डाऊन होणे, परीक्षा केंद्रांतील गैरव्यवस्था आणि सायबर सुरक्षेच्या त्रुटी यांसारख्या घटना समोर आल्या.

यामुळे एक गोष्ट स्पष्ट झाली की, तंत्रज्ञान सक्षम पायाभूत सुविधांवर, काटेकोर व्यवस्थापनावर आणि सातत्यपूर्ण देखरेखीवर अवलंबून असते. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनामागेही हीच भूमिका होती. देशातील बहुतांश राज्यांच्या नागरी सेवा परीक्षा तसेच केंद्रीय लोकसेवा आयोग यांची परीक्षा अजूनही ऑफलाईन पद्धतीनेच होते.मग महाराष्ट्र लोकसेवा आयोगच ?'सीबीटी?' पद्धतीचा आग्रह का धरत आहे, असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला असून तो विचारात घ्यायलाच हवा. संगणकआधारित पद्धतीने परीक्षा घेतल्यास त्यामध्ये तांत्रिक घोळ किंवा गैरप्रकार होण्याची शक्यता अधिक असते, अशी भीती उमेदवारांना वाटत आहे. ऑनलाईन परीक्षा अनेक सत्रांमध्ये घ्याव्या लागतात. त्यामुळे गुणांचे समानीकरण करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या ?'नॉर्मलायझेशन?' पद्धतीला विद्यार्थ्यांचा तीव्र विरोध आहे. कारण यामुळे हुशार उमेदवारांवर अन्याय होत असल्याचा आरोप आहे. शिवाय राज्यातील मोठा विद्यार्थीवर्ग ग्रामीण भागातून येतो. तिथे अद्यापही डिजिटल पायाभूत सुविधा शहरांइतक्या सक्षम नाहीत. अनेक विद्यार्थ्यांना नियमित संगणकावर परीक्षा देण्याचा अनुभव नसतो. शहरी आणि ग्रामीण भागातील इंटरनेट उपलब्धता, संगणक साक्षरता आणि तांत्रिक सुविधा यांतील तफावत पूर्णपणे कमी झालेली नाही. परीक्षा पद्धतीतील बदल करताना या वास्तवाकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणारे नाही. दुसऱ्या बाजूला सरकारच्या भूमिकेतही महत्त्वाचे मुद्दे आहेत. लाखो उमेदवारांसाठी पारंपरिक लेखी परीक्षा घेणे हे खर्चिक आणि वेळखाऊ आहे. प्रश्नपत्रिका छपाई, सुरक्षित वाहतूक, गोपनीयता, उत्तरपत्रिका तपासणी, निकाल जाहीर करणे, हरकतींचे निराकरण, न्यायालयीन प्रक्रिया अशा अनेक टप्प्यांत प्रचंड वेळ आणि मनुष्यबळ खर्च होते. संगणकाधारित परीक्षा या प्रक्रियेला गती देऊ शकतात. अनेक परीक्षा वर्षातून अनेक वेळा घेणे शक्य होऊ शकते. निकाल काही दिवसांत जाहीर होऊ शकतात. तथापि, सार्वजनिक धोरणशास्त्रात एक मूलभूत तत्त्व महत्त्वाचे मानले जाते. ते म्हणजे पुरेशी तयारी नसताना केलेली सुधारणा विरोधाला आमंत्रण देणारी ठरते. भारतातील अनेक धोरणात्मक निर्णयांमध्ये हा अनुभव वारंवार येतो. प्रत्यक्षात बदल जितका मोठा, तितकी त्याची पूर्वतयारी अधिक व्यापक असावी लागते. नवीन सुधारणा लागू करताना एका व्यवस्थेकडून दुसऱ्या व्यवस्थेकडे होणारे बदल सुरळीत असावे, जेणेकरून विद्यार्थ्यांना आणि यंत्रणेला सज्जतेसाठी पुरेसा वेळ मिळेल, असे मत बैठकीत फडणवीस यांनी मांडले. टप्प्याटप्प्याने सुधारणा राबवताना संगणकआधारित परीक्षांची प्रक्रिया लगेच लागू करू नये. ही पद्धत ऑगस्ट २०२७ पासून अंमलात आणावी. तोपर्यंत ऑफलाईन पद्धतीनेच परीक्षा घ्यावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. आता चेंडू 'एमपीएससी?'च्या कोर्टात आहे. यामध्ये प्रशासनाची सज्जता, विद्यार्थ्यांची तयारी आणि यंत्रणेची क्षमता यांना प्राधान्य दिले आहे. सार्वजनिक धोरणात याला टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी असे म्हणतात. अनेक देशांनी मोठ्या प्रशासकीय सुधारणांमध्ये हाच मार्ग स्वीकारला आहे. प्रश्न एवढाच आहे की, ऑगस्ट २०२७ पर्यंतचा हा कालावधी सरकार आणि एमपीएससी कसा वापरतात? जर हा काळ केवळ निर्णय पुढे ढकलण्यात गेला, तर २०२७ मध्येही हाच वाद पुन्हा उभा राहील. परंतु या दोन वर्षांत डिजिटल पायाभूत सुविधा उभारल्या, विद्यार्थ्यांना व्यापक प्रशिक्षण दिले, परीक्षा केंद्रांचे मानकीकरण केले आणि सर्व यंत्रणा प्रत्यक्ष चाचण्यांमधून तपासल्या, तर महाराष्ट्र देशातील सर्वात विश्वासार्ह डिजिटल परीक्षा प्रणाली उभारू शकतो. महाराष्ट्राने हे आव्हान स्वीकारायला हवे. 'नीट?' परीक्षेतील गैरप्रकारांचे धागेदोरे महाराष्ट्रात सापडल्यामुळे राज्यातील शैक्षणिक विश्वाला मोठा धक्का बसला आहे. एमपीएससीच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घ्यायच्याच असतील तर अत्यंत काटेकोर व्यवस्था उभी करून नियोजनबद्धरीत्या त्या पार पाडाव्या लागतील. आज विद्यार्थी संघटनांचा याला विरोध असला तरी शासनाने पारदर्शकतेची हमी दिल्यास त्यांचा रोष मावळू शकतो. त्यामुळे सरकारने आणि राज्य लोकसेवा आयोगाने याबाबत संयुक्तरीत्या प्रयत्न करून हा प्रश्न कायमचा मार्गी लावायला हवा.

# बैलाविना शेतीला मजा नाही !



**रासायनिक खतांने पर्यावरणाचे जे नुकसान होत आहे, ते पाहता पुन्हा एकदा बैलांच्या शेतीकडे वळण्याची गरज अधोरेखित होत आहे. सेंद्रिय शेतीचा पाया बैलांच्या सान्निध्यात टिकून राहणाऱ्या नैसर्गिक चक्रावर अवलंबून आहे.**

कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता.

शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते

आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते.

शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी-बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात-पाय सुद्धा सुरक्षित राहतात.

आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे.

आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.

**रवींद्र तांबे**

# वांगचुक यांच्या लढ्याचे महत्त्व!

**सोनम वांगचुक हे लडाखच्या हिमालयातून दिल्लीत आले व त्यांनी देश वाचविण्याची हाक दिली. देशाला वाचविण्याची लढाई म्हणजे 'अडथळा' असे ज्यांना वाटते तेच देशाचे दुश्मन आहेत. लडाखमधील जमिनीवर कब्जा करून तेथील आदिवासींचे जनजीवन नष्ट करायचे, त्या जमिनींचा अदानींना कब्जा देऊन तेथे पर्यावरणास मारक उद्योग टाकायचे ही लूट आहे. वांगचुक यांनी त्याविरोधात आवाज उठवला तर ते मोदी यांना नकोसे झाले. आपल्या हक्कांसाठी लढणे हा स्वतंत्र भारतात गुन्हा ठरतो आहे. वांगचुक यांची लढाई आपल्या सगळ्यांची आहे. मनोज तिवारीसारख्यांना त्याचे महत्त्व कळणार नाही!**

ज्या पंतप्रधान मोदी यांनी सोनम वांगचुक यांना आपल्या राजकीय स्वार्थासाठी डोक्यावर घेतले, त्याच वांगचुक यांच्या विरोधात भाजप आज बदनामीच्या मोहिमा राबवत आहे. 'नीट' परीक्षा पेपरफुटीविरुद्ध शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी वांगचुक उपोषणाला बसले. २० दिवसांनंतरही उपोषण सुरू आहे. कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नाही ही त्यांची जिद्द आहे. देशासाठी बलिदान देण्याच्या सज्जतेनेच वांगचुक 'जंतर मंतर'च्या मैदानात उतरले आहेत. वांगचुक यांच्या उपोषणामुळे सरकारची कोंडी झाली आहे, पण मोदींचा अहंकार धर्मेंद्र प्रधानांना वाचवत आहे. वांगचुक ऐकत नाहीत हे समजल्यावर भाजपने त्यांच्या बदनामीची मोहीम सुरू केली. भाजपचे खासदार मनोज तिवारी यांनी सांगितले की, ''कोण वांगचुक? ते आम आदमी गँगचे सदस्य आहेत. भारताच्या विकासात वांगचुक अडथळे आणत आहेत. जनता त्यांना धडा शिकवेल.'' हे सर्व कोण सांगत आहे तर मनोज तिवारी. भोजपुरी चित्रपटात अश्लील, संस्कृतीहीन गाण्यांवर नाचणारा हा माणूस हे बोलतो आहे व भाजपकडून मनोज तिवारीला रोखले जात नाही. राममंदिरातील चोरीचे समर्थन करणारे हे लोक आहेत. त्यांच्याकडून दुसरी काय अपेक्षा करणार? मंदिराच्या दानपेटीतला पैसा हिंदूंनीच चोरला. त्यामुळे कुणाच्या पोटात का दुखावे? असा तर्क मांडणारे हे लोक सोनम वांगचुक यांच्या विरोधात बोलत आहेत. 'नीट' परीक्षा पेपरफुटीने लाखो विद्यार्थी डिप्रेशनमध्ये गेले. २०-२५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या,



पण मोदी यांच्या राज्यात जिवाची किंमत उरलेली नाही. त्यामुळे विद्यार्थी मरू द्या, शेतकरी मरू द्या, पुलवामात भारतीय सैनिक मरू द्या, कश्मीरात पर्यटक मरू द्या. लोकांच्या मरणाचे यांना काही पडलेले नाही. त्यामुळे २० व्या दिवशी कठोर उपोषणाने जर्जर झालेल्या वांगचुक यांच्या विषयी भाजपच्या संवेदना मेल्या आहेत.

वांगचुक यांच्या सोबत नेहा नावाची एक विद्यार्थिनी २० दिवसांपासून उपोषण करत आहे. तिचे उपोषण आणखी एक दिवस वाढले तर तिचे प्राण जातील अशी चिंता डॉक्टरांना वाटते, पण अशी चिंता पंतप्रधान मोदींना वाटते काय? मोदी असे वागतात हा कुसंगतीचा परिणाम आहे. गाझा पट्टीत ५० हजार लहान बालकांची कत्तल करणारे नेतान्याहू व इराणच्या शाळेवर बॉम्ब टाकून २०० मुलांचे प्राण घेणारे प्रे. ट्रम्प यांच्यासारखे राज्यकर्ते पंतप्रधान मोदींचे आदर्श आहेत. मोदी त्यांना मिठ्या मारतात. त्यामुळे वांगचुक यांच्या उपोषणाबाबत मोदी यांना काही वाटत असेल हा विचार निरर्थक आहे, पण मोदी मंत्रिमंडळातील इतर लोकही इतके अमानुष व नामर्द बनले आहेत काय? हेच लोक अण्णा हजारे यांच्या उपोषणाच्या वेळी दिल्लीच्या रस्त्यावर समर्थनार्थ मोर्चे काढीत होते. एकही मर्द 'माई का लाल' मोदी मंत्रिमंडळात निपजू नये की, ज्याने वांगचुक यांच्या समर्थनार्थ मंत्रीपदाचा राजीनामा फेकून 'जंतर मंतर'वर यावे. स्वतः मोदी हे 'मेलोडी' चॉकलेटचा पुडा घेऊन इटलीच्या सुंदर पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्या भेटीला जातात, पण आपल्या घरापासून फर्लांगभर अंतरावर असलेल्या वांगचुक यांच्यासाठी पाण्याचा ग्लास घेऊन जायला तयार नाहीत. हे क्रौर्य आहे, अहंकार आहे. हाच अहंकार रावणाचा, दुर्योधनाचा, हिटलरचा आणि इदी अमीनचाही होता. सिकंदर, नेपोलियनचाही होता. त्या अहंकाराची शेवटी माती झाली. औरंगजेबाचा अहंकार याच मातीत गाडला गेला. त्यामुळे वांगचुक यांच्या उपोषणाच्या निमित्ताने भाजपचा जो अहंकार फसफसत आहे तोसुद्धा नष्ट होईल. भाजपवाले म्हणतात, वांगचुक हे आम आदमी पार्टी गँगचे सदस्य आहेत. याच आम आदमी पार्टीने 'रामलीला' मैदानावर अण्णा हजारे यांचे उपोषण अकरा दिवस चालवले तेव्हा केजरीवाल यांची भगतगिरी भाजपही करत होता. हे साऱ्या देशाने पाहिले. भाजपही तेव्हा आम आदमी पार्टी गँगचा सदस्य होताच.

आम आदमी पार्टी म्हणजे 'अल कायदा' नाही. वांगचुक यांनी लडाखमध्ये घुसलेल्या चिनी सैन्याचा मुद्दा उपस्थित केल्यापासून भाजपच्या दृष्टीने ते देशद्रोही ठरले. वांगचुक यांना भारत सरकारने 'पद्म' पुरस्कार देऊन सन्मानित केले ते त्यांनी केलेल्या पर्यावरण, शिक्षण क्षेत्रातल्या भरीव कार्यामुळे. हिमालयाच्या अतिथंड आणि दुर्गम भागात देशाच्या सुरक्षेसाठी पहारा देणाऱ्या भारतीय जवानांसाठी सोनम वांगचुक यांनी सौर ऊर्जेवर चालणारे 'इन्सुलेटेड तंबू' तयार केले. बाहेरील तापमान '-१४' असले तरी या तंबूच्या आत तापमान '+१५' अंश राखले जाते. या संशोधनामुळे जवानांना बर्फाचा मारा, कडाक्याच्या थंडीपासून मोठा दिलासा मिळाला आहे. सोनम वांगचुक यांच्या कामाचा गौरव जागतिक पातळीवर झाला आहे. या सन्मानाचा ते कोणत्या राजकीय 'गँग'चे सदस्य आहेत याच्याशी संबंध नाही. सोनम वांगचुक यांनी त्यांचे प्राण पणाला लावले आहेत ते देशातील युवा पिढीच्या भविष्यासाठी. भारतातील शिक्षण पद्धती, परीक्षा हा एक फार्स बनला आहे. अयोध्येतील राममंदिरात भाजपचे चोर घुसले तसे राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेच्या यंत्रणेतही त्यांचे चोर घुसले व पेपर फोडून हाहाकार माजवला. देशाचा पाया उखडून फेकण्याचा हा डाव आहे. सोनम वांगचुक हे लडाखच्या हिमालयातून दिल्लीत आले व त्यांनी देश वाचविण्याची हाक दिली. देशाला वाचविण्याची लढाई म्हणजे 'अडथळा' असे ज्यांना वाटते तेच देशाचे दुश्मन आहेत. लडाखमधील जमिनीवर कब्जा करून तेथील आदिवासींचे जनजीवन नष्ट करायचे, त्या जमिनींचा अदानींना कब्जा देऊन तेथे पर्यावरणास मारक उद्योग टाकायचे ही लूट आहे. वांगचुक यांनी त्याविरोधात आवाज उठवला तर ते मोदी यांना नकोसे झाले. आपल्या हक्कांसाठी लढणे हा स्वतंत्र भारतात गुन्हा ठरतो आहे. वांगचुक यांची लढाई आपल्या सगळ्यांची आहे. मनोज तिवारीसारख्यांना त्याचे महत्त्व कळणार नाही!

**(साभार सामना)**

## क्रिकेट विश्वातील सुवर्ण युगाचा अंत

क्रिकेट जगतातील आतापर्यंतचे सर्वात महान अष्टपैलू खेळाडू म्हणून गणले गेलेले वेस्ट इंडिजचे माजी कर्णधार सर गारफिल्ड सोबर्स यांच्या निधनाने क्रिकेट विश्वातील एका देदीप्यमान आणि सुवर्ण युगाचा अंत झाला आहे. फलंदाजी, वेगवान गोलंदाजी, फिरकी गोलंदाजी आणि अप्रतिम क्षेत्ररक्षण अशा क्रिकेट खेळातील सर्वच आघाड्यांवर त्यांचे कमालीचे प्रभुत्व होते. ९३ कसोटी सामन्यांमध्ये त्यांनी ५७.७८ च्या सरासरीने केलेल्या ८०३२ धावा, घेतलेले २३५ बळी आणि ११० झेल ही क्रिकेट खेळामधल्या त्यांच्या अफाट क्षमतेची साक्ष देते. वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी त्यांनी पाकिस्तानविरुद्ध नाबाद ३६५ धावा ठोकल्या आणि कसोटीत त्रिशतक झळकावणारे जगातील ते सर्वात तरुण फलंदाज ठरले. इंग्लंडमधील 'काउंटी क्रिकेट' खेळताना माल्कम नॅश याच्या गोलंदाजीवर गॅरी सोबर्स यांनी एकाच षटकामध्ये सलग ६ षटकार ठोकले आणि असा पराक्रम करणारे ते जगातील पहिले फलंदाज ठरले. सर डॉन ब्रॅडमन यांनी त्यांचे 'फाइव्ह-इन-वन क्रिकेटर' (एकाच वेळी पाच भूमिका बजावणारा क्रिकेटपटू) असे सार्थ वर्णन केले होते. आयसीसीने त्यांच्या सन्मानार्थ 'वार्षिक सर्वोत्तम क्रिकेटपटू' या पुरस्काराला 'सर गारफिल्ड सोबर्स ट्रॉफी' असे नाव दिले आहे. विशेष म्हणजे गॅरी सोबर्स हे केवळ क्रिकेटमधीलच अष्टपैलू खेळाडू नव्हते तर ते खऱ्या अर्थाने विविध खेळांमधील एक दिग्गज खेळाडू होते. क्रिकेट व्यतिरिक्त त्यांनी बार्बाडोस या देशाचे आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर गोल्फ, फुटबॉल, बास्केटबॉल या मैदानी खेळांबरोबरच डॉमिनोज या इनडोअर टेबल गेममध्ये प्रतिनिधित्व केले होते. क्रिकेटमधील त्यांच्या ऐतिहासिक योगदानासाठी त्यांना 'सर' ही उपाधी देण्यात आली. अशा या महान अष्टपैलू क्रिकेट खेळाडूला विनम्र श्रद्धांजली!

**-प्रदीप मोरे**

## राज्यातील परप्रांतीयांची वाढती मुजोरी चिंताजनक

महाराष्ट्रातील अनेक भागात अलीकडच्या काळात परप्रांतीयांची मुजोरी वाढतच चालली आहे. राजकीय पक्षांकडून मिळणाऱ्या पाठबळामुळे हे परप्रांतीय स्थानिक रहिवाशांवर हल्ले करत असतात. सध्या अनेक क्षेत्रामध्ये उत्तरेकडून आलेल्या हजारो परप्रांतीयांनी घुसखोरी करून आपली मक्तेदारी निर्माण केली आहे. इतर राज्यातून पोट भरायला महाराष्ट्रात येऊन येथील मराठी जनतेवरच हल्ले करणे अतिशय संतापजनक बाब आहे. विशेषतः मुंबई आणि ठाणे परिसरात परप्रांतीयांची मुजोरी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. ठाण्यामध्ये अलीकडेच झालेल्या एका घटनेमुळे मराठी माणूस संतापला आहे. रस्त्यावर घाण करू नको, थुंकू नको असे सांगणाऱ्या एका मराठी वयोवृद्ध व्यक्तीला एका परप्रांतीय कॅब चालकाने मारहाण केल्याचे प्रकरण हे त्यांच्या मुजोरीचेच ताजे उदाहरण आहे. सार्वजनिक स्वच्छतेविषयी सांगणाऱ्यांना मारहाण करणे जितके संतापजनक आहे तितकेच मारहाण होतानाचे दृश्य चित्रित करणेदेखील संतापजनक गोष्ट आहे. मोबाइलवर रिल्स तयार करणाऱ्यांपैकी एकजणही ज्येष्ठ नागरिकाला वाचवण्यास गेला नाही. यावरून सार्वजनिक ठिकाणी संवेदनशीलता हरवत चालल्याचेच पुन्हा पुन्हा निदर्शनास येत आहे. या घटनेची दखल सत्ताधारी नेत्यांनी घेतली असून मारहाण करणाऱ्याविरोधात तातडीची पोलिस कारवाई करणे शक्य झाले.

राज्यात गेल्या काही वर्षांपासून मराठी लोकांना मारहाण करण्यापर्यंत आता परप्रांतीयांची मोठी मजल गेली आहे. एकीकडे गुजराती लॉबी मातल्याचे दिसत आहे. तर दुसरीकडे उत्तर भारतातून जगायला आलेल्या लोकांकडूनही मराठी जनतेला गुंडगिरी सहन करावी लागत आहे. मुंबई, ठाणे, पुणे ही शहरे सध्या परप्रांतीयांच्या ताब्यात गेल्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. अशा परप्रांतीयांचे राजकीय पक्षातील लोकच त्यांना समर्थन करायला पुढे येत आहेत. उलट मराठी जनतेलाच दोष दिला जातो. यावरून महाराष्ट्रामध्ये नेमकी कोणाची सत्ता आहे, हेच कळावयास मार्ग नाही. मराठी भाषक जनतेच्या अस्मिता आणि स्वातंत्र्याशी सध्याच्या सत्ताधाऱ्यांना काहीही देणेघेणे उरलेले नाही. मतांची लाचारी पत्करल्यामुळे परप्रांतीयांना आज मराठी नेतेच उरावर येऊन नाचत आहेत. ज्या राज्यामध्ये पोटाची खळगी भरायला लोक हजारोंच्या संख्येने येतात त्यांना अडवण्याऐवजी त्यांच्यापुढे पायघड्या घातल्या जातात. त्या केवळ आपले राजकारण साधण्यासाठीच. त्यामुळेच ही परिस्थिती उदभवली आहे. याकडे असेच दुर्लक्ष होत गेल्यास महाराष्ट्र हे मराठी राज्य म्हणून राहणार नाही.

**प्रा. मधुकर चुटे**
नागपूर
९४२०५६६४०४

रविवार, दि. १९ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# पोलीस कर्तव्य परिषदेत आयजींचा सहभाग, प्रभावी गुन्हे नियंत्रणासाठी सूचना

## जिल्हा पोलीस मुख्यालयात गुन्हेगारी बैठक,अवधूतवाडी पोलीस ठाण्याची पाहणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १८ :** अमरावती परिक्षेत्राचे आयजीपी, डॉ. महेश पाटील यांनी यवतमाळ जिल्हा पोलीस मुख्यालयात आयोजित २१ व्या अमरावती परिक्षेत्र पोलीस कर्तव्य परिषदेत सहभाग घेतला. त्यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, गुन्हे नियंत्रण आणि प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतला आणि अधिकाऱ्यांना गुन्हेगारी प्रभावीपणे रोखण्यासाठी निर्देश दिले.

परिषदेपूर्वी, आयजींनी जिल्ह्यातील विविध प्रकारच्या गुन्ह्यांचा, त्यांच्या तपासातील प्रगतीचा आणि कायदा व सुव्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना गंभीर गुन्ह्यांचा निपटारा लवकरात लवकर करण्याचे, फरार आरोपींना अटक करण्यासाठी विशेष मोहीम राबवण्याचे आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. महिला आणि बालकांवरील गुन्हे, सायबर गुन्हे, अवैध मानवी तस्करी, अमली पदार्थांची तस्करी आणि संघटित गुन्हेगारी यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश आयजींनी अधिकाऱ्यांना दिले. त्यांनी पोलीस गस्त वाढवणे, संवेदनशील भागांमध्ये विशेष दक्षता ठेवणे आणि जनतेशी उत्तम संवाद प्रस्थापित करण्याच्या गरजेवरही भर दिला. त्यानंतर त्यांनी अवधूतवाडी पोलीस ठाण्याला भेट देऊन तेथील कामकाजाची पाहणी केली. त्यांनी ठाण्याची कागदपत्रे, गुन्हे नोंदवही, प्रलंबित खटले आणि इतर प्रशासकीय व्यवस्था यांचा आढावा घेतला, तसेच पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांचे काम अधिक प्रभावी व जनहितार्थ करण्याचे निर्देश दिले. जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी (एसडीपीओ), ठाणे प्रभारी, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिषदेत पोलीस यंत्रणा अधिक प्रभावी करणे, गुन्हेगारीला प्रतिबंध करणे आणि जनतेचा विश्वास दृढ करणे यासंबंधीच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# आभाळाकडे चिंतने पाहणाऱ्या बळीराजाची चिंता वाढली

## पावसाने ओढ दिल्याने शेतकरी संकटात!


✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ मनीष ढाले

**फुलसावंगी, दि. १८ :** चालू हंगामात पावसाने दीर्घ ओढ दिल्यामुळे आधीच अडचणीत सापडलेला बळीराजा आता पुरता हतबल झाला आहे. जून महिना कोरडा गेल्यानंतर जुलैचा पंधरवडा उलटूनही समाधानकारक पाऊस न झाल्याने, रोज सकाळी उठून आभाळाकडे अत्यंत चिंतेने पाहणाऱ्या बळीराजाची धास्ती आता कमालीची वाढली आहे. शेतातील पिके कोमेजू लागली असून, अनेक भागात दुबार पेरणीचे संकट गडद झाले आहे.

पेरण्या खोळंबल्या, पिके करपू लागली

दरवर्षी मृग नक्षत्राच्या सुरुवातीलाच शेतकरी पेरणीची तयारी करतो. मात्र, यंदा मान्सून वेळेत दाखल न झाल्याने आणि आल्यावरही तो गायब झाल्याने पेरण्या मोठ्या प्रमाणावर लांबल्या आहेत. ज्या



शेतकऱ्यांनी सुरुवातीच्या थोड्याफार पावसावर विसंबून धाडसाने पेरण्या उरकल्या होत्या, त्यांची कोवळी पिके आता कडक उन्हामुळे आणि पाण्याच्या अभावामुळे शेतातच करपून चालली आहेत. दुबार पेरणीची टांगती तलवार पावसाने पाठ फिरवल्यामुळे आधी पेरलेले महागडे बियाणे मातीमोल होण्याची भीती निर्माण झाली आहे.

### जलसाठे खालावले, चिंतेचे ढग दाटले

**केवळ शेतीच नाही, तर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची चिन्हे आहेत. परिसरातील लहान-मोठे जलाशय, बंधारे आणि विहिरींनी तळ गाठला आहे. भूजल पातळी खालावल्याने विहिरींचे पाणी आटले असून विंधनविहिरीही (बोअरवेल) निकामी ठरत आहेत.**

**हवामान खात्याने लवकरच मान्सून पुन्हा सक्रिय होण्याचा अंदाज वर्तवला असला, तरी प्रत्यक्षात ढग बरसत नाही तोपर्यंत बळीराजाच्या जिवाला लागलेला घोर मिटणार नाही. आता संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेची भिस्त वरुणराजाच्या कृपे वरच अवलंबून आहे.**

**- सलमान पठाण (स्थानिक शेतकरी)**

जर पुढील दोन ते तीन दिवसांत दमदार पाऊस झाला नाही, तर शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ येणार आहे. आधीच बियाणे, खते आणि मशागतीसाठी कर्ज काढलेल्या शेतकऱ्याला आता पुन्हा एकदा नव्या कर्जाचा आणि अतिरिक्त खर्चाचा डोंगर कसा उभा करावा, या चिंतेने ग्रासले आहे. पेरणीसाठी हातात होतं नव्हतं ते सगळं पणाला लावलं. आता पाऊस नसल्याने डोळ्यादेखत पिके सुकत आहेत. रोज सकाळी आभाळाकडे डोळे लावून बघतो, पण ढग न बरसताच निघून जातात. आता फक्त निसर्गाचाच भरवसा आहे.

# ईशान कंपनीच्या प्रदूषण व ओव्हरलोड वाहतुकीविरोधात काँग्रेसचे निवेदन

## चौकशी करून कठोर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १८ :** तालुक्यातील गणेशपूर परिसरातील ईशान कंपनीमुळे होत असलेल्या कथित वायू प्रदूषण, ओव्हरलोड वाहतूक तसेच त्यातून शेती, नागरिकांचे आरोग्य आणि रस्त्यांचे होत असलेले नुकसान या गंभीर प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तालुका काँग्रेस कमिटीने तालुकाध्यक्ष संदीप उर्फ लक्ष्मण बुरेंवार यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तसेच तहसीलदार यांना निवेदन सादर करून संबंधित कंपनीच्या कार्यपद्धतीची तातडीने सखोल चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



निवेदनात कंपनीमधून मोठ्या प्रमाणात होणाऱ्या धूर व प्रदूषणामुळे गणेशपूर परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असून अनेक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. कंपनीच्या प्रदूषणाचा परिणाम परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावरही होत असून श्वसनाचे आजार, धुळीचा त्रास आणि पर्यावरणीय हानी वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच कंपनीशी संबंधित ओव्हरलोड टिप्परद्वारे नियमबाह्य वाहतूक सुरू असल्याने रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली असून धुळीचे प्रमाण वाढल्यामुळे वाहनचालक, विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढल्याबरोबरच शेतमालाच्या वाहतुकीलाही अडथळे निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून त्यांना नुकसानभरपाई द्यावी तसेच ओव्हरलोड वाहतुकीवर तात्काळ आळा घालावा, अशी मागणी करण्यात आली आहे. संदीप उर्फ लक्ष्मण बुरेवार यांच्या नेतृत्वात देण्यात आलेल्या या निवेदनावर गणेश बेलेकार, सुरेंद्र गेडाम, रोकेश गायकवाड, उमेश्वर आत्राम, राजू उके, गोविंद बडरे यांच्यासह अनेक काँग्रेस पदाधिकारी व नागरिकांच्या स्वाक्षऱ्या असून निवेदनासोबत छायाचित्रे व अन्य पुरावेही प्रशासनाकडे सादर करण्यात आले आहेत.

# पांढरकवडा पोलिसांना NHIT चा CSR हातभार

## हेल्मेट, RO वॉटर कूलर व आधुनिक साहित्याचे वाटप



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १८ :** नॅशनल हायवे इन्फ्रा ट्रस्ट (NHIT) ने आपल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) उपक्रमांतर्गत पांढरकवडा पोलीस ठाण्याला आधुनिक कार्यालयीन साहित्य, अत्याधुनिक RO वॉटर कूलर आणि सर्व पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा हेल्मेटचे वाटप केले.

या उपक्रमामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेला बळ मिळण्यासोबतच पोलीस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांनाही अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. NHAI चे प्रकल्प संचालक प्रवीण बिजेवार यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक एल. डी. तवारे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप नरसाळे, सागर पेंडारकर, केलापूर टोल प्लाझाचे प्रमुख नीरज रामयानी तसेच NHIT चे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी प्रवीण बिजेवार यांनी पांढरकवडा येथील मुख्य 'वाय पॉईंट'वर लवकरच उड्डाणपुलाच्या कामाला सुरुवात होणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस निरीक्षक एल. डी. तवारे यांनी NHIT चे आभार मानले.

# निकृष्ट बियाणे विक्रीप्रकरणी बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स कंपनीवर दाखल करण्यात आला गुन्हा

## शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्याविरुद्ध कृषी विभागाची महत्त्वपूर्ण कारवाई

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभुळगाव, दि. १८ :** शेतकऱ्यांना बनावट व निकृष्ट दर्जाचे सोयाबीन बियाणे विकून फसवणूक केल्याप्रकरणी थेट जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील गेवराई बाजार येथील बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स या कंपनीवर बाभुळगाव पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बियाणे निरीक्षक तथा कृषी अधिकारी दत्तात्रय तमलवाड यांनी कायदेशीर फिर्याद दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार, कंपनीने बियाण्यांच्या बॅगवर 'बेस्ट कॉलीटी गॅरेंटेड १००% सेंटिसफिकेशन असा मोठा दावा केला होता. मात्र प्रत्यक्षात शेतात पेरल्यानंतर उगवण अत्यंत कमी झाली. तपासणी दरम्यान घेतलेल्या बियाण्यांच्या नमुन्यांच्या प्रयोगशाळा अहवालात हे बियाणे 'अप्रमाणित' असल्याचे निष्पन्न झाले. दर्जा निकृष्ट असल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पोलिसांनी कंपनीच्या विरोधात गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे. 'महागड्या दराने बियाणे घेतले. जाहिरातीनुसार उगवण झझली नाही. अल्प प्रमाणात उगवण झाली. पुन्हा पेरणी करावी लागणार असल्याने खर्च दुप्पट झाला' अशी खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

### बियाणे विक्रीवर कडक पाळत ठेवण्यात येईल

**दखल घेऊन नमुने घेऊन प्रयोगशाळेत पाठवण्यात आले होते. शेतकऱ्यांच्या तक्रारीची गंभीर अहवालात बियाणे अप्रमाणित आढळल्याने कंपनीवर फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. यापुढे तालुक्यात बियाणे विक्रीवर कडक पाळत ठेवली जाईल.**

**- दत्तात्रय तमलवाड,**
**बियाणे निरीक्षक प.स. बाभुळगाव**

# स्कूल बस युनियन महागावकडून ठाणेदार सेवानंद वानखेडे यांचा सत्कार

## वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ किरण नरवाडे

**महागाव, दि. १८ :** स्कूल बस युनियन, महागावच्या वतीने महागाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखेडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी ठाणेदार वानखेडे यांनी उपस्थित सर्व स्कूल बस चालकांना वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाळण्याचे आवाहन केले.



आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांची सुरक्षितता ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. वाहन चालविताना वेगमर्यादा पाळणे, वाहतुकीच्या नियमांचे पालन करणे, वाहनाची नियमित तपासणी करणे तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या कार्यक्रमाला स्कूल बस युनियन, महागावचे अध्यक्ष सुरेशराव यशवंत नरवाडे, उपाध्यक्ष प्रविणभाऊ तुकाराम सूर्यवंशी, सचिव प्रमोद संभाजी नरवाडे यांच्यासह संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वाहन चालक संजय राऊत, शुभम राऊत, लखन राठोड, बबन आडे, बाळू शिंदे, प्रमोद काळे, प्रल्हाद काठे, अक्षय वानखेडे, बाळू भाकरे, शाम सोळंके, रवि सोळंके, राजूभाऊ गोबडे, विनोद जाधव, संतोष वढते, पांडुरंग वानखेडे, सुरेंद्र वानखेडे, राम आडे, सचिन पाटील, प्रेम राठोड, संदीप दौलतदार, पंडित राठोड, रवि वानखेडे, अंकुश जाधव, प्रविण बुलबुले, जावेद खान, अमोल जाधव, इंगळे काका, अमोल अडकिने, संजय ठाकरे, लक्ष्मण पाटे, रुपेश भांगे, जीवन नरवाडे, राजु गावंडे,गजानन गावंडे, सदानंद भरवाडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमात वाहतूक सुरक्षिततेबाबत जनजागृती करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी सर्व चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे प्रामाणिकपणे पालन करण्याची ग्वाही दिली.

# विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारे अवाजवी दंड तात्काळ बंद करा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. १८ :** अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, पुसद नगरच्या वतीने आज सुधाकरराव नाईक इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पुसद येथील प्राचार्यांना विद्यार्थ्यांकडून विविध कारणांवर विनाकारण व बेकायदेशीर पद्धतीने आर्थिक दंड आकारला जात असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर निवेदन देण्यात आले.


निवेदनात विद्यार्थ्यांकडून अनुपस्थिती, मोबाईल बाळगणे, युनिट टेस्टमध्ये कमी गुण मिळणे आदी कारणांवर आर्थिक दंड आकारला जात असल्याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. तसेच दंडाची अधिकृत पावती दिली जात नसल्याने आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकतेचा अभाव असल्याचा मुद्दाही मांडण्यात आला. विद्यार्थ्यांच्या

## अभाविपचे निवेदन



शैक्षणिक व मानसिक हिताचा विचार करून अवाजवी दंड आकारणी तात्काळ बंद करावी, प्रत्येक शुल्क व दंडाची अधिकृत पावती द्यावी तसेच दररोज घेतल्या जाणाऱ्या लेखी परीक्षेच्या पद्धतीचा पुनर्विचार करावा, अशी मागणी अभाविपने केली आहे. यावेळी नगर मंत्री रुद्र दीपकसिंह परिहार, नगर सहमंत्री अजित पालवे, अर्जुन पांडे, पार्थ पुलाते, नंदू बर्दापुरे, तन्मय राठोड, सतीश खोकले, आशुतोष रनवाल, कार्तिक राठोड, प्रतीक गंगावणे तसेच विद्यार्थी परिषदेचे इतर कार्यकर्ते उपस्थित होते. प्राचार्यांनी निवेदन स्वीकारून विद्यार्थ्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.

## थोडक्यात



### मतदार यादीतील नाव नोंदणी फॉर्म २९ जुलै पूर्वी भरून द्या..!

**उपविभागीय अधिकारी यांचे आवाहन.!**

**पुसद:** पुसद विधानसभा क्षेत्रातील विशेष सखोल पुनरिक्षण SIR मतदार यादीतील राहिलेल्या नागरिकांनी बीएलओ कडून घेतलेले फॉर्म तात्काळ २९ जुलै पूर्वी भरून नोंदणी करा असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पुसद यांनी पत्रकार परिषदेमध्ये केले आहे. पुसद तालुक्यातील विधानसभेतील मतदार संख्या एकूण २ लाख २३ हजार यापैकी २ लाख ८१ हजार ४९५ फॉर्म वाटप करण्यात आले आहे यातील २ लाख ८८३ एवढे फॉर्म भरून डाटा एन्ट्री झालेलीआहे, या संख्येनुसार एकूण ६६% टक्के फॉर्म भरणे अद्याप पर्यंत झाले असून उर्वरित राहिलेले फॉर्म नागरिकांनी आप आपल्या मतदान केंद्रावर त्या ठिकाणी नेमण्यात आलेल्या तसेच विधानसभा क्षेत्रात एकूण मतदान केंद्र ३४३ व सह बी एल ओ ३४३ आहेत याठिकाणी फॉर्म देऊन तात्काळ ऑनलाईन नोंदणी करून घ्यावी. सध्या राज्यात आज रोजी यवतमाळ जिल्हा हा प्रथम क्रमांकावर असून यामध्ये पुसद तालुका हा मतदार नोंदणी प्रक्रियेमध्ये ३ क्रमांकावर आलेला आहे बी एल ओ कडून फॉर्म वाटप करणे व भरणे अद्याप पर्यंत अठरा दिवस होऊन ३० जून पासून ते २९ जुलै २०२६ हा कालावधी देण्यात आला आहे, यामध्ये पुसद तालुक्यातील श्रीरामपूर व पुसद शहर हे सर्वाधिक टक्केवारी मध्ये कमी असल्याने येथील मतदारांनी व नागरिकांनी या विशेष सखोल पुनरिक्षण SIR मतदार यादी मध्ये आपले फॉर्म भरून तात्काळ नोंदणी करावी अन्यथा मतदान यादीतील नाव नोंदणी न झाल्यास आपल्याला पुढील मतदानापासून मुकावे लागेल असे आज दिनांक १७ जुलै २०२६ रोजी सर्व मतदार तथा नागरिकांना उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल यांनी पत्रकार परिषदेमधून आवाहन केले आहे. तसेच नागरिकांच्या मदतीसाठी तहसील कार्यालय येथे मतदार सहाय्यता कक्ष सकाळी ८ ते रात्री १० वाजे पर्यंत हे नागरिकांच्या मदतीसाठी कक्ष चालू राहील नागरिकांना कोणतीही अडचण असल्यास या सहाय्यता कक्षावर जाऊन चौकशी करून आपले अडचण दूर करावी असे सुद्धा उपविभागीय अधिकारी यांनी कळविले आहे.

### वाढदिवसा निमित्य वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**झरी :** गुरुकुल कान्व्हेंट मुकूटबन विद्यालयात वर्ग पाचवीचा विद्यार्थी हर्षित



सुरावार यांनी आपल्या वाढदिवसा निमित्य वृक्षारोपण करून पर्यावरणाचा संदेश दिला . वाढदिवस केक कापून साजरा करण्याऐवजी त्यांनी शाळेत एक आंब्याचे रोपटे लावून वृक्ष प्रेमाची जाणीव विद्यार्थ्यांसमोर ठेवले . या प्रसंगी मुख्याध्यापक विलास चिट्टलवार प्रिया निब्रड विद्यार्थी मित्र परीवार वृक्षारोपण उपक्रमात सहभाग घेतला . लावलेल्या वृक्षाचे संवर्धन करण्याचा संकल्प केला . प्रत्येक वाढदिवशी एक झाड लावूया आणि पर्यावरणाचे रक्षण करुया या' असा संदेश देण्यात आला . हर्षित सुरावार यांच्या या उपक्रमाचे शाळा स्तरावरून कौतूक होत असून अशा उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास निश्चितच मदत होईल असा विश्वास मुख्याध्यापक विलास चिट्टलवार यांनी व्यक्त केला .

# निष्क्रिय सार्वजनिक शौचालयाच्या जागेवर 'वडार समाज भवन' उभारण्याची मागणी; नगर परिषदेकडे निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १८ :** शहरातील प्रभाग क्र. ०८ अंतर्गत सदानंद वार्ड, वडार चौक येथील अनेक वर्षांपासून वापरात नसलेले व जीर्ण अवस्थेत उभे असलेले महिला सार्वजनिक शौचालय हटवून त्या जागेवर वडार समाजासाठी सर्वसुविधायुक्त 'वडार समाज भवन' उभारण्यात यावे, अशी मागणी नगर परिषद उमरखेडचे मुख्याधिकारी व नगराध्यक्ष यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित सार्वजनिक शौचालयाचा अनेक वर्षांपासून कोणताही वापर होत नसल्याने ती वास्तू जीर्ण, धोकादायक व निष्प्रयोजन बनली आहे. नगर



परिषदेची ही मौल्यवान जागा सध्या कोणत्याही सार्वजनिक उपयोगात नसल्यामुळे तिचा लोकहितासाठी पुनर्वापर करणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

वडार चौक परिसरात वडार समाजाची मोठ्या प्रमाणात वस्ती असूनही समाजासाठी स्वतंत्र समाज भवन उपलब्ध नाही. त्यामुळे सामाजिक मेळावे, शैक्षणिक मार्गदर्शन, महिला बचतगटांचे उपक्रम, युवकांच्या बैठका, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच समाजहिताचे विविध उपक्रम आयोजित करण्यासाठी कायमस्वरूपी जागेचा अभाव जाणवत आहे. यामुळे समाजाच्या संघटनात्मक व सर्वांगीण विकासावरही परिणाम होत असल्याची भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली. नगर परिषदेने जनभावना लक्षात घेऊन निष्क्रिय सार्वजनिक शौचालय तातडीने पाडावे आणि त्या जागेवर आधुनिक सुविधा असलेले 'वडार समाज भवन' उभारण्यासाठी आवश्यक प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे नगर परिषदेच्या मालमत्तेचा लोकहितासाठी प्रभावी उपयोग होण्याबरोबरच वडार समाजाला कायमस्वरूपी सामाजिक व शैक्षणिक केंद्र उपलब्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

हे निवेदन नगरसेविका सौ. खुशबू पवन मेंढे व नगरसेवक श्री. अमोल दत्तात्रय तिवरंगकर यांनी सादर केले. यावेळी भाजपा युवा मोर्चा उमरखेड शहराध्यक्ष श्री. पवन मेंढे उपस्थित होते. त्यांनीही या मागणीला पाठिंबा देत नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या भावना व परिसराची गरज लक्षात घेऊन त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. वडार समाजाच्या सामाजिक प्रगतीसाठी हे समाज भवन महत्त्वपूर्ण ठरेल आणि शहराच्या विकासातही त्याची मोलाची भर पडेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

> **"वडार चौकातील महिला सार्वजनिक शौचालय अनेक वर्षांपासून बंद व निष्क्रिय आहे. नगर परिषदेची ही जागा लोकहितासाठी वापरली जावी, या उद्देशाने आम्ही येथे सर्वसुविधायुक्त 'वडार समाज भवन' उभारण्याची मागणी केली आहे. वडार समाजाकडे स्वतःचे समाज भवन नसल्यामुळे सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी मोठ्या अडचणी निर्माण होतात. नगर परिषद प्रशासनाने जनभावनांचा आदर करून हा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा. हा केवळ इमारतीचा विषय नाही, तर वडार समाजाच्या सन्मानाचा, एकतेचा आणि भावी पिढीच्या विकासाचा प्रश्न आहे. प्रशासन सकारात्मक निर्णय घेईल, अशी आम्हाला अपेक्षा आहे."**
>
> **-खुशबू पवन मेंढे**
>
> **नगरसेविका-प्रभाग क्रं.०८, उमरखेड नगर परिषद, सदस्य-महिला व बालकल्याण समिती**

# चांदूरबाजार तालुक्यात एस.आय.आर.चे काम युध्दपातळीवर

## ९८.४८ मतदारांच्या घरी पोहचले अर्ज...तर ४२.६१ टक्के डिजिटायझेशन

**चांदूरबाजार/वार्ताहर**
सध्या चांदूरबाजार तालुक्यात निवडणूक आयोगा व्दारे मतदार याद्यांच्या, विशेष सखोल पुनर्निरीक्षन कार्यक्रम सुरू आहे.३० जून पासून मतदार याद्यांच्या सखोल निरीक्षणला सुरवात झाली आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या, वेळेच्या आत विषेश सखोल पुनर्निरिक्षण होणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी चांदूरबाजार तालुक्यात एस.आय.आर.चे काम,युध्द पातळीवर सुरू आहे.

तालुक्यात १५ जुलै पर्यंत ९८.४८ मतदारांच्या,थेट घरापर्यंत विषेश पुनर्निरिक्षण अर्ज पोहचविण्यात आले आहे. तालुक्यात एकूण मतदारांची संख्या १लाख,६३ हजार ४२७ इतकी आहे.पैकी १ लाख ६०हजार ९५१ मतदारांच्या घरी, पुनर्निरिक्षण अर्ज बि.एल.ओ.मार्फत पोहचविलेले



आहेत. मतदारां कडून प्राप्त झालेल्या अर्जा पैका, ६९ हजार ६४० मतदारांच्या अर्जांचे डिजिटायझेशन करण्यात आले आहे.तर ९३ हजार,७८७ अर्ज डिजिटायझेशन करिता प्रलंबित आहेत.तालुक्यात डिजिटायझेशनची टक्केवार ४२.६१ इतकी आहे. एस.आय.आर.च्या कामासाठी तालुक्यात,७४६ कर्मचारी कार्यरत आहेत.यात १८८ बि.एल.ओ.,५६४ सहायक.८ ए.ई.आर.ओ. व १६ पर्यवेक्षक.तसेच निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार, अव्वल कारकून, ज्युनिअर क्लार्क, ऑपरेटर व १० युवा प्रशिक्षणार्थी यांचा समावेश आहे.

या.जिल्हाधिकारी व उपविभागिय अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली,नियोजित वेळेत एस.आय.आर.चे काम पूर्ण होण्यासाठी युध्दपातळीवर काम सुरू आहे.सदर काम वेळेत पूर्ण होण्यासाठी,मतदारांचे सहकार्य प्रशासनाला अपेक्षित आहे.

**योगोश गाडे,**
तहसीलदार
चांदूरबाजार

# घंटागाडीला हेल्परच नाही



### कचरा संकलनात अनियमितता, चालकांच्या अरेरावीची मुख्याधिकाऱ्यांकडे तक्रार

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**
नगर परिषद चांदूर रेल्वेच्या घनकचरा संकलन व्यवस्थेतील अनियमितता, घंटागाड्यांवर हेल्परचा अभाव आणि काही चालकांकडून नागरिकांशी होत असलेल्या कथित अरेरावी विरोधात ॲड. अहेफाज राराणी यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

भारत सरकारच्या घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार घराघरातून घनकचरा संकलनाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांवर आहे. या सेवेसाठी नागरिकांकडून करही आकारला जातो. मात्र प्रत्यक्षात काही भागांत घनकचरा संकलनाची घंटागाडी नियमितपणे येत नसल्याने नागरिकांना गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, अनेक ठिकाणी घंटागाडी घरासमोर न थांबवता पुढे निघून जाते. याबाबत चालकाला विचारणा केल्यास नागरिकांशी अरेरावीची भाषा वापरली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

याशिवाय अनेक घंटागाड्यांवर हेल्परच नसल्याने महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना तसेच घरातील इतर सदस्यांना स्वतःच कचरा घेऊन गाडीपर्यंत जावे लागते. त्यामुळे घराघरातील कचरा संकलनाची मूलभूत संकल्पनाच धोक्यात आली असल्याचे ॲड. अहेफाज राराणी यांनी म्हटले आहे. घनकचरा संकलन सेवा नियमित करण्यात यावी, प्रत्येक घंटागाडीवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, संबंधित चालकांच्या वर्तणुकीची चौकशी करून दोषी आढळल्यास त्याच्यावर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे. सदर तक्रार नगर परिषद चांदूर रेल्वे येथे सादर करण्यात आली असून, यावर प्रशासन कोणती भूमिका घेते आणि नागरिकांना दिलासा मिळतो का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# विद्यापीठाच्या विविध योजनांकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/का.प्र**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांकरिता विद्याधन योजना, विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती योजना, स्व. प्रा. रामप्रकाश श्यामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती योजना, संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना, विद्यार्थीनी बस पास सवलत योजना, संत गाडगे बाबा कमवा व शिका अशा विविध योजना विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येत आहेत. सत्र २०२६-२७ करिता सदर योजनांकरिता विद्यार्थ्यांनी अर्ज करुन योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.



यासंदर्भात विद्यार्थी विकास विभागाकडून सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, विभागप्रमुख, प्रभारी अधिकारी, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, पदव्युत्तर विभागाचे प्रशासकीय केंद्र यांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून सर्वसंबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर जावून होमपेजमधील विद्यार्थी विकास योजना या लिंकवर दिलेले आवेदनपत्र आपल्या महाविद्यालयांमधील पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून भरुन घ्यावेत, असे आवाहन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी केले आहे.

### ऑपरेशन कवच अंतर्गत प्रभात फेरी

**खल्लार** - पोलिस स्टेशन खल्लार अंतर्गत ऑपरेशन कवच अंतर्गत नशा मुक्त अमरावती जिल्हा या सबंधाने ठाणेदार रामकृष्ण सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली आज प्रभात फेरी काढण्यात आली.या प्रभात फेरीमध्ये दुय्यम ठाणेदार सुनिल पवार, पोलिस स्टेशनचे पोलिस कर्मचारी खल्लारचे सरपंच आरीफ शहा युनूस शहा, गावातील प्रतिष्ठित नागरिक, खल्लार हायस्कूलचे शिक्षक वृंद, पोलिस पाटील व विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.प्रभात फेरीची सुरुवात पोलिस स्टेशनमधून करण्यात आली पूर्ण गावातून प्रभात फेरी काढण्यात आली.



# ‘ऑपरेशन कवच’ अंतर्गत अमली पदार्थविरोधी जनजागृती रॅली

### विद्यार्थी, पोलीस व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग; ठाणेदार सूरज तेलगोटे यांचे व्यसनमुक्तीचे आवाहन

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**
महाराष्ट्र पोलिसांच्या ‘ऑपरेशन कवच’ अभियानांतर्गत अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्याविरोधात जनजागृती करण्यासाठी आसेगाव पूर्णा येथे शनिवारी जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. युवक व नागरिकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करून समाजाला अमली पदार्थांपासून दूर ठेवण्याचा संदेश या रॅलीद्वारे देण्यात आला.

या रॅलीत स्थानिक विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक, आसेगाव पूर्णा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तसेच गुप्तचर विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी अमली पदार्थांपासून दूर राहण्याचा संदेश देणारे फलक हातात घेत घोषणाबाजी करत गावातून जनजागृती केली.




रॅलीची सुरुवात आसेगाव पूर्णा पोलीस स्टेशन येथून झाली. अण्णाभाऊ साठे चौक, सुभाषचंद्र बोस पुतळा परिसर, आठवडी बाजार, मुख्य बाजारपेठ, गांधी चौक, ग्रामपंचायत कार्यालय, बसस्थानक तसेच गोटे भाऊसाहेब यांच्या निवासस्थानासमोरील मार्गाने पुन्हा पोलीस स्टेशन परिसरात रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले. ठाणेदार सूरज तेलगोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट केले. युवकांनी व नागरिकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून निरोगी, सुदृढ व व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थी, शिक्षक, पोलीस प्रशासन व नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही जनजागृती रॅली यशस्वी ठरली असून, परिसरात व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश पोहोचला.

### मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या दूरदृष्टीमुळे

# कुसुम प्लाझा अग्निकांडात दोन महिलांना जीवदान

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
अंजनगाव सुर्जी अंजनगाव सुर्जी शहराच्या मध्यवस्तीतील अत्यंत वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या कुसुम प्लाझाला लागलेल्या भीषण आगीत दोन महिलांचे प्राण वाचवण्यात यश आल्यामागे अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विजय लोहकरे यांचे काटेकोर नियोजन आणि पूर्वतयारी कारणीभूत ठरली आहे.



तीन मजली कुसुम प्लाझा इमारतीमध्ये बँक आणि डॉ. सरोदे यांचे रुग्णालय कार्यरत आहे. प्राथमिक माहितीनुसार इमारतीतील वीज मीटर असलेल्या भागात शॉर्ट सर्किट होऊन आगीने रौद्ररूप धारण केले. काही क्षणातच आगीच्या ज्वाळा आणि दाट काळा धूर थेट रुग्णालयाच्या वॉर्डपर्यंत पोहोचला. त्याच वेळी वॉर्डमध्ये दोन महिला अडकल्याची माहिती मिळताच एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच मुख्याधिकारी विजय लोहकरे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स माध्यमातून घटनास्थळाची माहिती घेऊन अग्निशमन विभागाची सूत्रे हाती घेतली. मालमत्तेचा विचार न करता सर्वप्रथम वॉर्डमध्ये अडकलेल्या महिलांना बाहेर काढण्याचे आदेश त्यांनी दिले.वर्दळीच्या ठिकाणी नागरिकांची गर्दी नियंत्रित करणे, बँकेतील महत्त्वाची कागदपत्रे आणि इतर मजल्यांवरील रुग्णालयाचे साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी अग्निशमन दलाच्या तुकड्या विभागून दिल्या.लोहकरे यांच्या या जलद निर्णयक्षमतेमुळे अग्निशमन दलाला दिशाहीन न होता काम करणे शक्य झाले. साधारण एक महिन्यापूर्वी त्यांनी अग्निशमन दलाच्या सर्व कर्मचाऱ्यांची आढावा बैठक घेऊन सविस्तर मार्गदर्शन केले होते.

आग लागल्यास मनुष्य जीवितहानी आणि वित्तहानी कशी टाळावी, धुरात अडकलेल्या व्यक्तींना कसे बाहेर काढावे, सर्वात आधी कोणती पावले उचलावीत’ याबाबत त्यांनी प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले होते. अग्निशमन कर्मचारी अरुण माकोडे,आशिष कोराखडे, कलाम भाई,मयुर नायडकर, पवन सहारे आणि आसिफ यांनी धूर आणि आगीची पर्वा न करता इमारतीत शिरून दोन्ही महिलांना सुखरूप बाहेर काढले.मुख्याधिकारी विजय लोहकरे यांच्या नेतृत्वाखाली अग्निशमन दलाने दाखवलेली तत्परता, योग्य समन्वय आणि कर्मचाऱ्यांचे धाडस यामुळे मोठी जीवितहानी टळली. वेळेत मदत मिळाल्याने दोन्ही महिलांनीही अग्निशमन दलाचे आभार मानले आहेत. कुसुम प्लाझातील या भीषण आगीत दोन महिलांसाठी देवदूत ठरलेल्या नगरपरिषदेच्या या संपूर्ण टीमचे शहरातून सर्वत्र कौतुक होत आहे.

# सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचांऱ्याचे प्रलंबित प्रश्न सोडवा - संभाजी रेवाळे

**अमरावती/का.प्र.**
सेवानिवृत्त शिक्षक,कर्मचारी संघटना जिल्हा अमरावतीने सेवानिवृत्त शिक्षकांचे मार्गदर्शक संभाजी रेवाळे यांचे नेतृत्वात तसेच मकसुद अली जिल्हाध्यक्ष, सुनिल केने जिल्हाध्यक्ष शिक्षक परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत शुक्रवार १७ जुलै रोजी सेवानिवृत्त शिक्षकांच्या समस्या मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प अमरावतीचे सत्यम गांधी यांचे समक्ष मांडून चर्चा करण्यात आली.



यामध्ये सेवानिवृत्तांना एक काल्पनिक वाढ मिळावी,सेवानिवृत्त व कार्यरत शिक्षकांना प्रभाराचा मेहनताना मिळावा, स्वग्राम प्रवास भत्ता विनाअट देण्यात यावा, पेन्शन निश्चीती, अंशदान, उपदान, जीपीएफ,गटविमा, थकबाकी प्रकरणे तातडीने मंजुर करावी,आदर्श शिक्षक पुरस्काराची वेतनवाढ देण्यात यावी, शिक्षकांचे बाजूने निकाल लागलेली न्यायालयातील प्रकरणे निकाली काढावित अशा विविध १४ मागण्यांचे निवेदन देण्यात आले.


सुरेंद्र पाथरे, जिल्हा सरचिटणिस, बाबाराव मेश्राम, साजीद अली, देवीदास खैरकर, अ फारूख अ खलील, किर्तीजन वानखडे, जगदीश ससाने, साहेबराव धरपाळ, सुभाष मेरी, विजय तेलंगे, रमेश मेश्राम यांनी उपस्थित राहुन चर्चेत भाग घेतला.

सेवानिवृतांच्या हक्काची एक काल्पनीक वेतनवाढ मिळावी यासाठी न्यायालयीन याचीका दाखल करण्यासाठी झालेल्या सभेत मिना पांडे, स्वाती चव्हान, नंदा सालबर्डे, अनिता कापडे, उद्धव दहाटे, रमेश मळसणे,राहुल शेंडे, जाकीर अहमद सै. अकिल, श्रीकृष्ण चौधरी, संजय वानखडे, बाबाराव देशमुख, ज्ञानेश्वर ढाकुलकर, मोहन धर्माळे, दामोदर देशमुख, राजेंद्र ढेंबरे, रविंद्र खलोकार, शरद पवार, अशोक बेरड, जगदीश ससाणे, रामदास घोम, छाया वानखडे,अरविंद पाथरे, राजेंद्र खोडे, पुंडलिक वितोंडे, गजानन बडवाईक, मनोज वांगे, सुशिल माडीवाले, मिलींद टूनूकले, जितेंद्र देशमुख, रमेश पटके, गजानन गिरणारे, विनोद सडेदार, राजकुमार धाकडे, बबनराव उपस्थित होते.

# संक्षिप्त

## घरात आढळला कोब्रा साप

**अचलपूर** - पावसाळा आला की सर्पदंशाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढतात. पण नागरिकांचा समयसूचकतेमुळे अनुचित घटना टाळू शकते.याचे उदाहरण म्हणजे अचलपूर शहरातील हिरापुरा निवासी राजू केदारे यांच्या घरी इंडियन कोब्रा हा साप निघाला. घराच्या मुख्य दरवाजाच्या मागे राजू केदारे यांना हा साप दिसला.त्यांनी यावेळी समयसूचकता दाखवित सर्पमित्रांना संपर्क केल.आणि सर्पमित्र वानखडे यांनी त्या सापाला अखेर पकडले.यामुळे अचलपूर नगर परिषद आरोग्य विभागाकडून पावसाळ्यात नाल्याची व झाडे-झुडपांची नियमित साफसफाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.साप दिसताना राजू केदारे यांनी शांतता ठेवीत कुटुंबियांच्या सदस्यांना याची माहिती दिली आणि तत्काळ सर्पमित्रांच्या मदतीने घटना टळली.जुळ्या शहरातील नागरिकांनी सर्पमित्रांचे संपर्क ठेवण्यास परिसरात साप आढळल्यास त्याचा रेस्क्यू करण्यास मोठी मदत मिळू शकणार आहे.



## गांधी विद्यालयात शिक्षक-पालक सभा

**अंजनगाव बारी** - गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बडनेरा येथे शिक्षक-पालक संघाची सभा उत्साहपूर्ण वातावरणात झाली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक व शिक्षक यांच्यात प्रभावी समन्वय राखण्याच्या उद्देशाने आयोजित या सभेला पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य विनोद चिंचोळकर होते.यावेळी शाळा समितीचे सभापती रामेश्वरजी लाड,विद्यालयाचे पर्यवेक्षक दिगंबर करडे, संगणक प्रशिक्षण वर्गाचे मार्गदर्शक जुनेजा, तसेच चांडक यांची प्रमुख उपस्थिती होती. शिक्षक प्रतिनिधी म्हणून चिरडे व बडगुजर यांनी मार्गदर्शनपर मनोगत व्यक्त केले. तसेच ठाकरे भेंडकर, दुधे, इंगोले ब्राह्मणे व लाड यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.पालकांनीही आपल्या सूचना,अपेक्षा व मनोगत व्यक्त करत विद्यालयाच्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांचे कौतुक केले.कार्यक्रमाचे संचालन विद्या घाटे यांनी केले, तर अभय राऊत यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे सभा यशस्वीरीत्या पार पडली.



## पंढरपूरसाठी विशेष बस सोडण्याची मागणी

**आसेगाव पूर्णा**- आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे दर्शनासाठी जाणाऱ्या तालुक्यातील भाविक व वारकऱ्यांच्या सोयीसाठी अंजनगाव सुर्जी आगारातून पंढरपूरकडे विशेष एसटी बसेस सोडाव्यात, अशी मागणी श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्था, कापुसतळ णीच्या वतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक (जिल्हा आगार प्रमुख), अमरावती यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अंजनगाव सुर्जी तालुक्यातून दरवर्षी आषाढी एकादशीनिमित्त मोठ्या संख्येने भाविक व वारकरी पंढरपूरला जातात. मात्र, अंजनगाव आगारातून थेट बससेवा उपलब्ध नसल्याने त्यांना गैरसोयीचा सामना करावा लागतो. तसेच, भाविकांच्या सुरक्षित व सुलभ प्रवासासाठी बसमधील चालक व वाहकांची नावे आणि मोबाईल क्रमांक ठळकपणे प्रदर्शित करावेत. प्रमुख मार्ग, वेळापत्रक व प्रवासभाडे निश्चित करून त्याची माहिती प्रसिद्ध करावी, जेणेकरून भाविकांना बस आरक्षित करणे व प्रवासाचे नियोजन करणे सोयीचे होईल, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.हे निवेदन श्री संत गाडगेबाबा बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा पक्षीमित्र अरुण वामनराव शेवाणे यांनी सादर करून एसटी प्रशासनाने भाविकांच्या हिताचा विचार करून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## अण्णाजी चौधरी यांचे निधन

**कुऱ्हा** - अंजनवती (ता.धामणगांव रेल्वे) येथील वयोवृद्ध जेष्ठ नागरिक अण्णाजी मारोतराव चौधरी यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी सोमवार, १३ जुलै ला वृद्धापकाळाने निधन झाले.यांच्या प्रश्चात पत्नी, नातू, नात, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.ॲड.अनुजा सुधारराव चौधरी यांचे आजोबा होय.स्व.अण्णाजी चौधरी यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरावरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचा आनंदोत्सव



**अमरावती** - येथील सामान्य रुग्णालय परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक संबधित कायदेशीर लढा स्मारक समितीने जिंकल्याने पुढील विस्ताराचा मार्ग मोकळा झाला त्याबद्दल रहाटगाव येथील आंबेडकरी संघटना व विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या संयुक्त विद्यमाने येथे आनंदोत्सव साजरा करण्यात आला.या प्रसंगी आंबेडकरी नेते मस्छिंद्र राऊत, विदर्भ राज्य आंदोलन समितीचे पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, शहर अध्यक्ष रियाज खान, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्मा राजपूत, अफसर भाई, जीवन पचगाडे यांच्या नेतृत्वात राहाटगावच्या मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी विदर्भ राज्य तसेच बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला.यावेळी मस्छिंद्र राऊत, प्राचार्य डॉ. राजपूत, राजेंद्र आगरकर, रियाज खान, गुणवंत वाहने, भीमराव नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मस्छिंद्र राऊत यांनी सांगितले की आम्ही सदैव विदर्भ राज्य आंदोलन समितीसोबत आहोत कारण आमच्या सर्व प्रश्नांचे उत्तर स्वतंत्र विदर्भ राज्यात दडलेले आहे आणि आम्ही ते मिळवणारच, यावेळी सचिन वानखेडे, संकेत चौधरी, प्रवीण वाकोडे, गजानन चक्रे, निलेश मोहोड, अजय वानखेडे, सूरज इंगळे, आशिष डोंगरे, किशोर वासनिक तसेच अनेक विदर्भवादी ग्रामस्थ सभेला उपस्थीत होते.

# अलविदा, किंग सोबर्स गॅरी! क्रिकेटच्या सर्वश्रेष्ठ अष्टपैलूचा अस्त



क्रिकेटमध्ये सहा चेंडूवर सहा षटकार मारणारे पहिले फलंदाज म्हणून गॅरी सोबर्स यांचा लौकिक होता. आज त्यांचे निधन झाले. त्यांच्याविषयी पूर्वी लिहिलेल्या लेखाचा काही भाग त्यांच्या स्मरणाथ.त्यांच्या हाताला बारा बोटे होती ही क्वचितच काही लोकांना ठाऊक होते!

२८ जुलै १९३६ रोजी बार्बाडोसमध्ये जन्मलेल्या सोबर्स यांच्या आयुष्याची सुरुवात मात्र सुखद नव्हती. ते अवघे पाच वर्षांचे असताना, दुसऱ्या महायुद्धात त्यांचे वडील गारफिल्ड स्ट. ऑबर्न सोबर्स ब्रिटिश सैन्यात सेवा बजावत असताना निधन पावले. वडिलांच्या छत्रछायेशिवाय वाढणे, आईवर आलेला संसाराचा भार आणि आर्थिक प्रतिकूलता, या परिस्थितीने त्यांच्या बालपणावर खोल परिणाम केला. बालपण दारिद्र्याच्या सावलीत गेले. जन्मतः त्यांच्या दोन्ही हातांना एक अतिरिक्त बोट होते; शस्त्रक्रियेद्वारे ती काढण्यात आली. प्रतिकूल परिस्थितीने त्यांना खचवले नाही; उलट जीवनाशी झुंज देण्याची जिद्द दिली. लहान वयातच क्रिकेट त्यांचे विश्व बनले आणि त्याच खेळाने त्यांना जगाच्या शिखरावर नेऊन उभे केले.

१९६५ ते १९७२ या काळात त्यांनी वेस्ट इंडिजचे नेतृत्व केले. त्यांच्या नेतृत्वाखाली कॅरिबियन क्रिकेटला आत्मविश्वास, आक्रमकता आणि कलात्मकता यांचे नवे परिमाण लाभले. त्यांच्या खेळात गेम प्रेशरपेक्षा खेळाचा आनंद अधिक होता. विजयासाठी झगडणे आणि तरीही खेळाचे सौंदर्य जपणे, ही त्यांची ओळख होती.

सोबर्स यांचे आयुष्य मात्र केवळ गौरवानेच भरलेले नव्हते. अपार लोकप्रियतेबरोबरच वादांनीही त्यांची साथ सोडली नाही. दक्षिण आफ्रिकेतील वर्णद्वेषाच्या काळात त्यांनी रोडेशियामध्ये खेळल्यामुळे त्यांच्यावर टीकेची झोड उठली. त्यांनी नंतर या निर्णयाबद्दल खंत व्यक्त केली.

आयुष्याच्या उत्तरार्धात मद्यपान, जुगार आणि आर्थिक अडचणींबाबत त्यांनी आत्मचरित्रात प्रामाणिकपणे कबुलीजबाब दिला. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील मानवी अपूर्णता लपून राहिली नाही; उलट त्यांच्या प्रामाणिकपणाला वेगळीच उंची मिळाली. त्यांच्या प्रौढ आयुष्यातील सर्वांत वेदनादायक प्रसंग मात्र त्यांच्या वैवाहिक आयुष्याचा विस्कटलेला संसार होता. त्यांनी ऑस्ट्रेलियन मॉडेल प्र्यू किर्बी यांच्याशी विवाह केला. काही वर्षांनी हा संसार तुटला. त्यानंतर त्यांना आपल्या वैयक्तिक आयुष्यातील काही निर्णयांबद्दल सार्वजनिक टीका आणि मानसिक त्रास सहन करावा लागला.

तथापि, या डार्क छटांपेक्षा त्यांच्या आयुष्याची आभा अधिक तेजस्वी होती. १९७५ मध्ये ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' हा किताब बहाल केला. १९९८ मध्ये बार्बाडोसने त्यांना 'राष्ट्रीय नायक' म्हणून सर्वोच्च नागरी सन्मान दिला. पुढे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने वर्षातील सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटूसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्काराला 'सर गारफिल्ड सोबर्स ट्रॉफी' असे नाव देऊन त्यांच्या योगदानाला जागतिक मान्यता दिली. हे कोणत्याही क्रिकेटपटूसाठी अमरत्वाचे प्रतीक आहे.

क्रिकेटबाहेरही ते बार्बाडोसचे सांस्कृतिक दूत बनून राहिले. नवोदित खेळाडूंना मार्गदर्शन करणे, क्रिकेटचा प्रसार करणे आणि आपल्या मातृभूमीबद्दल अपार अभिमान बाळगणे, ही त्यांची आयुष्यभराची भूमिका होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जागतिक कीर्ती आणि स्थानिक मातीचा गंध यांचा सुंदर संगम होता.

वयाच्या अवघ्या सतराव्या वर्षी त्यांनी वेस्ट इंडिजकडून कसोटी पदार्पण केले. सुरुवातीला त्यांची निवड डावखुऱ्या फिरकी गोलंदाज म्हणून झाली; परंतु काळाच्या ओघात त्यांनी स्वतःला जगातील सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक म्हणून घडवले. एवढ्यावरच ते थांबले नाहीत. डावखुरी वेगवान-मध्यमगती गोलंदाजी, पारंपरिक फिरकी आणि मनगटी फिरकी, या तिन्ही प्रकारांत ते तितक्याच सहजतेने गोलंदाजी करू लागले. क्रिकेटमध्ये असा सर्वसमावेशक खेळाडू पुन्हा जन्माला आला नाही, असे म्हटले जाते.

१९५८ मध्ये पाकिस्तानविरुद्ध नाबाद ३६५ धावांची खेळी करून त्यांनी कसोटी क्रिकेटमधील सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्येचा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. हा विक्रम तब्बल छत्तीस वर्षे अबाधित राहिला. १९६८ मध्ये नॉटिंगहॅमशायरकडून खेळताना त्यांनी माल्कम नॅशच्या एका षटकात सलग सहा षटकार ठोकून प्रथम श्रेणी क्रिकेटच्या इतिहासात अमर ठरले. या दोन घटनांनी त्यांचे नाव केवळ विक्रमांच्या पुस्तकातच नाही, तर क्रिकेटच्या लोककथांमध्येही कायमचे कोरले गेले.

त्यांची कारकीर्द केवळ आकड्यांत मोजणे म्हणजे पारा मुठीत पकडण्याचा प्रयत्न ठरावा. ९३ कसोटींमध्ये ८०३२ धावा, २६ शतके, २३५ बळी आणि १०९ झेल, ही आकडेवारी त्यांच्या महानतेची केवळ वरवरची गोष्ट. त्यांची खरी ओळख होती ती, कोणत्याही परिस्थितीत संघासाठी आवश्यक ती भूमिका निभावण्याच्या अद्वितीय क्षमतेची. संघाला फलंदाज हवा असेल तर ते भक्कम भिंत बनत; गोलंदाज हवा असेल तर घातक अस्त्र; आणि क्षेत्ररक्षक हवा असेल तर विजेच्या वेगाने झेपावणारे हात.

सोबर्स यांची फलंदाजी पाहणाऱ्यांच्या डोळ्यांत अजूनही त्यांचा सहज उंचावलेला बॅटचा फटका जिवंत आहे. त्यांच्या गोलंदाजीतील विविधता अजूनही क्रिकेटच्या पाठ्यपुस्तकात आदर्श गणली गेलीय. क्षेत्ररक्षणातील त्यांची चपळता आजही अनेक पिढ्यांसाठी सर्वोच्च मानक आहे.

एके काळी वेस्ट इंडिजचा संघ अख्ख्या क्रिकेट विश्वातला टॉपचा संघ होता. सोबर्स त्या संघाचे मानबिंदु होते! जवळजवळ सर्वच समकालीन महान खेळाडूंशी त्यांचे अत्यंत स्नेहाचे संबंध होते. फ्रँक वॉरेल यांना ते आपला आदर्श मानत. वॉरेल यांच्या नेतृत्वानेच वेस्ट इंडिज संघात आत्मविश्वास आणि ऐक्य निर्माण झाले, असे ते अनेकदा म्हणत.

रोहन कन्हाय, क्लाइव्ह लॉइड, वेस हॉल, चार्ली ग्रिफिथ यांच्याशी त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. पुढील पिढीतील व्हिव्ह रिचर्ड्स आणि ब्रायन लारा यांच्यासारखे दिग्गज त्यांना आपल्या प्रेरणास्थानी मानत. इंग्लंडमधील टेड डेक्स्टर, कॉलिन काउड्री आणि जिओफ बॉयकॉट यांच्याशीही त्यांची चांगली मैत्री होती. प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंसोबत सामना संपल्यानंतर तासन्तास क्रिकेटवर गप्पा मारणे, हा त्यांचा स्वभाव होता.

सोबर्स यांच्या व्यक्तिमत्त्वात अहंकार नव्हता. आपल्या यशाचा कधीही गवगवा न करता, नवोदित खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या तंत्रावर मार्गदर्शन करणे, हे काम त्यांनी आयुष्यभर केले. गॅरी सोबर्स यांना अखेरच्या काळात सर्वाधिक खंत वाटत होती ती वेस्ट इंडिज क्रिकेटच्या अधोगतीची. त्यांच्या काळात जगावर राज्य करणारा संघ नंतर सातत्याने खालावत गेला. मुलाखतींमध्ये ते वारंवार म्हणत की, कॅरिबियन बेटांतील अपार प्रतिभेला योग्य दिशा आणि शिस्त मिळाली, तर वेस्ट इंडिज पुन्हा उभा राहू शकतो. आपल्या क्रिकेट संस्कृतीचा होत चाललेला ऱ्हास त्यांना मनापासून वेदना देत असे.

एका जिंदादिल क्रिकेटपटूच्या आयुष्याचा प्रवास आज थांबला. ग्राऊंडवर आग ओकणारा हा माणूस रियल लाईफमध्ये अतिशय शांत होता. आपल्या चुका मान्य करणं सोपं नसतं आणि इतरांच्या चुका माफ करुन त्यांना योग्य मार्गावर आणण्यासाठी प्रयत्न करणं हे अधिक अवघड असतं! सोबर्सना ही दोन्ही कामे लीलया जमत! अलीकडील काळात बाजारू स्थितीत पोहोचलेल्या ह्या खेळात सोबर्ससारखे खेळाडू पुन्हा उदय पावतील की नाही हे कुणीही ठामपणे सांगू शकणार नाही.

डॉन ब्रॅडमन यांनी एकदा सोबर्स यांच्याबद्दल म्हटले होते की, तो पाच क्रिकेटपटूंच्या बरोबरीचा एकटा खेळाडू आहे.' या एका वाक्यात त्यांच्या अष्टपैलुत्वाचे सार सामावलेय. समकालीन खेळाडू त्यांना किंग म्हणत! क्रिकेटचा राजा! हेल्मेटचा मुकुट न घालता अतिशय निर्दयपणे समोरील गोलंदाजास तुडवून काढणारा किंग! अलविदा गॅरी द किंग!

**- समीर गायकवाड**

# मानवासाठी शाकाहारच का योग्य ?

'अहिंसा परमो धर्मः' हे भारतीय संस्कृतीचे कालातीत तत्त्व आहे. प्रत्येक सजीवामध्ये जीवन आहे, वेदना आहेत आणि जगण्याचा समान अधिकार आहे. म्हणूनच अन्न ही केवळ जिभेची चव नसून ती आपल्या विचारांची, संस्कारांची आणि संवेदनशीलतेचीही अभिव्यक्ती असते. आज आधुनिक विज्ञान, पर्यावरणशास्त्र आणि नैतिक तत्त्वज्ञान यांच्या प्रकाशात शाकाहाराचा विचार केला असता, तो अनेकांच्या दृष्टीने आरोग्यदायी, पर्यावरणपूरक आणि करुणेवर आधारित जीवनपद्धती म्हणून पुढे येतो.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले तर संतुलित शाकाहारी आहारात धान्ये, कडधान्ये, डाळी, फळे, भाज्या, सुकामेवा, बिया आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश असल्यास शरीराला आवश्यक असलेली बहुतेक पोषकद्रव्ये मिळू शकतात. अशा आहारामुळे तंतुमय घटक, जीवनसत्त्वे, खनिजे आणि विविध वनस्पतीजन्य जैवसक्रिय घटक भरपूर प्रमाणात मिळतात. अनेक संशोधनांमध्ये योग्य प्रकारे नियोजित शाकाहारी आहाराचा संबंध हृदयरोग, स्थूलता आणि काही चयापचयाशी संबंधित विकारांचा धोका कमी असण्याशी जोडला गेला आहे. अर्थात, कोणताही आहार संतुलित आणि पोषणदृष्ट्या परिपूर्ण असणे आवश्यक आहे; केवळ शाकाहारी किंवा मांसाहारी असणे हेच आरोग्याचे एकमेव मापदंड नाही.

काही विचारवंत असे मानतात की मानवी शरीराची रचना वनस्पतीजन्य अन्न सहज पचविण्यास अनुकूल आहे. आपल्या दातांची रचना, अन्न चावण्याची पद्धत, तुलनेने मोठी आतडी आणि तंतुमय अन्नाचे महत्त्व यांचा दाखला देत ते शाकाहाराला प्राधान्य देतात. दुसरीकडे, जीवशास्त्रातील अनेक अभ्यास मानवाला सर्वभक्षी (Omnivore) म्हणूनही वर्णन करतात. त्यामुळे या विषयाकडे पूर्वग्रहाऐवजी विवेकाने पाहणे आवश्यक आहे. तथापि, संतुलित शाकाहारी आहार आरोग्यपूर्ण जीवनासाठी पुरेसा ठरू शकतो, याबाबत व्यापक वैद्यकीय सहमती आढळते.

नैतिक दृष्टिकोनातून विचार केला असता शाकाहाराचा पाया करुणा, दया आणि अहिंसा यांवर उभा आहे. प्राणी हेही संवेदनशील जीव आहेत. त्यांनाही भीती, वेदना आणि मायेची जाणीव असते. केवळ चवीसाठी किंवा सवयीपोटी एखाद्या सजीवाचा जीव घेणे योग्य आहे का, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. महात्मा गांधी म्हणाले होते, 'एखाद्या राष्ट्राची महानता आणि नैतिक प्रगती त्याच्या प्राण्यांशी केलेल्या वर्तनावरून ओळखली जाते.' हे वचन आजही तितकेच अर्थपूर्ण आहे.

पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही हा विषय महत्त्वाचा आहे. वाढत्या लोकसंख्येसोबत अन्नउत्पादनाची मागणी वाढत आहे. मोठ्या प्रमाणावर पशुपालनासाठी जमीन, पाणी आणि इतर नैसर्गिक संसाधनांचा मोठा वापर होतो. हरितगृह वायूंचे उत्सर्जन, जंगलतोड आणि जैवविविधतेवरील



## वैज्ञानिक आणि नैतिक दृष्टिकोन

परिणाम या संदर्भातही अनेक संशोधनांत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. वनस्पतीआधारित आहाराचा अधिक वापर केल्यास पर्यावरणावरील ताण काही प्रमाणात कमी करण्यास मदत होऊ शकते.

भारतीय संस्कृतीत शाकाहाराला विशेष स्थान आहे. जैन, बौद्ध आणि हिंदू परंपरांमध्ये अहिंसा, संयम आणि सर्व जीवांप्रती करुणा यांना उच्च मूल्य दिले गेले आहे. योगशास्त्रातही सात्त्विक आहाराला मनःशांती, एकाग्रता आणि आध्यात्मिक प्रगतीस पूरक मानले जाते. 'जसा आहार, तसे विचार' ही म्हण मानवी जीवनातील आहाराचे मानसिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करते.

तथापि, समाजात विविध संस्कृती,परंपरा आणि जीवनपद्धती अस्तित्वात आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या आहाराच्या निवडीमागे वैयक्तिक, आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक कारणे असू शकतात. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीचा अवमान न करता शाकाहाराचे महत्त्व विवेकपूर्ण, वैज्ञानिक आणि संवेदनशील पद्धतीने मांडणे अधिक परिणामकारक ठरते. मतभेदांपेक्षा संवाद आणि जागरूकता यांना अधिक महत्त्व दिले पाहिजे.

आजच्या काळात शाकाहार हा केवळ अन्नाचा पर्याय नसून आरोग्य, पर्यावरण आणि करुणा यांचा समन्वय साधणारी जीवनशैली म्हणून अनेकजण स्वीकारत आहेत. निरोगी शरीर, शांत मन, पर्यावरणाचे संरक्षण आणि सर्व सजीवांबद्दलची दया या मूल्यांचा विचार केला तर शाकाहाराचा स्वीकार हा समाजासाठी सकारात्मक दिशा ठरू शकतो. शेवटी, खऱ्या अर्थाने प्रगत समाज तोच, जो आपल्या प्रगतीसोबत मानवतेची आणि सर्व जीवसृष्टीचीही काळजी घेतो. म्हणूनच शाकाहाराचा विचार हा केवळ ताटातील अन्नाचा नसून आपल्या संस्कृतीचा, विवेकाचा आणि करुणेचा विचार आहे.

**– कुमार व्यंकटेश नेरकर**
अमरावती
७६२०६८७३०३

# एआयची झपाट्याने वाटचाल

२०२२ मध्ये चॅटजीपीटी आले तेव्हा 'आर्टिफिशियल इंटीलिजन्स' (एआय) दारावर टकटक करत होते. चार वर्षात घरात राहणाऱ्यांची परवानगी न घेता जोरात दार ढकलून एआय घरात आले आहे. कदाचित अख्या घराचा ताबा देखील घेऊ शकेल. त्याला हवी तेवढी जागा दिली नाही तर तोडमोड करून, घरात आधी असणाऱ्या लोकांना बाहेर काढून स्वतःसाठी जागा करणार हे आता नक्की आहे.

Berenstain संस्थेच्या अलीकडच्या अहवालानुसार जगभर विविध एआय प्रॉडक्ट्स चा उपयोग वेगाने वाढत आहे. व्यक्ती आणि कॉर्पोरेट त्याचे वाहक आहेत. मार्च २०२६ मध्ये जगभरातील कामगार/कर्मचाऱ्यांपैकी १६ टक्के लोक एआयचा छोटा मोठा वापर करत आहेत. पुढच्या काळात ही आकडेवारी अर्थात वेगाने exponentially वाढणार आहे. अपेक्षेप्रमाणे एआयचा सर्वात जास्त उपयोग अमेरिकेत होऊ लागला आहे.

एआयमुळे व्यक्ती आणि म्हणून कंपन्यांची उत्पादकता वाढणार आहे हे निश्चित. उत्पादकता/प्रॉडक्टिव्हिटी आर्थिक विकासासाठी महत्वाची असते हे



गेल्या ५०० वर्षांच्या अर्थ इतिहासातून पुरेसे सिद्ध झाले आहे; आणि उत्पादकता तंत्रज्ञान विकास/नवनवीन शोध यामुळे वाढते हे देखील.

मानवी श्रमाची उत्पादकता म्हणजे एका तासात, कामाच्या आठ तासात किती आउटपुट काढले ! हाच तर्क इतर अनेक इनपुट आउटपुट साठी देखील लावता येईल. (तयार झालेला सरप्लस कोणाकडे हा गाभ्यातील प्रश्न. पण तूर्तास बाजूला ठेवूया)

माहित असलेले एक महत्वाचे सत्य सार्वजनिक व्यासपीठावर आणले जात नाही ते असे कि एका व्यक्तीची/एका फर्मची उत्पादकता आणि समाजाची/अर्थव्यस्थेची उत्पादकता या भिन्न गोष्टी आहेत.

आपला असा ब्रेनवॉश केला गेला आहे कि व्यक्तीची / फर्मची उत्पादकता वाढली कि समाजाची/अर्थव्यवस्थेची उत्पादकता देखील वाढते; हे त्या ट्रिकल डाऊन थियरीच्या आपोआपवादासारखे आहे.

एका काल्पनिक समाजात १०० व्यक्ती/ कामगार आहेत आणि प्रत्येकाचे आउटपुट एकसारखे म्हणजे 'क्ष' आहे संपूर्ण समाजाचे आउटपुट १०० क्ष असणार या समाजातील फक्त २० कामगार/ व्यक्तींची उत्पादकता वाढली; ५० कामगार/व्यक्तींची पूर्वीसारखी क्ष राहिली आणि ३० कामगार/यक्ती बेकार झाले म्हणजे काहीही कामच नाही, उत्पादन नाही म्हणजे उत्पादकता शून्य, राईट? (हे एक क्रूड उदाहरण आहे ; तुम्ही शून्य का जोडले वगैरे फाटे फोडणारे प्रश्न आणू नका ; हा एक मेंटल एक्सरसाइज आहे. गाभ्यातील मुद्दा समजून घ्यावा)

तरी समाजाला/अर्थव्यवस्थेला तेवढेच म्हणजे १०० क्ष आउटपुट मिळू शकते ; पण समाजातील एका मोठ्या मानवी समूहाची उत्पादकता खूप कमी किंवा शून्य होऊ शकते. आणि इथे बिगर आर्थिक प्रश्न मुसंडी मारतात.यातून समाजात सामाजिक/आर्थिक विषमता वाढीस लागणार; त्याची सामाजिक/राजकीय किंमत असते आणि आर्थिक देखील असते. आपण आज देखील हे अनुभवत आहोत. आपल्या देशाची जीडीपी तर सरासरी बऱ्या वेगाने वाढत आहे पण बहुसंख्य नागरिकांचे भौतिक राहणीमान अधिकाधिक तणावग्रस्त होत आहे.

त्यामुळे फर्म/कंपन्यांना आपली उत्पदकता जरूर वाढू द्यावी पण त्याचवेळी समाज/अर्थव्यवस्था म्हणून अधिक समग्र/सर्वसमावेशक आर्थिक धोरणे आखावी लागतील या आपोआपवादातून बाहेर यायला हवे.अर्थव्यवस्थेतील अनेक मोठ्या घडामोडी/धोरणांचे लाभार्थी वेगळे असतात आणि किंमत मोजणारे वेगळे असतात. उदा व्यापार करार घ्या. अमेरिकेबरोबरच्या व्यापार करारामुळे देशाकडे संरक्षण सामुग्री येईल पण कापूस/सोयाबीन पिकवणारे अनेक शेतकरी उध्वस्त होतील.

डेव्हील लाईज इन डिटेल्स म्हणतात. मुद्दा असा आहे हा तिढा शासकीय हासक्षेपाशिवाय, सार्वजनिक स्रोतांशिवाय, दीर्घकालीन तयारीशिवाय सुटूच शकत नाही. शासन म्हणते आम्ही घेतला निर्णय त्याचे तुमच्यावर विपरीत परिणाम होत असतील तर तुम्हीच मार्ग काढा.

लोकसंख्येच्या अर्धी लोकसंख्या ३५ वर्षखालील आहे. एआय मुळे १० नवीन रोजगार तयार झाले तर १०० आक्रसणार आहेत. काय तयारी आहे देशाची? धोरणकर्त्यांची? आपण जिवंत नसू पण पुढच्या पिढ्या आपल्याला किमान दूषणे तरी देणार नाहीत ही आंतरिक इच्छा असणे हे प्रत्येक प्रौढ पणाचे लक्षण आहे.

**- संजीव चांदोरकर**

स्मार्ट मीटर धोरण

# महावितरणचे डोके ठिकाणावर आहे का?

कोणतीही कायदेशीर प्रक्रिया पार नपाडता, मनमानीपणे,जबरदस्तीने स्मार्ट मीटर लावण्याचा सपाटा सध्या संपूर्ण राज्यात महावितरण कडून सुरू आहे. मीटर बदलण्यासाठी आलेले तथाकथित कर्मचारी काही ठिकाणी स्मार्ट मीटर लावणे अनिवार्य असून ग्राहकांना 'तुम्ही विरोध केल्यास तुमच्या विरुद्ध सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल' अशा पद्धतीने धमक्या देण्यात येत असल्याचे प्रकार सुद्धा घडत आहेत.

जुने डिजिटल मीटर व्यवस्थित नियमीत कार्यरत असताना हे नवीन मीटर का लावण्यात येत आहे असा प्रश्न सामान्य वीज ग्राहक विचारतो आहे. समजा सध्याच्या मीटर मध्ये काही दोष असतील तर त्याला जबाबदार कोण?असाही प्रश्न निर्माण होतो. नवीन स्मार्ट मीटरची सक्ती कशासाठी व कोणासाठी असाही भाबडा प्रश्न अनेक ग्राहक विचारत आहेत. यात खरोखरच महावितरणचा काही फायदा होणार की मीटर लावणाऱ्या कंपनीचा फायदा होणार?सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या खिशातले घामाचे दाम काही विशिष्ट भांडवलदारांचे घशात तर घातल्या जात नाही ना? अशीही शंका निर्माण होते आहे. त्यामुळे जिथे चोरी असेल, दोषयुक्त मीटर असेल, ग्राहकांना मीटर बदलूनच पाहिजे असेल तर असे अपवाद वगळता स्मार्ट मीटर सर्रासपणे लावण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचा स्पष्ट आणि तीव्र विरोध आहे.मीटर बदलण्याचं कंत्राट दिलेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी असाच मनमानीपणे हैदोस घालणे सुरू ठेवले तर विद्यमान सरकारच्या लोकप्रिय ते संदर्भात प्रश्न निर्माण होवून ते गंभीर अडचणीत येवू शकते असेही सर्वसामान्य वीज ग्राहकांचे मत आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतची, भूमिका स्मार्ट मीटर तंत्रज्ञानाला विरोध करण्याची नसून, ग्राहकहित, सार्वजनिक निधीचा कार्यक्षम व पारदर्शक वापर आणि महाराष्ट्र राज्याच्या सार्वजनिक वीज वितरण संस्था महावितरण (MSEDCL) यांच्या दीर्घकालीन आर्थिक स्थैर्याचे संरक्षण करण्याची आहेङ.

महावितरण ही महाराष्ट्रातील कोट्यवधी वीज ग्राहकांची सार्वजनिक संस्था असून तिची विश्वासार्हता कायम राहिली पाहिजे. महावितरणने आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वायत्त आणि लोकाभिमुख राहणे हे राज्याच्या ऊर्जा सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे स्मार्ट मीटरसारख्या मोठ्या भांडवली प्रकल्पाची अंमलबजावणी करताना त्याचे अल्पकालीन व दीर्घकालीन आर्थिक, तांत्रिक आणि सामाजिक परिणामांचा सर्वंकष अभ्यास होणे आवश्यक आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे मत आहे की, कार्यरत व अचूक डिजिटल वीजमीटर असलेल्या ग्राहकांना पर्याय न देता स्मार्ट मीटर बसविण्याच्या निर्णय प्रक्रियेत भारतीय संविधानातील अनुच्छेद १४, २१ आणि ३००, वीज कायदा २००३ मधील कलम ५५नुसार करेक्ट मीटर अपेक्षित आहे ,कलम ६१नुसार इष्टतम गुंतवणूक इष्टतम वीज दर हे ब्रीद वाक्य आहे (जर८००रूचे मीटर उचित पध्दतीने काम करीत असताना रु१०,०००/पेक्षा जास्त खर्चिक मीटर का ही रास्त शंका वीज ग्राहकांच्या मनात आहे) तसेच कलम ५६नुसार वीज पुरवठा खंडित करताना लिखित १५दिवसाची सुचना अपेक्षित असताना स्मार्ट मीटर लावण्यात आलेल्या ग्राहकांचा वीज देयके थोडासा विलंबामुळे कोणत्याही पुर्वसुचना न देता लोकल कार्यालयामार्फत बंद न होता वरीष्ठ कार्यालयाकडुन ऑनलाईन पध्दतीने बंद करणे विशेष म्हणजे सद्यस्थिती मध्ये वीज कायदा २००३मध्ये कोणत्याही दुरुस्ती न करता हा प्रकार प्रथम दर्शनी तरी अनुचित आहे असे ग्राहक पंचायतीचे स्पष्ट मत आहे.


अशा एकतर्फी कारवाई मुळे ग्राहक संरक्षण कायदा, २०१९ अन्वये ग्राहकांचा निवडीचा अधिकार डावलण्यात येत आहे, वीज सप्लाय कोड २०२१मध्ये सुध्दा मीटर बदल करताना ग्राहकांना दोन दिवस पुर्व सुचना देणे अपेक्षित आहे. परंतु तसे होत नाही (सप्लाय कोड मध्ये बदल न करता)तसेच CEA (Metering) Regulations, २०१९ मधील १३:२नुसार NABL प्रमाणित लॅब नसताना स्मार्ट मीटर सक्ती च्या निर्णया मध्ये ग्राहकहिताच्या तत्त्वांचे व नियमावली चे पूर्ण उचित पालन झाले आहे का?याबाबत पारदर्शकपणे माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

यासाठी शासन व संबंधित प्राधिकरणांनी Cost–Benefit Analysis, Prudence Test, Detailed Project Report (DPR), Life Cycle Cost Analysis, Return on Equity (ROE) Analysis, Cyber Security Audit, Firmware Validation , स्मार्ट मीटर निमित्ताने प्रत्येक महिन्याला सर्व्हिसेस चार्ज म्हणून वीज ग्राहकांच्या वीज देयकात वाढ होणार नाही का आणि इतर तांत्रिक पडताळणी अहवाल सार्वजनिक करावेत, अशी ग्राहक पंचायतची मागणी आहे.

स्मार्ट मीटर प्रकल्पाचे संभाव्य फायदे आणि संभाव्य आव्हाने या दोन्हींचा वस्तुनिष्ठ अभ्यास होणे आवश्यक आहे. विशेषतः दीर्घकालीन देखभाल खर्च, सॉफ्टवेअर अद्यतने, सायबर सुरक्षा, उपकरणांचे आयुष्य, भविष्यातील बदल खर्च, ग्राहकांवरील आर्थिक परिणाम आणि महावितरणच्या आर्थिक स्थैर्यावर होणारा प्रभाव यांचे स्वतंत्र मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

सार्वजनिक चर्चेत आलेल्या माहितीनुसार या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होणार आहे. त्यामुळे उपलब्ध निधीचा वापर वीज गळती कमी करणे, वितरण व्यवस्था अधिक सुरक्षित करणे, जुन्या ओव्हरहेड तारांच्या जागी इन्सुलेटेड ओव्हरहेड केबल बसविणे, अपघातांचे प्रमाण कमी करणे आणि वीजपुरवठ्याची गुणवत्ता सुधारणे अशा पर्यायांच्या तुलनात्मक अभ्यासासह करण्यात यावा, असे ही अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे मत आहे.

महावितरण ही जनतेची संस्था आहे. तिचे आर्थिक अस्तित्व, कार्यक्षमता आणि विश्वासार्हता अबाधित राहणे हे ग्राहक, शेतकरी, उद्योग, कर्मचारी आणि महाराष्ट्र राज्याच्या व्यापक हितासाठी आवश्यक आहे इतकेच नव्हे तर मराविविकं ही जिवंत राहणे व वीज ग्राहकांच्या वरील मानवतावादी दृष्टिकोनातून जीवंत ठेवणे आवश्यक आहे. म्हणून कोणताही निर्णय घेताना भविष्यात महावितरणवर अनावश्यक आर्थिक भार निर्माण होणार नाही, सार्वजनिक निधीचा सर्वोत्तम वापर होईल आणि



ग्राहकांचे संवैधानिक व कायदेशीर अधिकार सुरक्षित राहतील, याची खात्री करणे आवश्यक आहे.

जर वरील बाबींमध्ये आवश्यक ती पारदर्शकता, वैज्ञानिक पडताळणी आणि ग्राहकहिताचे संरक्षण सुनिश्चित झाले नाही, तर उपलब्ध कायदेशीर उपाययोजनांचा, आवश्यक असल्यास जनहित याचिकेसह, विचार करण्याचा अधिकार ग्राहक आणि ग्राहक संघटनांना संविधान व कायद्याने प्रदान केला आहे.

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, विदर्भ प्रांत यांचा न्यायव्यवस्था, शासन आणि नियामक संस्थांवर पूर्ण विश्वास असून, ग्राहकहित, सार्वजनिक हित, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व या तत्त्वांवर आधारित निर्णय प्रक्रियेला प्राधान्य देण्यात यावे, अशी नम्र अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**डॉ नारायण मेहरे**
अध्यक्ष अखिल भारतीय ग्राहक पंचायत,

# तेल्हाऱ्यात नाफेड ज्वारी खरेदीवर संशयाची सावली!

## खरे शेतकरी वंचित, व्यापाऱ्यांची पोती केंद्रावर? ; ई-पीक, ७/१२, सॅटेलाईट पडताळणी आणि खरेदी नोंदींचा ताळमेळ लावा

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यात सुरू असलेल्या नाफेडच्या ज्वारी खरेदी प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संपूर्ण व्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी आता अधिक तीव्र झाली आहे. खऱ्या ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना खरेदीपासून वंचित ठेवण्यात आले, तर दुसरीकडे व्यापाऱ्यांनी बाहेरील भागातून ज्वारी आणून शेतकऱ्यांच्या नावावर नाफेड केंद्रात विक्री केल्याचा संशय व्यक्त होत आहे. या आरोपांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी झाल्यास मोठा गैरव्यवहार उघडकीस येऊ शकतो, अशी चर्चा शेतकरी वर्तुळात सुरू आहे.

विशेष म्हणजे, शासनाकडे ई-पीक पाहणी, ७/१२ उतारे, पीक नोंदी, महसूल अभिलेख आणि सॅटेलाईट प्रतिमांच्या आधारे प्रत्यक्ष पिकांची पडताळणी करण्याची सक्षम यंत्रणा उपलब्ध आहे. त्यामुळे तेल्हारा तालुक्यात प्रत्यक्ष किती क्षेत्रावर ज्वारीची लागवड झाली, किती उत्पादन झाले आणि त्या तुलनेत नाफेडकडे किती ज्वारीची खरेदी झाली, याचा ताळमेळ लावल्यास वस्तुस्थिती सहज समोर येऊ शकते, असे जाणकारांचे मत आहे.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी प्रत्यक्षात ज्वारीचा पेरा नसतानाही ई-पीक पाहणीत ज्वारीची नोंद करण्यात आल्याचा संशय आहे. अशा नोंदींचा आधार घेऊन बाहेरील ज्वारी नाफेड केंद्रावर आणली गेली असेल, तर तो शासनाच्या अनुदानित खरेदी व्यवस्थेचा गंभीर गैरवापर ठरू शकतो. या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी महसूल, कृषी आणि नाफेड प्रशासनाने संयुक्त चौकशी करणे आवश्यक असल्याची मागणी पुढे येत आहे. यापूर्वी उत्तर महाराष्ट्रातील केळी पीक विमा प्रकरणात सॅटेलाईट प्रतिमा, डिजिटल पडताळणी आणि अन्य तांत्रिक पुराव्यांच्या आधारे कथित गैरप्रकार उघडकीस आले होते. संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या आणि पुढे गुन्हेही दाखल करण्यात आले होते. त्यामुळे तेल्हारा तालुक्यातील ज्वारी खरेदीबाबतही याच पद्धतीने सॅटेलाईट विश्लेषण, ई-पीक नोंदी, प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी आणि खरेदी अभिलेख यांची छाननी केल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते, अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

### गैरप्रकार सिद्ध झाल्यास फौजदारी कारवाईची मागणी



दरम्यान, अनेक शेतकऱ्यांनी आर्थिक अडचणीमुळे हंगामातच ज्वारी १,५०० ते १,८०० रुपये प्रतिक्विंटल दराने व्यापाऱ्यांना विकल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत आता नाफेड केंद्रावर मोठ्या प्रमाणात ज्वारी दाखल होत असल्याने, ही ज्वारी नेमकी कुठून आली, कोणत्या शेतकऱ्यांच्या नावावर खरेदी झाली आणि त्या शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात ज्वारीचे उत्पादन घेतले होते का, याची सखोल चौकशी करण्याची मागणी अधिक जोर धरत आहे.

शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे की, जर ई-पीक पाहणी, सॅटेलाईट प्रतिमा, महसूल नोंदी आणि प्रत्यक्ष खरेदी यामध्ये तफावत आढळली, तर संबंधित अधिकारी, कर्मचारी, दलाल, व्यापारी अथवा गैरव्यवहारात सहभागी असलेल्या व्यक्तींवर केवळ विभागीय कारवाई न करता आवश्यक त्या कायद्यांनुसार फौजदारी गुन्हेही दाखल करण्यात यावेत. शासनाच्या खरेदी योजनांचा लाभ केवळ पात्र आणि प्रत्यक्ष शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाच मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले आहे. संशयाचे निरसन करण्यासाठी शासन स्वतःहून तांत्रिक पडताळणी करून पारदर्शक अहवाल जाहीर करणार की नाही, हा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. आरोप खोटे असतील तर तेही स्पष्ट व्हावे आणि आरोप खरे ठरल्यास दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

वांगरगाव येथील शेतकरी भास्करराव मार्के यांनी नाफेड ज्वारी खरेदी प्रक्रियेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. 'तालुक्यात प्रत्यक्ष किती क्षेत्रावर ज्वारीची लागवड झाली, किती उत्पादन झाले आणि त्यानुसार नाफेडकडे झालेल्या खरेदीचा ताळमेळ बसतो का, याची शास्त्रीय पडताळणी झाली पाहिजे. अनेक शेतकऱ्यांनी कमी दरात ज्वारी विकली असताना आता मोठ्या प्रमाणात ज्वारी खरेदीसाठी येत असल्याने तिचा स्रोत तपासणे आवश्यक आहे,' असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, 'जर बनावट नोंदणी, अपात्र लाभार्थी किंवा व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या नावाचा गैरवापर झाल्याचे आढळले, तर संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. महसूल, कृषी आणि नाफेड प्रशासनाने ७/१२ उतारे, ई-पीक पाहणी, उत्पादन नोंदी आणि प्रत्यक्ष खरेदी यांची तुलना करून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक करावी. शासनाच्या योजनांचा लाभ केवळ पात्र आणि कष्टकरी शेतकऱ्यांपर्यंतच पोहोचला पाहिजे.'

---

## एमपीएससीतून कनिष्ठ भूवैज्ञानिकपदी निवड; कु. रश्मी चव्हाण यांचा नागरी सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमध्ये एमपीएससीद्वारे कनिष्ठ भूवैज्ञानिक (राजपत्रित अधिकारी) पदावर नियुक्ती झाल्याबद्दल कु. रश्मी सरिता गोपीचंद चव्हाण यांचा अकोला जिल्हा बंजारा समाजाच्या महिला भगिनींच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी उपस्थित महिला भगिनींनी कु. रश्मी चव्हाण यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा दिल्या. समाजातील मुलींनी उच्च शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासकीय सेवेत प्रवेश करावा, यासाठी रश्मी चव्हाण यांचे यश प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. युवक-युवतींनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन ध्येयपूर्तीसाठी सातत्याने प्रयत्न करावेत, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

अकोला जिल्हा बंजारा समाजाच्या महिला भगिनींच्या वतीने आयोजित या सत्कार सोहळ्यास सौ. लता राठोड, सुनिता राठोड, सुनिता जाधव, निमा जाधव, वंदना राठोड, सविता चव्हाण, सुरेखा चव्हाण, प्रतिमा जाधव, शिल्पा राठोड, संजना चव्हाण, विद्या राठोड, टीना जाधव, कल्पना राठोड, संजीवनी राठोड, राजकन्या राठोड, प्रियंका जाधव व अर्चना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी कु. रश्मी चव्हाण यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या यशाचा समाजातील विद्यार्थिनींना निश्चितच प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

## रोजगार हमीतील कथित गैरव्यवहाराचा आरोप, चौकशीची मागणी करा

### सामाजिक कार्यकर्त्या अर्चना चोपडे यांचा १३ ऑगस्ट पासून उपोषणाचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यातील विविध विकासकामांमध्ये कोट्यवधी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराची स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अन्यथा येत्या १३ ऑगस्ट २०२६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्त्या अर्चना चोपडे यांनी दिला आहे.

याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना लेखी निवेदन सादर केले आहे. पंचायत समिती अकोला, मूर्तिजापूर, पातूर, तेल्हारा, अकोट आणि बार्शीटाकळी कार्यक्षेत्रात सन २०२३-२४, २०२४-२५ आणि २०२५-२६ या कालावधीत रोजगार हमी योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक अनियमितता झाल्याचा आरोप त्यांनी निवेदनातून केला आहे. चोपडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, विकासकामांमध्ये नियमबाह्य खर्च, बनावट नोंदी, शासकीय निधीचा कथित गैरवापर तसेच आर्थिक अनियमिततेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि कंत्राटदार यांच्या भूमिकेची तपासणी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर व फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे. चौकशी सुरू होऊन दोषींवर ठोस कारवाई होईपर्यंत आपण आमरण उपोषण मागे घेणार नसल्याची स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे. दरम्यान, या आंदोलनाच्या इशाऱ्यामुळे जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या कामकाजाबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासन या मागण्यांवर काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**टीप** : या बातमीतील गैरव्यवहारासंदर्भातील आरोप हे सामाजिक कार्यकर्त्या अर्चना चोपडे यांनी प्रशासनाकडे केलेल्या निवेदनातील दाव्यांवर आधारित असून, त्यांची अधिकृत चौकशी किंवा पुष्टी अद्याप झालेली नाही.

## कामावरच काळाचा घाला! विजेच्या धक्क्याने कामगाराचा मृत्यू

### निंभोरा बु. येथील घटना; कंपनीवर गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी नातेवाईकांचा ठिय्या, तणावाचे वातावरण

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यातील निंभोरा बु. येथे गावठाण सेपरेशन फिडरच्या कामादरम्यान विजेचा धक्का लागून एका कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. या घटनेनंतर संतप्त नातेवाईकांनी संबंधित कंपनी व जबाबदार अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत मृतदेह उचलण्यास विरोध केला. त्यामुळे घटनास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

माहितीनुसार, अशोका बीड कॉन कंपनीमार्फत निंभोरा बु. येथे गावठाण सेपरेशन फिडरचे काम सुरू होते. काम सुरू असताना दुसऱ्या विद्युत वाहिनीचा प्रवाह संबंधित खांबात आल्याने शेख समीर शेख जमीर (वय ३८, रा. तळेगाव) यांना जोरदार विजेचा धक्का बसला. या भीषण अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला.



घटनेची माहिती मिळताच तेल्हारा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा सुरू करून पुढील कायदेशीर प्रक्रिया हाती घेण्यात आली. मात्र, मृताच्या नातेवाईकांनी मोठी गर्दी करत संबंधित कंपनी आणि निष्काळजीपणा करणाऱ्या जबाबदार व्यक्तींवर तातडीने गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.

'जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह घटनास्थळावरून उचलू देणार नाही,' अशी ठाम भूमिका नातेवाईकांनी घेतल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन घटनास्थळी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. पोलिसांनी नातेवाईकांची समजूत काढत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रयत्न केले.

या घटनेमुळे निंभोरा बु. परिसरासह संपूर्ण तेल्हारा तालुक्यात हळहळ व्यक्त होत असून विद्युत कामांदरम्यान कामगारांच्या सुरक्षिततेचे नियम कितपत पाळले जातात, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तेल्हारा पोलीस करीत आहेत.

---

## जनगणनाच्या अनुषंगाने जिल्हा जनगणना निर्देशिका पुस्तिका प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | अकोला ■



जनगणना २०२७ अंतर्गत जिल्हा जनगणना निर्देशिका पुस्तिका तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या गाव निर्देशिका व शहर निर्देशिका माहिती संकलनाच्या अनुषंगाने बाळापूर तालुक्यात क्षेत्रीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. हे प्रशिक्षण १७ जुलै २०२६ रोजी नगर परिषद कार्यालय, बाळापूर येथील सभागृहात पार पडले.

जनगणना संचालनालयाच्या सहाय्यक संचालक तेजल कटारे यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी डीसीएचबी पुस्तिकेसाठी आवश्यक असलेली माहिती अचूक व वेळेत संकलीत करण्याबाबत सूचना दिल्या. जनगणना २०२७ अंतर्गत गाव निर्देशिका व शहर निर्देशिका माहिती संकलनाचे काम १६ ऑगस्ट २०२६ ते १४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान क्षेत्रीय अधिकाऱ्यांना शैक्षणिक सुविधा, आरोग्य सेवा, पाणीपुरवठा व स्वच्छता, दळणवळण, वाहतूक व संपर्क साधने, बँकिंग व पतसुविधा, वीज व इंधन सुविधा, प्रमुख कृषी उत्पादने, हस्तकला तसेच शहरी भागातील विविध नागरी व पायाभूत सुविधांची माहिती संकलित करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. ही माहिती डीसीएचबी ॲप व पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन नोंदविण्यात येणार असून, त्यानंतर संपूर्ण जिल्ह्याची माहिती संकलित करून जनगणना प्रक्रियेअंती जिल्हा जनगणना निर्देशिका पुस्तिकेत समाविष्ट करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणास तहसीलदार वैभव फरतारे, गट विकास अधिकारी दीपक सवडे तसेच निवासी नायब तहसीलदार डॉ. सागर भागवत उपस्थित होते. प्रशिक्षणासाठी तहसील कार्यालयातील ग्राम महसूल अधिकारी, पंचायत समिती बाळापूरमधील ग्रामपंचायत अधिकारी तसेच नगर परिषद बाळापूर येथील क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षणात सुमारे ६५ क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

**Change In Name**

I have change my name From
**Shaikh Anis** -To-
**Shaikh Anis Shaikh Rafique**
Address - Shaikh Rafique 7 Shahid Watan Hazrat Tipusultan Mohalla Pimpalgaon Kale Dist. Buldhana Maharashtra 443403 Passport No :- L1802961

**Change In Name**

I have change my name From
**BARKATULLAH KHAN RAHMATULLAH KHAN** -To-
**BARKATULLA KHAN RAHEMATULLA KHAN**
Address- Islam pura Shaher Balapur Dist. AKOLA Maharashtra 444302 Passport No :- L1811194

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे सुशीला शंकर शेगोकार रा. मु. सरकारी ग्यास गोडावून च्या बाजूला, खदान, ता. जी. अकोला यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. १९४३ दिनांक १५/०४/२०१३ या क्रमाकाचे मूळ रजी. खरेदी खत दिनांक ०७/०६/२०२६ रोजी क्षेरोक्स काढण्याकरीता सिंधीकॅम्प, खदान परिसरात गेले असता तेथील परिसरात हरवले आहे त्याबाबत सुशीला शंकर शेगोकार यांनी दि. ०९/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन खदान येथे online तक्रार दाखल केली आहे, त्याचे तक्रार क्र. १९३७३०३००७२६००१६१ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर १० दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी.तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती. करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक :- १८/०७/२०२६

**ॲड. अजय वा. गोडे**
ऑफीस - शॉप क. २३ - ए, दुसरा माळा,
शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला
ता. जि. अकोला, मो. क्र.९१७५९ ३८२४२

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १११६/२०२६ — प्रोसेस नं.८९०९/२०२६
चौ.ता. २१/०८/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. अश्विनी राहुल शेन्डे रा. फ्लॅट नं. १०१, स्वामी वाटिका, कात्रज कोंढवा रोड, पॅरामाउंट गार्डन गोकुल नगर, पुणे. ता. जि. पुणे. मो. नं. ९९७०१७८३६० २. अमृता उदय जोशी रा. .फ्लॅट नं. ५०४, लोटस रिजेन्सी मेदोस, धनोरी रोड, पुणे शहर, ता. जि. पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीकृष्ण मोरेश्वर पाध्ये
**पत्ता :-** रा. व्दारा श्रीकांत मोरेश्वर पाध्ये रा. मयुरेश्वर अष्टविनायक वास्तुशील्प कॉलनी, छोटी उमरी, उमरी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीकृष्ण मोरेश्वर पाध्ये यांचे दि. २१/०१/२०१९ रोजी नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्या दिनांक २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक१७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०८१/२०२६ — प्रोसेस नं.८८७५/२०२६
चौ.ता. २०/०८/२०२६ — दिनांक : १६/०७/२०२६

**अर्जदार :** १. राधिका रमेश केणे २. प्रतिक रमेश केणे ३. प्रियंका रमेश केणे ४. अपूर्वा रमेश केणे सर्व रा. राधेश, रणपिसे नगर मेन रोड, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९७६५५५४५२५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रमेश रामकृष्ण केणे
**पत्ता :-** रा. राधेश, रणपिसे नगर मेन रोड, रणपिसे नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेश रामकृष्ण केणे यांचे दि. ०७/०६/२०२६ रोजी मेट्रो हॉस्पिटल आणि हार्ट इस्टिट्युट, हरिव्दार ता. जि. हरिव्दार, उत्तराखंड येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९३९/२०२६ — प्रोसेस नं.७९३९/२०२६
चौ.ता. ०७/०८/२०२६ — दिनांक : २३/०६/२०२६

**अर्जदार :** १. किरणसिंग भिमसिंग बोथेले २. उमेश भिमसिंग बोथेले ३. सरिता भिमसिंग बोथेले उर्फ सरिता भुपेंद्र कोडेले सर्व रा. आमदार शर्मा सभागृह, गुरूदेव नगर, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. भिमसिंग मोतीराव बोथेले २. पार्वतीबाई भिमसिंग बोथेले
**पत्ता :-** रा. तुळजा भवानी मंदिरा जवळ, गुरूदेव नगर, बाळापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भिमसिंग मोतीराव बोथेले यांचे दि. ०४/०५/२०२० रोजी व मयत पार्वतीबाई भिमसिंग बोथेले यांचे दि. १९/११/२०२४ रोजी तुळजा भवानी मंदिरा जवळ, गुरूदेव नगर, बाळापूर रोड, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०८/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९९८/२०२६ — प्रोसेस नं.८८८२/२०२६
चौ.ता. २२/०८/२०२६ — दिनांक : १६/०७/२०२६

**अर्जदार :** १. गोवर्धन जनार्दन गावंडे २. मदन जनार्दन गावंडे ३. पांडुरंग जनार्दन गावंडे ४. राजू जनार्दन गावंडे अर्जदार क. १ ते ४ रा. दहिगाव गावंडे, ता. जि. अकोला. ५. चित्रा अनिल भांबुरकर रा. ताकरखेड मोरे, ता. अंजनगाव, जि. अमरावती. ६. शैला सतिष धांडे रा. शिवर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जनार्दन नामदेव गावंडे
**पत्ता :-** रा. दहिगाव गावडे, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जनार्दन नामदेव गावंडे यांचे दि. १०/०१/२०१७ रोजी दहिगाव गावडे ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com



# सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ एल्गार

## तहसीलदारांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन; परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकतेसाठी केंद्राने तातडीने निर्णय घ्यावा

**कारंजा (घाडगे)/जनमाध्यम**
प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ, पर्यावरणवादी आणि जनआंदोलनांचे प्रमुख चेहरा असलेले डॉ. सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ कारंजा (घाडगे) येथे विविध सामाजिक संघटनांनी एकत्र येत आंदोलनाचा आवाज बुलंद केला. दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या त्यांच्या उपोषणाला पाठिंबा जाहीर करत तहसीलदारांमार्फत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात देशातील स्पर्धा परीक्षा व्यवस्थेतील वाढत्या गैरप्रकारांबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे. नीटसह विविध परीक्षांच्या पेपरफुटीमुळे विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला असून, पारदर्शक व विश्वासार्ह परीक्षा प्रणाली उभारण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली. या मागण्यांसाठी सुरू असलेल्या अभिजीत दिपके यांच्या आंदोलनाला पाठिंबा देत डॉ. सोनम वांगचुक यांनी जंतर-मंतर येथे उपोषण सुरू केले असून, त्याला देशभरातून प्रतिसाद मिळत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले.

लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या या आंदोलनाची केंद्र सरकारने अद्याप गंभीर दखल घेतली नसल्याचा आरोप सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी केला. शिक्षण, पर्यावरण, लोकशाही मूल्ये, जनहित आणि संविधानाच्या रक्षणाशी संबंधित प्रश्नांवर सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली राष्ट्रपतींना पाठविलेल्या निवेदनात डॉ. सोनम वांगचुक यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन संवादाच्या माध्यमातून तोडगा काढावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. त्याचबरोबर डॉ. वांगचुक यांनी आरोग्याचा विचार करून उपोषण मागे घ्यावे आणि लोकशाही पद्धतीने जनआंदोलन सुरू ठेवावे, असे आवाहनही करण्यात आले. यावेळी विविध सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संघटनांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला तसेच लोकशाही व समतावादी विचारांचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांडगाव बसस्थानक चौक अपघाताचा हॉटस्पॉट

## भरधाव वाहनांमुळे नागरिकांचा जीव धोक्यात; सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तातडीच्या कारवाईची मागणी

**मांडगाव/जनमाध्यम**
अमरावती-उमरेड राज्य महामार्गावरील मांडगाव बसस्थानक चौकात गतिरोधक नसल्यामुळे अपघातांची मालिका सुरूच असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चौकात तातडीने गतिरोधक उभारून वाहतुकीवर नियंत्रण आणावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे.

नवीन रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर या मार्गावरील वाहनांचा वेग मोठ्या प्रमाणात वाढला आहे. ट्रक, टँकर, खासगी वाहने, दुचाकी तसेच मालवाहू वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने चौकातून ये-जा करणाऱ्या नागरिकांचा जीव धोक्यात आला आहे. या चौकातून गाव, मांडगाव-चिंचोली, हिंगणघाट, सुजातपूर, बेघर वस्ती, यशवंत हायस्कूल तसेच समुद्रपूर-वर्धा मार्गाकडे जाणारे रस्ते फुटत असल्याने दिवसभर येथे मोठी वर्दळ असते.

ज्येष्ठ नागरिक आणि प्रवाशांना रस्ता ओलांडताना मोठी कसरत करावी लागत आहे. मागील आठवड्यात या चौकात झालेल्या दोन गंभीर अपघातांत तरुण जखमी झाल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. अनेक वर्षांपासून गतिरोधकाची मागणी करूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जुने बसस्थानक पाडण्यात आले. मात्र, अद्याप नवीन बसस्थानक उभारण्यात आलेले नाही. त्यामुळे प्रवाशांना उन्हात व पावसात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. चौकात गतिरोधक उभारण्याबरोबरच नवीन बसस्थानकाचे बांधकामही तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी नागरिकांनी केली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक हेमंत पाहुणे, मनीष पिसुड्डे, भारत कुंभलकर, गोपाल डफ, योगेश पाहुणे, तुपेश चमडे, राजू चुटे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. आणखी किती अपघात झाल्यानंतर प्रशासन जागे होणार असा प्रश्नही नागरिकांनी उपस्थित केला.

# त्या' चिमुकलीच्या आक्रोशाला न्याय कधी

## रोठा हत्याकांडाने पुन्हा समाजमन हेलावले; न्यायासाठी माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे सरसावले

**वर्धा/जनमाध्यम**
रोठा परिसरात अल्पवयीन चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचारानंतर तिची निर्घृण हत्या झाल्याची घटना संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडणारी ठरली आहे. एका निष्पाप लेकराचा जीव घेणाऱ्या या क्रूर घटनेने प्रत्येक संवेदनशील मन सुन्न झाले असून, समाजात संतापाची तीव्र लाट उसळली आहे. अशा वेदनादायी वातावरणात पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, या मागणीसाठी शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांनी शुक्रवारी वर्धा येथे जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांची भेट घेतली.

यावेळी दानवे यांनी या प्रकरणाचा सखोल, निष्पक्ष आणि अत्यंत जलद तपास करण्याची मागणी केली. आरोपीला कोणत्याही परिस्थितीत कायद्याच्या पळवाटा मिळू नयेत तसेच जलदगती न्यायालयात खटला चालवून कठोरात कठोर शिक्षा सुनावण्यात यावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. एका निष्पाप मुलीचे आयुष्य संपविणाऱ्यांना समाजात स्थान नाही. अशा नराधमांना कायद्याने सर्वाधिक कठोर शिक्षा मिळाली पाहिजे, तरच समाजात योग्य संदेश जाईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या भीषण घटनेने राज्यातील महिला आणि बालिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा



एकदा ऐरणीवर आला आहे. केवळ आरोपीला अटक करून हा विषय संपणार नसून, पीडित कुटुंबाला तातडीने न्याय मिळणे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना करणे ही काळाची गरज असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनंत देशमुख, राजेंद्र खूपसरे, प्रमोद बोंबले, रवींद्र चव्हाण, प्रमोद भटे, सतीश धोबे, मनोज देवके, संजय पांडे, पंकज मयेकर, विलास वैद्य यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### ग्रामोद्योग भरारी पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**वर्धा-**शासकीय योजनांच्या माध्यमातून विशेष करुन ग्रामीण भागात यशस्वी उद्योग उभे करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्यावतीने ग्रामोद्योग भरारी पुरस्कार योजना राबविण्यात येत आहे. या पुरस्कार योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र उद्योजकांनी २८ जुलै पर्यंत अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मंडळामार्फत शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातुन अर्थसहाय्य घेऊन यशस्वीपणे उद्योग उभारणी करुन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध केलेल्या मंडळाच्या यशस्वी उद्योजकांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे व त्यांचा यथोचित सन्मान व्हावा, याकरीता ग्रामोद्योग भरारी पुरस्कार योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेंतर्गत राज्यस्तरीय ग्रामोद्योग प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. पुरस्कारासाठीचा अर्ज मंडळाच्या www.mskvib.org या लिंकवर तसेच खादी व ग्रामोद्योग मंडळ जिल्हा कार्यालय, डॉ. फरीदा पठाण एसपी कार्यालया जवळ येथे उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या ९९७०४६५६९४ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी कळविले.

### डॉक्टरांचा एकदिवसीय संप

**वर्धा-**डोंबिवली येथील शास्त्रीनगर महापालिका रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशनने राज्यव्यापी बंदची हाक दिली आहे. या आंदोलनाला वर्धा जिल्ह्यातील डॉक्टरांनीही पाठिंबा दर्शविला असून एकदिवसीय संपात सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खासगी रुग्णालयांमधील नियमित बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) बंद राहणार आहे. नियोजित शस्त्रक्रिया आणि नियमित वैद्यकीय सेवा स्थगित करण्यात येणार असून रुग्णांना गैरसोय होण्याची शक्यता आहे. मात्र आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, प्रसूती सेवा तसेच जीवनावश्यक उपचार पूर्ववत सुरू राहतील, असे डॉक्टर संघटनांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### सुगंधित तंबाखूसह दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**देवळी-**प्रतिबंधित सुगंधित तंबाखूची दुचाकीवरून तस्करी करणाऱ्या एका युवकावर अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई करून सुमारे १ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शेख राजीक शेख रहीम, रा. मेटनापूर, जि. यवतमाळ असे आरोपीचे नाव आहे. गुप्त माहितीच्या आधारे अंदोरी शिवारात सापळा रचून ही कारवाई करण्यात आली. आरोपीच्या दुचाकीची तपासणी केली असता पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. यावेळी तंबाखू, दुचाकी आणि मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# वृक्षारोपणातून अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत

## मॉडेल कनिष्ठ महाविद्यालयात पर्यावरणपूरक व नाविन्यपूर्ण उपक्रम

**विरूळ आकाजा/जनमाध्यम**
मॉडेल कनिष्ठ महाविद्यालय, विरूळ आकाजी येथे इयत्ता अकरावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वृक्षारोपण आणि विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देतानाच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव आणि महाविद्यालयाबद्दल आत्मीयता निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात नवागत विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाने झाली. त्यानंतर परिचयात्मक, प्रेरणादायी आणि सहभागात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये परस्पर परिचय वाढून महाविद्यालयीन जीवनाची सकारात्मक सुरुवात झाली. यावेळी प्राचार्य मडवे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नवीन शैक्षणिक वातावरणात आत्मविश्वासाने वावरत सातत्यपूर्ण अभ्यासावर भर देण्याचे आवाहन केले. शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकास, शिस्त, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना जोपासणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, सामाजिक उत्तरदायित्व आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रविणा गावंडे,माने आणि सोनकुसरे यांनी विशेष नियोजन केले. तसेच इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांनीही स्वागत समारंभाच्या तयारीत सक्रिय सहभाग घेतला. या उपक्रमामुळे नवागत विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून महाविद्यालयीन जीवनाची सुरुवात अविस्मरणीय ठरल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली.

# हिंगणघाटचा स्वर्णिम भारतीय वॉटरपोलो संघात

## थायलंडमधील आशियाई स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व; जिल्ह्याचा गौरव

**हिंगणघाट/जनमाध्यम**
हिंगणघाट येथील होतकरू जलतरणपटू स्वर्णिम मिलिंद चेपे याची थायलंडमधील बँकॉक येथे १५ ते २५ जुलैदरम्यान होणाऱ्या १२ व्या एशियन एज ग्रुप आंतरराष्ट्रीय वॉटरपोलो स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. या निवडीमुळे हिंगणघाटसह वर्धा जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्वर्णिम हा अमरावती येथील श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा जलतरणपटू असून, वयाच्या सहाव्या वर्षापासून तो नियमित सराव करीत आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये त्याने सातत्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे येथे झालेल्या मिनी ऑलिंपिक वॉटरपोलो स्पर्धेत कांस्यपदक, तर २०२४-२५ आणि २०२५-२६ मधील ज्युनिअर व सिनिअर स्पर्धांमध्ये सुवर्ण व रौप्यपदके पटकावत त्याने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. आतापर्यंतच्या कारकिर्दीत त्याने तीन सुवर्ण, चार रौप्य आणि



दोन कांस्यपदके जिंकली आहेत.

दहावीचे शिक्षण स्कूल ऑफ स्कॉलर्स, अमरावती येथे पूर्ण केल्यानंतर स्वर्णिमने रामकृष्ण विद्यालयातून बारावी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण केली. या यशाचे श्रेय त्याने आई-वडिलांसह श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, प्रशिक्षक आणि मार्गदर्शकांना दिले. त्याच्या या निवडीबद्दल हिंगणघाट व अमरावती परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पैशाच्या वादातून जावयाने साळ्यावर चाकूने हल्ला

**वर्धा-**कौटुंबिक व आर्थिक वादातून जावयाने साळ्यावर चाकूने वार करून गंभीर जखमी केल्याची घटना रामनगर परिसरात उघडकीस आली. आकाश शोभावत असे जखमीचे नाव आहे. त्याच्या बहिणीचा विवाह नागपूर जिल्ह्यातील कांताराम मोहोड याच्यासोबत झाला असून पती-पत्नीमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. सासरी आल्यानंतर आरोपीने पैशांची मागणी करत वाद घातला. वाद मिटविण्यासाठी पत्नी पुढे आली असता तिच्या हाताला चावा घेत आरोपीने जवळील चाकू काढून आकाशवर वार केले. जखमीवर उपचार सुरू असून रामनगर पोलिसांनी तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# शनि मंदिर परिसराला ‘शनि मंदिर चौक’ नाव द्या

## हरियाली अमावस्येपूर्वी नामफलक उभारण्याची शनि भक्तांची मागणी

**पुलगाव/जनमाध्यम**
पुलगाव शहरातील सुमारे दीडशे वर्षांची परंपरा लाभलेल्या प्राचीन शनि मंदिर परिसराला अधिकृतपणे ‘शनि मंदिर चौक’ असे नाव देण्यात यावे, अशी मागणी शनि भक्तांनी नगरपालिका प्रशासनाकडे केली आहे. हरियाली अमावस्येनिमित्त येणाऱ्या शनि जयंतीपूर्वी चौकाचे नामकरण करून नामफलक उभारावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

पिंपळाच्या झाडाखाली वसलेले हे प्राचीन शनि मंदिर पुलगाव शहराच्या स्थापनेपूर्वीचे मानले जाते. विदर्भासह विविध भागांतून भाविक येथे दर्शनासाठी येत असून शनिवारी आणि अमावस्येला मंदिरात मोठी गर्दी होत असते. शर्मा कुटुंबातील पूर्वजांनी सुमारे १५० वर्षांपूर्वी श्रद्धेने या मंदिराची उभारणी केली. कालांतराने भक्तांच्या सहकार्याने मंदिराचा विस्तार आणि विकास झाला. पूर्वी नगरपालिका हद्दीत हा परिसर शनि वार्ड म्हणून ओळखला जात होता. मात्र, प्रभाग रचना लागू



झाल्यानंतर ही ओळख लुप्त झाली. त्यामुळे मंदिर परिसराला त्याची ऐतिहासिक व धार्मिक ओळख पुन्हा मिळावी, तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांना मंदिर सहज सापडावे, यासाठी मंदिरालगतच्या चौकाला ‘शनि मंदिर चौक’ असे अधिकृत नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन शनि मंदिराचे पुजारी तथा शर्मा कुटुंबातील ज्येष्ठ रमेश शर्मा, राजेंद्र शर्मा, श्रवण शर्मा आणि पिंटू शर्मा यांनी नगरपालिका मुख्याधिकारी विजय आश्रम यांना दिले. भाविकांच्या भावना लक्षात घेऊन नगरपालिकेने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

### म्हशींची तस्करी उधळली

**खरांगणा-** कत्तलखान्याकडे दोन म्हशींची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाई करून वाहनासह सुमारे ५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गोवंशाची तस्करी होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर काचनूर फाट्यावर पोलिसांनी नाकाबंदी केली. संशयित वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये दोन म्हशी आढळून आल्या. पोलिसांनी जनावरांची सुटका करून वाहन ताब्यात घेतले. या प्रकरणी राजेश राठोड व मजहर कुरेशी, दोघेही रा. आर्वी, यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या तस्करीमागील साखळीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त हिंदी विश्वविद्यालयात विधी सहाय्य केंद्राचे उद्घाटन

**वर्धा/जनमाध्यम**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष हेमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनात महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापिठ येथे आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त विद्यापिठाच्या कुलगुरु प्रो. कुमुद शर्मा यांच्याहस्ते विधी सहाय्य सेवा केंद्राचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव संजीव सरदार, महात्मा गांधी विश्वविद्यापिठाच्या विधी विभागाचे प्रमुख जनार्धन कुमार तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या विधी सहाय्य केंद्र अधिनियमाच्या उद्दिष्टांनुसार समाजातील दुर्बल, वंचित, उपेक्षित आणि गरजू घटकांना विधी सहाय्य केंद्राच्या माध्यमातून कायदेशीर हक्क व कर्तव्यांची माहिती देणे, गरजू व पात्र व्यक्तींना मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन, मोफत विधी सहाय्य मिळविण्यासाठी आवश्यक सहाय्य तसेच कायदेशीर समस्या उद्भवण्यापूर्वीच पूर्व-विवाद कायदेशीर सल्ला उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे.

तसेच, नागरिकांना विविध शासकीय कल्याणकारी योजना, कायदेशीर हक्क व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करणे, अर्ज, निवेदने, तक्रारी व इतर आवश्यक कागदपत्रे तयार करण्यासाठी सहाय्य करणे आणि आवश्यकतेनुसार प्रकरणे जिल्हा



विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समिती, मध्यस्थी केंद्र, लोकअदालत किंवा अन्य सक्षम प्राधिकरणाकडे संदर्भित करणे, या सुविधा विधी सहाय्य केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. कायदेविषयक जनजागृती व कायदेविषयक साक्षरता वाढविणे, न्यायप्रवेशाबाबत जागरूकता निर्माण करणे, महिला, बालक, विद्यार्थी, दिव्यांग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती तसेच समाजातील इतर वंचित घटकांना त्यांच्या कायदेशीर समस्यांबाबत योग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, तसेच मध्यस्थी, लोकअदालत आणि पर्यायी विवाद निवारण पद्धतींच्या माध्यमातून वादांचे जलद, सुलभ व सौहार्दपूर्ण निराकरण करण्यास प्रोत्साहन देणे, हा देखील विधी सहाय्य केंद्राचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे.

विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी तसेच इतर गरजू व्यक्तींना त्यांच्या कायदेविषयक समस्या, हक्क, तक्रारी किंवा विधी सहाय्याची आवश्यकता असल्यास या विधी सहाय्य केंद्राला भेट देऊन आपली समस्या मांडण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कोणतीही कायदेशीर समस्या लहान किंवा मोठी न समजता योग्य वेळी कायदेशीर मार्गदर्शन घेणे आवश्यक असून, विधी सहाय्य केंद्राच्या माध्यमातून संबंधित व्यक्तींना त्यांच्या समस्येच्या स्वरूपानुसार योग्य मार्गदर्शन व पुढील आवश्यक कार्यवाहीबाबत सहाय्य करण्यात येईल. तातडीच्या कायदेशीर सहाय्यासाठी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचा टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक १५१०० वर संपर्क साधता येईल तसेच जिल्हातील सर्व पोलिस स्टेशन व शासकीय रूग्णालय येथे विधी सहाय्य केंद्र स्थापन करण्यात आले असुन जवळच्या विधी सहाय्य केंद्राला भेट देवून विधी सहाय्य प्राप्त करून घ्यावे,असे आवाहन संजीव सरदार यांनी केले आले. कार्यक्रमाला विधी विभागातील प्राद्यापक, विद्यार्थी व विधी सेवा प्राधिकरणचे कर्मचारी उपस्थित होते.

**NAME IN CHANGE**
My old name according to passport is BILKIS KHERANI, my passport no. is P1251382 & my new name according to Voter Card is BILKIS ABDUL KHERANI, address wardha.

**नावात बदल**
माझे पासपोर्ट वरील माझे REWATKAR ROHIT WAMAN असे नाव होते. माझे दुरुस्त व योग्य नाव REVATKAR ROHIT WAMANRAO या नावाने ओळखले जात आहे. जुन्या पासपोर्ट मध्ये नमूद असलेले चुकीचे नाव व दुरुस्त नाव हे दोन्ही एकाच व्यक्तीचे आहे.
**मो. ९९७०१२८८५७**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## जाहिरनामा / सायटेशन

**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**
**वि. श्री.एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक :- १२७२/२०२६ पुढील तारीख २५.०८.२०२६

झाकिरून्नीसा व इतर विरूध्द निरंक

अर्जदार-**1. Zakirunnisa Wd/o Rafik Khan** Age: 72 yrs, Occ-Household R/o QRT No. 13, Near Paradise colony, Nishad colony Amravati **2. Tanveer Fatema W/o Mohammad Shafi** Age-46 yrs Occ-Labour R/o Imli Plot, Zam Zam Nagar, Amravati **3. Abdul Karim Khan S/o Rafique Khan** Age-44 yrs Occ-Labour R/o Near Masjid E-Ammar, Nishant Colony, VidhaRha Mahavidyalaya Tq Dist Amrvati
**4. Kaneez Fatema W/o Sohel Ahmad Farooqui** Age-43 yrs Occ-Labour R/o Paratwada Road, Ward no. 3, Lakud Market Shirajgaon band, Tq Chandur Bazar Dist Amravati **5. Zubair Khan Rafique Khan** Age-41 yrs Occ-Labour R/o Near Masjid-e-Ammar Nishan Colony VMV S.O. Dist Amravati **6. Junaid Ahmad Khan** S/o Rafique Khan Age-38 yrs Occ-Labour R/o Walgaon Road, Near Masjid-e-Ammar Nishan Colony VMV S.O. Dist Amravati

**विरुध्द- गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत रफीक खान उस्मान खान** हे दि. १२.०६.२०२५ रोजी अमरावती, येथे मयत झाले अर्जदार झकीरून्नीसा व इतर विरूध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **झकीरून्नीसा व इतर विरूध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्छु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०१.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे उमेश गणेश काळे यांच्या वतीने सदर जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णनः मौजे- कवाडगव्हाण, ग्रामपंच्यायत मालमत्ता क्रं. १९७ याचे एकूण क्षेत्रफळ ६०० चौ. फुट. तसेच जुना घर क्रं. १९७, अनु क्रं. १९८, वार्ड क्रं. ३, ता. तिवसा आणि जिल्हा. अमरावती.**

सदर मिळकत माझे **पक्षकार नामे उमेश गणेश काळे यांना सीमा गणेश काळे यांनी बक्षीस पत्र करून दिलेले आहे.** तसेच वरील नमूद मालमत्ता हि वारसाने-वडिलोपार्जित मिळालेली आहे. तसेच वरील नमूद मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण-बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या **७ दिवसाच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता **Piramal Finance ltd. येथे कर्जासाठी** केलेल्या अर्जानुसार सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण - तालुका तिवसा आणि जिल्हा अमरावती.**
**दि. १८/०७/२०२६**

आपला
**ॲड. रवींद्र रू. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. ९८२३६९८७४५**

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर (CJJD), नांदगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र. १८०/२०२६ नेमलेली तारीख :- १०/०८/२०२६

**रविंद्र व ईतर**

**१. श्री. रविंद्र ज्ञानदेवराव माटोडे,** रा. वार्ड नं. १, वाढोणा रामनाथ, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती
**२. प्रतिभा कैलाश म्हस्के,** रा. पो. धनज बुज., ता. कारंजा लाड, जि. वाशिम
**३. शालिनी राजेश हेरोडे,** रा. नारेगाव, पो. झोडगा, जि. वाशिम

**विरुद्ध -निरंक**

**ज्याअर्थी, अन्तकला ज्ञानदेवराव माटोडे व ज्ञानदेव बापुराव माटोडे यांचे मृत्यु अनुक्रमे दि. २६/०८/२००९ व दिनांक २०/०४/२०२३ रोजी झालेला असुन मयत अन्तकला ज्ञानदेवराव माटोडे यांचा मृत्यु वाढोणा रामनाथ, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती व मयत ज्ञानदेव बापुराव माटोडे यांचा मृत्यु सुरत**, ता. जि. सुरत येथे झाला आहे. ते वाढोणा रामनाथ, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती येथील मुळ रहिवाशी होते. अर्जदार क्र. १ हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ व ३ ह्या त्यांच्या मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांकः १७ जुलै, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

## जाहिरनामा

**दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), चांदुर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**
आर.एम.जे.सि. कमांक १५५/२०२६ नेमलेली तारिखः-१९.०८.२०२६

**अर्जदार :- १. हर्षल रमेशराव भबुतकर** वय -४३ वर्षे, धंदा -मजुरी
**२. धिरज रमेशराव भबुतकर** वय -४६ वर्षे, धंदा-मजुरी
**३. श्रीमती प्रमिला रमेशराव भबुतकर** वय -७२ वर्षे, धंदा- घरकाम
नं. १ ते ३ सर्व रा. इंदीरा नगर, चांदुर रेल्वे, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती
**४. सौ. शुभांगी सुधीरराव देशमुख (लग्नाचे नांव)** वय- ४९ वर्षे, धंदा -घरकाम रा. ब्राम्हणसभा कॉलनी, परतवाडा, त्ता. अचलपुर, जि. अमरावती

**-विरूध्द- गैरअर्जदार :- निरंक**

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, **हर्षल रमेशराव भबुतकर व इतर यांनी दिवाणी न्यायाधीश (क स्तर) चांदुर रेल्वे** यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे, अर्ज दाखल केलेला आहे.अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **रमेश पुंडलिकराव लिकराव भबुतकर,** रा चांदुर रेल्वे ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती यांचा मृत्यु दिनांक १०/०५/२०२६ रोजी कुसुमांजली हॉस्पीटल, रूख्मीनी नगर, अमरावती, ता.जि. अमरावती येथे झाला. अर्जदार यांचे शिवाय मयताचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.वरील प्रमाणे सदरहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषीत करून देण्यात येईल. आज दिनांक १५ माहे जुलै २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार
**दिवाणी न्यायालय, चांदुर रेल्वे**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३११**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# श्री समर्थ महाविद्यालयात ११ वीच्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री समर्थ कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी प्रवेश उत्सव उत्साहपूर्ण वातावरणात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने झाली. त्यानंतर नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य सचिन देवळे, पर्यवेक्षक मधुसूदन वटक तसेच पर्यवेक्षक अमित कापगते यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकात अमित कापगते यांनी महाविद्यालयाची ओळख करून देत सर्व विषयशिक्षकांचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला.कोचिंग क्लासला अधिक महत्व न देता नियमित महाविद्यालयात उपस्थित राहणे, गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकासासाठी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाविद्यालयीन शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यास त्याचे विद्यार्थी, कुटुंब व समाजावर होणारे दुष्परिणामही त्यांनी उदाहरणांसह मांडले.



यानंतर मधुसूदन वटक यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच विविध छंद जोपासण्याचे महत्त्व सांगितले. छंदामुळे व्यक्तिमत्त्व विकास, सर्जनशीलता आणि मानसिक स्वास्थ्य वृद्धिंगत होते, तसेच ताणतणाव कमी होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सचिन देवळे यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा, सांस्कृतिक व इतर सहशालेय उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. अभ्यासासोबतच क्रीडा आणि इतर उपक्रमांची सांगड घातल्यास निरोगी, आत्मविश्वासपूर्ण व सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडते, असे त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच नियमित महाविद्यालयात उपस्थित राहून शिक्षणाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन डॉ. मनीषा ठाकरे यांनी केले. प्रवेश उत्सवाच्या निमित्ताने नवागत विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयातील शिक्षकवृंद सदैव त्यांच्या पाठीशी राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

Shri shivaji Education Society, Amravati's

**Matoshree Vimalabai Deshmukh Mahavidyalaya,**

Shivaji Nagar, Rural Institute Area, Amravati,444603

## WANTED

Applications are invited for appointments of candidates for teaching in the college on contributory (CHB) basis as under:-

**Vacancies for Grant-in-aid Course**

(As per Regulation No.2/2020, and its para-II, G.R.Dated 17/10/2022)

| Sr.No. | Subject | Total No. of Contributory post |
|---|---|---|
| 01 | Co-operation | 01 |
| 02 | Sociology | 02 |
| 03 | Political Science | 02 |
| 04 | Home Science | 06 |

**Eligibility :** Academic qualifications shall be as per U.G.C. Regulation २०१८ (University Direction No.०८/२०१९ & ०१४/२०१९) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No. संकीर्ण २०१८ /(१८५/१८)/मशि-३, dt.१४.११.२०१८. The other conditions and Remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

**N.B.:** Eligible candidates should remain present in the college for the direct interview on **dated 23.07.2026 at 10.30 am to 01.30 pm.** alongwith application, original documents, xerox copies of documents at their own expenses.

**Shri Harshvardhan P. Deshmukh**
President
Shri Shivaji Education Society,
Amravati

**Dr. Smita R. Deshmukh**
Principal
Matoshree Vimalabai Deshmukh
Mahavidyalaya, Amravati.

## मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. : १८३/२०२६ नेमलेली तारीखः १०-०८-२०२६

**१. चंदा किशोर ईपर**
**२. अवधुत किशोर ईपर** रा. लोहगांव, ता. नांदगाव खंडे, जि. अमरावती.
**३. पुरुषोत्तम किशोर ईपर** रा. शिव गणेश नगर, धावडे वस्ती, भोसरीगाव, ता. जि. पुणे
**४. पुनम अमोल ठाकरे** रा. वार्ड नं. २. लोहोगाव, ता. नांदगाव खंडे, जि. अमरावती,

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत किशोर हरिभाऊ ईपर** यांचा मृत्यु **दि. ०२.०६.२०२६** मध्ये **लोहोगाव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे अर्जदार क्र. १ ही पत्नी असून **अर्जदार क्र. २ व ३ मुले आहे व अर्जदार क्र. ४ ही मुलगी** आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : ०२ जुलै २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र. २०५/२०२६ नेमलेली तारीख :- १८-०८-२०२६

**१. कमल ज्ञानेश्वर चवाळे**
**२. इंदु उत्तमराव पुंड** रा. कामरगांव, ता. कारंजा लाड, जि. वाशिम
**३. योगेश्वर ज्ञानेश्वर चवाळे**
**४. गोपाल ज्ञानेश्वर चवाळे** रा. वार्ड नं. १, नांदगाव खंडे, ता. नांदगाव खंडे, जि. अमरावती
**५. दीपक ज्ञानेश्वर चवाळे** क्र. १,३,५ रा. वार्ड नं. १, नांदगाव खंडे, ता. नांदगाव खंडे, जि.अमरावती

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत ज्ञानेश्वर पांडुजी चवाळे यांचा मृत्यु दि. २६.०४.२०२६** मध्ये **मुंड निशांकराव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र. १ ही पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ही मुलगी असून अर्जदार क्र. ३ ते ५ ही मुले** आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : १७ जुलै २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर**

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर (CJJD), नांदगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र. १९०/२०२६ नेमलेली तारीख :- ११/०८/२०२६

**रविंद्र व ईतर**

**१. श्री.धनराज रामजी मेश्राम,**
रा. अकोली जहागीर, पो. जामठी बुज, ता.जि. अमरावती
**२. श्री. देविदास रामजी मेश्राम,**
रा. मांजरी म्हसला, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती
**३.अंजना रामनाथ कावरे,**
रा. कवठा कडु, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती

**विरुद्ध -निरंक**

**ज्याअर्थी, गुंफाबाई रामजी मेश्राम यांचा मृत्यू दि. ०५/११/२०१६ रोजी मांजरी म्हसला ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला असुन ते तेथीलच मुळ रहिवाशी होते. अर्जदार क्र. १ व २ ही मुले असुन अर्जदार क्र. ३ ही त्यांची मुलगी आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांकः १७ जुलै, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

**जाहिरनामा**

**दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), चांदुर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय**
आर.एम.जे.सि. कमांक ९७/२०२६ नेमलेली तारिखः-२०.०६.२०२६

**अर्जदार :- १. महानंदा पुरुषोत्तम आयटे** वय ५८ वर्षे, धंदा -घरकाम
**२. दिपीका पुरूषोत्तम आयटे** वय -३६ वर्षे, धंदा -नोकरी
**३. विपुल पुरूषोत्तम आयटे** वय -३४ वर्षे, धंदा -घरकाम
सर्व रा. महारूद्र नगर, चांदुर रेल्वे, ता. चांदुर रेल्वे, जि. अमरावती

**-विरूध्द- गैरअर्जदार- निरंक**

या नोटीस व्दारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, **महानंदा पुरुषोत्तम आयटे व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २ प्रमाणे,** अर्ज दाखल केलेला आहे.अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **पुरुषोत्तम श्रवणजी आयटे, रा. चांदूर रेल्वे, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती** यांचा मृत्यु **दिनांक ०८/११/२०२४ रोजी कुसुमांजली हॉस्पीटल, अमरावती, ता.जि. अमरावती** येथे झाला. अर्जदार यांचे शिवाय मयताचे इतर कोणीही वारसदार नाही. असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे. वरील प्रमाणे सदर्हु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरतु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषीत करून देण्यात येईल.आज दिनांक ०४ माहे मे २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला

शिक्का

आदेशानुसार
**दिवाणी न्यायालय, चांदुर रेल्वे**

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.
**संपर्कः**
**९४२२८५७१६९,**
**९४२२९१८५६९**

## मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. १९०/२०२६ नेमलेली तारीख १२/०८/२०२६

**शिंधु व ईतर**

**१. श्रीमती शिंधु रामदास गजभिये,**
रा. वडाळा, पो, धानोरा गुरव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती
**२. वंदना संघपाल वैद्य,**
रा. कोदोरी मारुफ, पो. धानोरा गुरव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि, अमरावती

**- विरुद्ध -निरंक**

ज्याअर्थी, **रामदास महादेव गजभिये यांचा मृत्यु दि. २०/०८/२०२५ रोजी वडाळा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला असुन ते तेथीलच मुळ रहिवाशी होते. मयत रामदास महादेव गजभिये यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी असुन अर्जदार क्र. २ ही त्यांची मुलगी आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १८ जुन २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

## मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र. १९३/२०२६ नेमलेली तारीख ११-०८-२०२६

**१. प्रकाश नारायण चव्हाण**
**२. योगीराज नारायण चव्हाण**
रा. मांजरी म्हसला, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत नारायण मनिरामजी चव्हाण यांचा मृत्यु** दि. २८.०८.२००५ **मध्ये मांजरी म्हसला, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती** येथे झाला. मयताचे पत्नी नामे **डोमाबाई नारायण चव्हाण** यांचा मृत्यु दि. १४.११.२००१ मध्ये **मांजरी म्हसला, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती,** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र. १ व २** ही मुले आहेत. गयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल

**आज दिनांकः ०४ जुलै २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर (CJJD), नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र. :- १६२/२०२६ नेमलेली तारीख- १८/०८/२०२६

**मंदा व ईतर विरुद्ध निरंक**

**१. मंदा प्रल्हादराव सोनोने,**
रा. छत्री तलाव रोड, जेवड नगर, अमरावती, ता. जि. अमरावती
**२. नंदा सुभाषराव सोनोने,**
रा. प्लॉट रहाटगाव, अमरावती, ता. जि. अमरावती
**३. सविता रामहरी सोनवने,** रा. पथ्रोट, ता. अचलपुर, जि. अमरावती
**४. अंकुश देवराव राऊत** रा. वडुरा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**- विरुद्ध - निरंक**

ज्याअर्थी, **शशिकला देवराव राऊत व मयत देवराव फत्तुजी राऊत यांचे मृत्यु अनुक्रमे दि. ०६/११/२०२० व २१/१०/२०१४ रोजी वडुरा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला असुन ते तेथीलच मुळ रहिवाशी होते. अर्जदार क्र. १ ते ३ ह्या त्यांच्या मुली असुन अर्जदार क्र. ४ हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल. **आज दिनांक :२०२६ रोजी** माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र. १७१/२०२६ नेमलेली तारीख ०३-०८-२०२

**१. राजेंद्र नानाजी गभने** रा. कोठोडा, ता. नांदगाव खंडे, जि. अमरावती.
**२. विनायक नानाजी गभने** रा. कोठोडा, ता. नांदगाव खंडे, जि. अमरावती
**३. घनश्याम नानाजी गभने** रा. सुतगिरणी रोड, गणेश नगर, अमरावती, जि. अमरावती.
**४. आनंद नानाजी गभने** रा. सुतगिरणी रोड, गणेश नगर, अमरावती, जि. अमरावती.
**५. मालती प्रभाकर हटवार** रा. गव्हा निपाणी, ता. जि. अमरावती.
**६. लता रमेशराव तडस** रा. वार्ड नं. ४, सालोड हिरापूर, ता. जि. वर्धा

**//वि// निरंक**

ज्याअर्थी, **मयत नानाजी भिवाजी गभने** यांचा मृत्यु दि. १४.०१.२०१८ मध्ये **काठोडा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे पत्नी नामे **शांताबाई नानाजी गभने** यांचा मृत्यु दि. १०.१०.२०१६ मध्ये **पी. डी. एम.सी. हॉस्पीटल, अमरावती, जि. अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र. १ ते ४ ही मुले असून अर्जदार क्र. ५ व ६ ह्या मुली** आहेत. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.**आज दिनांक : ०२ जुलै २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर (CJJD), नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र.:- १७२/२०२६ नेमलेली तारीख :- ३०/०६/२०२६

**सुरेश निंबर्ते विरुद्ध निरंक**

**१. श्री. सुरेश अमृतराव निंबर्ते,**
रा. मंगरुळ चव्हाळा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**- विरुद्ध - निरंक**

ज्याअर्थी, **अमृत गणुजी निंबर्ते व मयत वच्छलाबाई अमृत निंबर्ते यांचे मृत्यु अनुक्रमे दि. १४/१०/२०१४ व दिनांक ०५/०९/२०१८ रोजी मंगरुळ चव्हाळा, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथे झाला असुन ते तेथीलच मुळ रहिवाशी होते. अर्जदार हा त्यांचा मुलगा आहे. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक : १७ जुलै, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर (CJJD), नादगांव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**
किरकोळ (RMJC) अर्ज क्र.:२१५/२०२६ नेमलेली तारीख १९/०८/२०२६

**हरिशचंद्र व ईतर विरुद्ध निरंक**

**१. हरीशचंद्र शामरावजी कहाळे** रा. जुनी वस्ती बडनेरा, ता. जि. अमरावती
**२. श्रीमती अरुणा दिलीपराव कहाळे**
**३. श्री. शुभम दिलीपराव कहाळे,**
दोघेही रा. सुकळी गुरव, पो. काजना, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती
**४. श्री. स्वप्नील दिलीपराव कहाळे,** रा. अनंत चौक, अंबागेटच्या आत बुधवारा, अमरावती, ता. जि. अमरावती
**५. सौ. धनश्री प्रशांतराव देवरणकर** रा. किल्लोरपुरा, वलगाव, ता. जि. अमरावती
**६. सौ. सुनिता संजयराव तायडे,** रा. गोवर्धन विहार, कांडली, ता. अचलपुर, जि. अमरावती
**७. श्रीमती वनिता जगन उर्फ जयेंद्र डांगे** रा. धानोरा गुरव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**- विरुद्ध -निरंक**

ज्याअर्थी, **शामराव भगवंतराव कहाळे व बेबी शामराव कहाळे यांचे मृत्यु अनुक्रमे दि. ०२/०५/२००६ व दिनांक २५/०८/२०२५ रोजी अनुक्रमे बडनेरा व सुकळी गुरव येथे झाला आहे. ते सुकळी गुरव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती** येथील मुळ रहिवाशी होते. अर्जदार क्र. १ हा त्यांचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही सुन, अर्जदार क्र. ३ व ४ हे नातु, अर्जदार क्र. ५ ही नात व अर्जदार क्र. ६ व ७ ह्या त्यांच्या मुली आहेत. अर्जदार हेच मयत यांचे कायदेशीर वारस आहेत, करीता कायदेशीर वारसदार म्हणुन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम ०८ परीशिष्ट २ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी कोणास वरील अर्जदाराविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर वकीलांमार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवुन निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १७ जुलै, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
**सहाय्यक अधिक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नादगांव खंडेश्वर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### ग्रामगीता ही ग्रामनाथाच्या उद्धाराची जननी-हभप सिताराम गुंडवाळे

**कुऱ्हा-** ग्रामगीता नोहे पारायणासि । वाचता वाट झाली जनासि ।समूळ बदलवी जीवनासी । मनी घेता अर्थ तिचा ।। याप्रमाणे ग्रामगीतेचे वाचन, मनन, चिंतन केल्यास ज्याप्रमाणे गीता बोधाने अर्जूनाचा उद्धार झाला त्याप्रमाणे सामु.ध्यान,प्रार्थना व ग्रामगीता चिंतन,मननाने ग्रामनाथाचा उद्धार होईल म्हणूनच ग्रामगीता ही ग्रामनाथाच्या उद्धाराची जननी आहे. असे मनोगत ह.भ.प. सिताराम गुंडवाळे महाराज,गुरुकुंज यांनी ग्राम जयंती महोत्सवात व्यक्त केले. श्रीगुरुदेव सेवा प्रतिष्ठान,कौंडण्यपूर च्या वतीने आयोजित ग्रामजयंती महोत्सव श्रीसंत नरहरी महाराज टेकडी कौंडण्यपूर येथे संपन्न झाला. ग्राम जयंती महोत्सवात सेवानिवृत्त तलाठी पंजाबराव सरोदे यांचा ९० व्या वाढदिवसानिमित्त सत्कार करण्यात आला.त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने नव्वद ग्रामगीता कार्यकर्त्यांना भेट देण्याचा संकल्प प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आला.तसेच अहिरवाडा सेवा मंडळाचे सेवाधिकारी सुभाष कसर यांचे हस्ते ह.भ.प.गुंडवाळे महाजांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास रामभाऊ दाते, रमेश मुडे, थोटे,कृष्णा आंबुलकर, गोरले, गजानन मडावी यांनी परिश्रम घेतले.संचालन अनिल सरोदे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन प्रतिष्ठानचे प्रचार प्रमुख भूषण मुडे यांनी मानले.

### गुरु पौर्णिमानिमित्त पिंपळे महाराजांचा जन्मोत्सवही साजरा

**बेलोरा-**चांदूरबाजार तालुक्यातील बेलोरा जवळील वाठोंडा येथील



श्री दत्तात्रेय संस्थानमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही २९ जुलै रोजी गुरु पौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. याच दिवशी श्री दत्त मंदिराचे पुजारी पूज्य श्री पिंपळे महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त जन्मोत्सवाचाही सोहळा आयोजित करण्यात आला आहे.या उत्सवानिमित्त वाठोंडा, बेलोरा, चिंचोली काळे, राजुरा तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७ वाजता अभिषेकाने होईल. त्यानंतर सकाळी १० ते १२ या वेळेत ग्रंथ निरूपण आयोजित करण्यात आले आहे. रात्री ८ वाजता महाप्रसाद (भोजन) ठेवण्यात आला असून सर्व भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्री दत्तात्रेय संस्थान भक्तिमंडळ, वाठोंडा यांनी केले आहे.विशेष म्हणजे, वाठोंडा येथील श्री दत्तात्रेय संस्थानाचे मंदिर काशी नदीच्या निसर्गरम्य काठावर वसलेले असल्याने मंदिर परिसर अत्यंत आकर्षक व मनोहारी दिसतो. या पवित्र स्थळाला दूरदूरवरून भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे गुरु पौर्णिमा उत्सवाला यंदाही मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सोयाबीन, कापूस पिकांचे मोठे नुकसान, परिसरातील शेतकरी त्रस्त

## वन्यप्राण्यांचा धुमाकूळ; पावसामुळे संकटात भर, पेरलेली पिके फस्त

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

एकीकडे पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम संकटात सापडला असतानाच दुसरीकडे वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे अंजनगाव बारी परिसरातील शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. रानडुक्कर, रोहीसह इतर वन्यप्राणी रात्रीच्या वेळी शेतात घुसून नुकतीच उगवलेली सोयाबीन व कापूस पिके अक्षरशः फस्त करत आहेत. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून त्यांच्यासमोर जगण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

अंजनगाव बारी परिसरातील अनेक गावांमध्ये वन्यप्राण्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून शेतातील पिकांची मोठ्याप्रमाणात नासधूस होत आहे. पेरणीसाठी कर्ज काढून किंवा मोठा खर्च करून शेती करणाऱ्या



शेतकऱ्यांना आता पिके वाचविण्यासाठी रात्रभर शेतात जागून राखण करावी लागत आहे. तरीही वन्यप्राणी कधीही शेतात घुसून काही मिनिटांत मोठ्या क्षेत्रातील पिकांची नासाडी करत असल्याने शेतकरी हतबल झाले आहेत.

निसर्गाच्या लहरीपणामुळे आधीच पावसाची अनिश्चितता, वाढलेला उत्पादन खर्च आणि आता वन्यप्राण्यांचा वाढता उपद्रव यामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे. डोंगराळ भागालगतच्या शेतांमध्ये हा उपद्रव अधिक तीव्र असून अनेक शेतकऱ्यांना दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागत आहे. शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही वनविभागाकडून ठोस उपाययोजना होत

नसल्याचा आरोप होत आहे. नुकसानग्रस्त पिकांची तातडीने पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, तसेच रानडुक्कर, रोही व इतर वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी शेतकरी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. वनविभागाने याकडे तातडीने लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे 'वन्यप्राण्यांचा बंदोबस्त कधी होणार?' असा संतप्त सवाल अंजनगाव बारी परिसरातील शेतकरी उपस्थित करीत आहेत.

माझ्या मौजा अडगाव (बु.) येथील सहा एकरांतील संपूर्ण सोयाबीन पीक रानडुक्कर व रोहीने फस्त केले. शासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी.

**कमलाकर कदम,** शेतकरी,

वन्यप्राण्यांमुळे तुरीच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. वनविभागाने त्वरित पंचनामा करून शासनाकडून नुकसानभरपाई मिळवून द्यावी.

**सोपान मुळे,** शेतकरी

## या.द.व. देशमुख महाविद्यालयात करिअर संसद



**तिवसा/वार्ताहर**

श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाया 'करिअर कट्टा' या उपक्रमा अंतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली आहे. राज्यभरात एकाच वेळी करिअर संसदेच्या पदाधिकायांचा शपथविधी सोहळा ऑनलाईन पद्धतीने आणि ऑफलाइन पद्धतीने महाविद्यालयामध्ये पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. सोबतच करिअर कट्टा समन्वयक प्रा. रविंद्र विजय पाटील यावेळी मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयीन स्तरावर मुख्यमंत्री म्हणून शारदा राजेंद्र कावनपुरे, नियोजन मंत्री म्हणून अवंतिका देविदास लुटे, कायदे व शिस्त पालन मंत्री म्हणून कादंबरी फकीर जोंधळे तर सामान्य प्रशासन मंत्री म्हणून मोहिनी विनोदराव चौधरी, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री म्हणून शुभम मुरलीधर शेरकुरे, संसदीय कामकाज मंत्री म्हणून सानिका छत्रपती गायकवाड, महिला व बाल कल्याण मंत्री म्हणून आचल अनिल दहाट तर सदस्य म्हणून पल्लवी गणेशराव मते, ओम सतीश बाराब्दे आणि नयन कैलास वानखडे आणि माहिती प्रसारण मंत्री म्हणून कृती कुसमेंद्र सोनटक्के, उद्योजकता विकास मंत्री म्हणून धार्मिक सुनील इंगोले, कौशल्य विकास मंत्री म्हणून आचल आमझरे आदि विद्यार्थ्यांनी शपथ ग्रहण केली. प्रास्ताविक करिअर कट्टा समन्वयक प्रा. रविंद्र पाटील यांनी केले. तर कार्यक्रमाअंती आभार पल्लवी मते हिने मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कु. दीपाली वानखडे आणि सर्व पदाधिकारी यांनी सहकार्य केले.

## शेतकरी जीवन पूरक गोपालनातील राष्ट्रउपयोगी कार्यनिर्मिती

# प्रा.गजानन भारसाकळेंचे संशोधन राष्ट्रीय स्तरावर

**दर्यापूर-**दर्यापूर तालुक्यातील माहुली ( धांडे) येथील शासन पंजीकृत व अनुदानीत गाडगेबाबा गोरक्षण संस्थेचे संस्थापक तथा या समृद्ध गोभवनाचे शिल्पकार प्राध्यापक गजानन रामकृष्ण भारसाकळे यांच्या ' गाईच्या शेणा पासून गोवरी उत्पादनास्तव आयओटी बेस मशीन निर्मिती ' या अभिनव संशोधनाला भारत सरकारच्या डिझाइन्स अधिनियम, २००० अंतर्गत नोंदणीकृत औद्योगिक रचना ( रजिस्टर डिझाइन– वर्ग १५-०१) मंजूर झाला आहे. ही मान्यता त्यांच्या नाविन्यपूर्ण संशोधनाची, तांत्रिक उत्कृष्टतेची आणि ग्रामीण विकासासाठी उपयुक्त तंत्रज्ञानाची राष्ट्रीय स्तरावर झालेली अधिकृत दखल आहे.

यापूर्वीही प्रा. भारसाकळे यांना भारत सरकारकडून एकाच वेळी ३ कॉपीराइट्स प्राप्त झाले असून पर्यावरणपूरक तंत्रज्ञान, जैवऊर्जा आणि टाकाऊ वस्तूंपासून मूल्यनिर्मिती ( वेस्ट टू वेल्थ ) संकल्पनेवरील त्यांच्या गायीच्या शेणापासून रांगोळी व खडू निर्मिती संशोधनाची राष्ट्रीय स्तरावर नोंद झाली आहे. तीन कॉपीराइट्स अधिक डिझाइन पेटेंट ( रजिस्टर डिझाइन ) अशी दुहेरी मान्यता मिळविणे ही अत्यंत दुर्मिळ, गौरवास्पद आणि प्रेरणादायी कामगिरी असल्याने प्रा . गजानन भारसाकळे यांनी अथक परिश्रमावर साकारलेल्या या उत्युंग यशाचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे .



राज्याचा पशुसंवर्धन विभाग तथा महाराष्ट्र गोसेवा आयोग यांनी नोंद घ्यावी असे हे शेतकरी जीवन उत्कर्षाचे गोसेवा पूरक संशोधन असल्याने या कार्यास विशेष महत्व प्राप्त होणार आहे . उन्नत भारत अभियान अंतर्गत सुद्धा हि सेवा येत असल्याने या अभियानाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद्मभूषण तथा संगणक शास्त्रज्ञ डॉ विजय भटकर यांचे या आयओटी बेस मशीन निर्मिती कार्यास योग्य मार्गदर्शनाचा लाभ प्राप्त होणार असल्याची माहिती प्रा भारसाकळे यांनी आमच्या वृत्तपत्राच्या स्थानिक प्रतिनिधी यांना दिली आहे.

या मशीन निर्मिती कार्यासाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती यांनी हॅकेथॉन स्पर्धेतील पुरस्कारातून प्रा. गजानन भारसाकळे यांना स्थापन करून दिलेल्या डंक्स ॲन्ड हर्बस् प्रा लि. या कंपनी द्वारे स्टार्टअप फंडासाठी केंद्र शासनाला मागणी करण्यात येणार आह. प्रा. भारसाकळे हे शिक्षण महर्षि डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेत प्राध्यापक म्हणून कार्यरत असल्याने संस्थेच्या बाभूळगांव - अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयाच्या लौकीकात मानाची भर पडली आहे . याच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे विद्यमान अध्यक्ष असणारे प्रा . गजानन भारसाकळे यांना यापूर्वीच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे गाडगेबाबा समाजकार्य व पर्यावरण हे दोन्ही प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त आहेत ही बाब सुद्धा इथे उल्लेखनिय ठरते. आई महोत्सव या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे जनक म्हणून ओळख निर्माण असलेले दर्यापूरच्या गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष प्रा. गजानन भारसाकळे हे दर्यापूर तालुक्यातील बेलोरा या गावचे माजी सरपंच असल्याने संपूर्ण बेलोरा गावकरी तथा संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या गाडगेबाबा मंडळाच्या सभासदांनी प्रा भारसाकळे या अष्टपैलू व्यक्तीमत्वावर राष्ट्रउपयोगी कार्यपूर्ततेबाबत अभिनंदनाचा वर्षाव केला आहे .

# ऑपरेशन 'कवच' अंतर्गत पोलीस स्टेशनद्वारे जनजागृती



**अचलपूर/वार्ताहर**

अमली पदार्थांच्या वाढत्या विळख्यातून समाजाला मुक्त करण्यासह रस्ते सुरक्षिततेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांच्या पुढाकाराने 'ऑपरेशन कवच' अंतर्गत १८ जुलै रोजी अचलपूर शहरात प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रभात फेरीत 'अमली पदार्थमुक्त समाज' व 'हेल्मेट वापर-सुरक्षित जीवन' या विषयांवर व्यापक जनजागृती करण्यात अचलपूर पोलिस स्टेशन चे अधिकारी यांच्या कडून करण्यात आली.यावेळी अचलपूर शहरातील विविध शाळा ,विद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.ही रॅली शहरातील मुख्य चौकातून निघाली.

यावेळी विद्यार्थ्यांच्या हातात असलेले अमली पदार्थ संदर्भातील जनजागृतीचे बॅनर सर्वांचे आकर्षणाचे केंद्र ठरली.यावेळी अमली पदार्थांपासून दूर राहण्याची तसेच हेल्मेट वापरण्याची सामूहिक प्रतिज्ञा सुद्धा घेण्यात आली.यावेळी जनजागृतीसाठी बॅनर्स, प्लॅकार्ड्स, घोषवाक्ये, हॅंडबिल्स आदी साहित्याचा वापर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विविध घोषवाक्यातून परिसर दणाणले.यामुळे या जनजागृती रॅली चा माध्यमातून अचलपूर शहरातील युवक व नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. या प्रभात फेरीचे यशस्वी आयोजन अचलपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार शेषराव नितनवरे, सहा. पोलीस निरीक्षक राहुल खांडेकर, अतिक शेख तसेच जमील शेख, खुपिया विभागाचे मोहन वावरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच विविध शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यामध्ये राजेश खोलापुरे, कचरु पटवारी, माणिक देशपांडे, घनश्याम बुंदेले, सागर पुरोहित आदी नागरिक ,सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.



## छत्रपती शिवाजी कला महाविद्यालयात 'करिअर कट्टा' अंतर्गत करिअर संसदेची स्थापना

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

वीर बाजीप्रभू क्रीडा व व्यायाम मंडळद्वारा संचालित छत्रपती शिवाजी कला महाविद्यालय, आसेगाव पूर्णा येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत करिअर संसदेची स्थापना करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये करिअरविषयी जागरूकता, नेतृत्वगुण आणि सहभाग वाढावा या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुवर्णा जवंजाळ या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. रवींद्र इचे, डॉ. भारत कल्याणकर, डॉ. प्रवीण सदार, डॉ. आशिष काळे, मुक्ता निंभोरकर व लिल्हारे उपस्थित होते. मान्यवरांच्या



उपस्थितीत करिअर संसदेच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा शपथविधी पार पडला. तसेच त्यांना प्रमाणपत्रे व करिअर डायरीचे वितरण करण्यात आले. करिअर संसदेच्या कार्यकारिणीत मुख्यमंत्रीपदी पूनम अटाळकर, नियोजन मंत्री सायमा परवीन, कायदा व शिस्तपालन मंत्री श्रुती इंगळे, माहिती व प्रसारण मंत्री क्रिश अंभोरे, सामान्य प्रशासन मंत्री मैविश शेख, उद्योजकता विकास मंत्री आदेश लाधे, रोजगार व स्वयंरोजगार मंत्री संकेत नांदणे, कौशल्य विकास मंत्री उज्वल प्रजापती, संसदीय कामकाज मंत्री वैष्णवी नांदणे, महिला व बालकल्याण मंत्री श्रावणी पारिसे यांची निवड करण्यात आली. तर निशा कैथवास व विशाल गुंजकर यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी करिअर कट्टा उपक्रमातून मिळालेल्या प्रशिक्षणाबाबत मनोगत व्यक्त केले. डॉ. भारत कल्याणकर यांनी तरुणांना योग्य करिअर दिशा देण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त असल्याचे सांगितले. डॉ.रवींद्र इचे यांनी कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय समारोपात डॉ.सुवर्णा जवंजाळ यांनी नवीन शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच युवकांना शिक्षणाबरोबर रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी करिअर कट्टा हा स्तुत्य उपक्रम असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन करिअर कट्टा समन्वयक डॉ. काळे यांनी केले. आभार प्रदर्शन सहसमन्वयक लिल्हारे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विभागात पावसाची टक्केवारी घसरली

**अमरावती-** विभागात मान्सूनच्या सुरुवातीला समाधानकारक पाऊस झाल्यानंतर आता पावसाने पुन्हा दडी मारल्याने खरीप हंगामाबाबत चिंता वाढू लागली आहे. १६ जुलै २०२६ पर्यंत विभागात १९९.६ मिमी पावसाची नोंद झाली असून, ती या कालावधीतील सरासरीच्या केवळ ७३.६ टक्के आहे. जुलै महिन्यात अपेक्षित पावसापेक्षा लक्षणीय तूट राहिल्याने सोयाबीन, कापूस, तूरसह अन्य खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये यवतमाळमध्ये सर्वाधिक २३१.३ मिमी (७८ टक्के) पाऊस झाला आहे. त्यापाठोपाठ बुलढाणा १८७.९ मिमी (७८.८ टक्के), अकोला १७८.१ मिमी (७०.६ टक्के), अमरावती २०६.७ मिमी (६९.५ टक्के) तर वाशीममध्ये सर्वात कमी १६६.३ मिमी (५६.९ टक्के) पावसाची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे, जुलै महिन्यात आतापर्यंत अमरावती विभागात केवळ ७४.५ मिमी पाऊस झाला असून तो जुलैच्या सरासरीच्या ६०.२ टक्के आहे. अमरावती जिल्ह्यात जुलैमध्ये फक्त ६०.६ मिमी पाऊस पडला असून तो सरासरीच्या ४२.३ टक्के इतकाच आहे. त्यामुळे पिकांना आवश्यक ओलावा मिळत नसल्याने अनेक भागांतील शेतकरी चिंतेत आहेत. जून महिन्यात मात्र अमरावती जिल्ह्यात १४०.१ मिमी म्हणजेच सरासरीच्या ९६.२ टक्के पावसाची नोंद झाली होती. त्यानंतर मोठया प्रमाणावर खरीप पेरण्या पूर्ण झाल्या.

## कोंडवाडा नावापुरताच आहे काय?- मोकाट गाढवांचा हैदोस

# जनावरे उतरले रस्त्यावर नगरपालिका प्रशासनावर नागरिकांचा संताप

**दर्यापूर/प्रतिनिधी**

शहरातील अनेक भागांमध्ये मोकाट गाढवे व इतर जनावरांचा वाढता वावर नागरिकांसाठी गंभीर समस्या बनला आहे. काही दिवसांपूर्वी मोकाट गाढवांच्या हल्ल्यात एका विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झाली होती. एवढी गंभीर घटना घडूनही नगरपालिका प्रशासनाने अद्याप कोणतीही प्रभावी कारवाई न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.विशेष म्हणजे, नगरपालिकेकडे कोंडवाड्याची व्यवस्था असताना तो केवळ नावापुरताच आहे काय? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. मोकाट जनावरे रस्त्यावर मुक्तपणे फिरत असताना कोंडवाड्याचा उपयोग नेमका कशासाठी केला जात आहे, असा प्रश्नही विचारला जात आहे.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर मोकाट गाढवे ठाण मांडून बसत असल्याने वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना दररोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत असून प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी



केला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक वेळा तक्रारी करूनही नगरपालिका प्रशासनाने केवळ आश्वासनांची खैरात केली. प्रत्यक्षात मोकाट जनावरे पकडण्यासाठी कोणतीही विशेष मोहीम राबविण्यात आलेली नाही.

त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्याधिकारी व नगरपालिका प्रशासनाला आता नागरिकांचा थेट सवाल आहे. 'कोंडवाडा नावापुरताच आहे काय? विद्यार्थी गंभीर जखमी झाल्यानंतरही प्रशासनाला जाग का आली नाही?' मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करून संबंधित मालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

दर्यापूर शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित हा अत्यंत गंभीर विषय असून, आणखी एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी नगरपालिका प्रशासनाने तातडीने व्यापक मोहीम राबवून मोकाट जनावरांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी एकमुखी मागणी नागरिकांनी केली आहे

# अकोल्यात बनावट नोटांचे रॅकेट उध्वस्त

## -९७ हजार रुपयांच्या बनावट नोटा जप्त

### -स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, तिघांना अटक

### मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू

**अकोला/प्रतिनिधीः-** : भारतीय चलनातील बनावट नोटा बाजारात खऱ्या नोटांप्रमाणे वापरण्याच्या तयारीत असलेल्या टोळीचा पर्दाफाश करण्यात अकोला स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. गुप्त माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या नियोजनबद्ध कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून ५०० रुपयांच्या १९४ बनावट नोटा, असा एकूण ९७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या रॅकेटचे धागेदोरे बुलढाणा जिल्ह्यातील डोणगावपर्यंत पोहोचल्याने या प्रकरणामागे मोठे जाळे कार्यरत असल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून मुख्य सूत्रधाराचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची व्याप्ती वाढविली आहे.



स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना १७ जुलै रोजी गोपनीय माहिती मिळाली होती. अकोला तालुक्यातील गुडधी येथील एक व्यक्ती स्वतःजवळ बनावट भारतीय चलनी नोटा बाळगून त्या बाजारात ☞(पान २ वर)

**बुलढाण्यापर्यंत पोहोचले तपासाचे धागेदोरे**

तिसरा आरोपी विठ्ठल संजय वारोकार याने बनावट नोटा बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील एका व्यक्तीकडून आणल्याची माहिती चौकशीत दिली. त्यामुळे या रॅकेटमागील मुख्य पुरवठादारांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाचा विस्तार केला आहे.

# अमरावतीच्या तरुणीची नाशिकमध्ये हत्या

### -प्रियकराने केली आत्महत्या -दुसऱ्यासोबत लग्न ठरल्यामुळे केले ठार



**अमरावती/प्रतिनिधीः-** नाशिकमधील इंदिरानगर परिसरात वनसंपदा सोसायटीजवळील उद्यानासमोर शुक्रवारी रात्री साडेदहाच्या सुमारास २० वर्षीय तरुणीची भररस्त्यात गळा चिरून निर्घृण हत्या करण्यात आली. प्रेमसंबंधात फसवणूक करून दुसऱ्या व्यक्तीशी लग्न ठरवल्याच्या संशयातून हा खून केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. दरम्यान, घटनेनंतर फरार झालेल्या संशयित युवकाने इंदिरानगर परिसरातील झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल ☞(पान २ वर)

**दुहेरी घटनेमुळे परिसरात उडाली खळबळ**

दरम्यान, पोलिसांकडून साहिलचा शोध सुरू असताना इंदिरानगर येथील जॉगिंग ट्रॅक परिसरातील झाडाझुडपांत त्याने झाडाच्या फांदीला दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केल्याचे उघड झाले. या दुहेरी घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. इंदिरा नगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# आफाक शेख हत्याकांडातील मुख्य आरोपी 'रामा' अपघातात गंभीर जखमी

### फरार असतानाच दुचाकी दुभाजकावर आदळली

### आयसीयूमध्ये उपचार, रुग्णालयाबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाजलेल्या आफाक शेख हत्याकांडातील मुख्य आरोपी 'रामा' हा फरारी असतानाच झालेल्या भीषण रस्ते अपघातात गंभीर जखमी झाला. गुरुवारी रात्री छत्री तलाव मार्गावर त्याची दुचाकी दुभाजकावर आदळल्याने त्याच्या डोक्याला व खांद्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने शहरातील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून आयसीयूमध्ये उपचार सुरू आहेत. घटनेची



माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात धाव घेत संपूर्ण परिसरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला आहे. आरोपीवर पोलिसांच्या कडक निगराणीखाली उपचार सुरू आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ जुलै रोजी सकाळी ☞(पान २ वर)

# उधारीच्या वादातून ट्रक चालकाची हत्या

### पुरावे नष्ट करण्यासाठी ट्रकला आग, दोन आरोपी ताब्यात

### -एआयच्या मदतीने २४ तासांत खुनाचा उलगडा

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील चिखल सावंगी फाटा येथे ट्रकच्या केबिनमध्ये जळालेल्या अवस्थेत आढळलेल्या चालकाच्या हत्येचा उलगडा अमरावती ग्रामीण पोलिसांनी अवघ्या २४ तासांत केला. उधारीच्या पैशांच्या वादातून चालकाची हत्या करून पुरावे नष्ट करण्यासाठी ट्रकला आग लावण्यात आल्याचे तपासात समोर आले असून, अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या मदतीने दोन आरोपींना गुजरात आणि जळगावातून ताब्यात घेण्यात आले आहे. १५ जुलैच्या रात्री डायल ११२ वर ट्रकला आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर मोर्शी पोलीस आणि अग्निशमन



दल घटनास्थळी दाखल झाले. आग विझवल्यानंतर ट्रकच्या केबिनमध्ये पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत एका व्यक्तीचा मृतदेह आढळला. सुरुवातीला हा अपघात की घातपात, याबाबत संभ्रम होता. ट्रक क्रमांक एमएच-२९-टी-२९०३च्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला. वाहनाच्या मालकाचा शोध घेतल्यानंतर मृत व्यक्तीचा ☞(पान २ वर)

# बनावट बियाणे विक्री प्रकरणी दोन कंपन्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** शेतकऱ्यांना निकृष्ट बियाणे विकून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी खारतळेगाव पोलीस स्टेशनमध्ये दोन वेगवेगळ्या बियाणे कंपन्यांविरुद्ध कलम ३१८(४) नुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विशेष निरीक्षक लक्ष्मण (वय ४४) यांच्या तक्रारीवरून बूस्टर प्लांट जेनेटिक्स प्रा.लि. कॉर्पोरेट विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहिती नुसार तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सदर कंपनीच्या बियाण्याची विक्री झाली. शेतकरी समितीने शेतावर जाऊन पाहणी केली असता, बियाण्याच्या वापर न झाल्यामुळे खरीप हंगामाचा पूर्ण खर्च वाया गेला. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाची बदनामी झाली आहे. तसेच निरीक्षक प्रमोद (वय ४८ ) यांच्या तक्रारीवरून पार्थ जेनेटिक्स एलएलपी विरुद्ध गुन्हा दाखल झाला. तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर सदर कंपनीच्या बियाण्याची विक्री झाली असून त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास ☞(पान २ वर)

# राजापेठ पोलिसांनी उघडकीस आणले तीन चोरीचे गुन्हे

### सराईत चोर अटकेत ; बोकड व बांधकाम साहित्य हस्तगत


**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलिसांनी चोरीच्या गुन्ह्यांवर प्रभावी कारवाई करत सराईत चोरट्याला अटक केली असून त्याच्याकडून तीन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळविले आहे. आरोपीच्या कबुलीजबाबातून कवरनगर आणि स्वास्तिकनगर परिसरातील चोरीच्या घटनांचाही उलगडा झाला आहे.

राजापेठ पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्हा क्रमांक ६०२/२०२६ (भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)) च्या तपासादरम्यान पोलिसांनी नरेश रोशबाबू पवार (वय २१, रा. राजुरा पारधी बेडा, अमरावती) याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. पुढील सखोल चौकशीत त्याने काही दिवसांपूर्वी राजापेठ पोलीस ठाण्याच्या ☞(पान २ वर)

# ४.४५ कोटीचा गांजा ग्रामीण पोलिसांनी केला नष्ट

### ४७ कारवाईमध्ये केला होता जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलिसांनी अमली पदार्थां विरोधात राबवलेल्या 'ऑपरेशन कवच' अंतर्गत मोठी कारवाई केली आहे. विविध पोलीस ठाण्यांमध्ये जप्त असलेला सुमारे ४ कोटी ४५ लाख ८० हजार रुपये किंमतीचा १४८६ किलो गांजा पोलिसांनी शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट केला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अंमली पदार्थांचे अवैध उत्पादन, वाहतूक, साठवण आणि विक्री



रोखण्यासाठी विशेष अभियान सुरू आहे. याच अभियाना अंतर्गत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाणे ☞(पान २ वर)

# धारणी पोलिसांची अवैध रेती वाहतुकीवर कारवाई

### -६.५८ लाखांचा ट्रॅक्टर, ट्रॉली आणि एक ब्रास रेती जप्त; दोघांविरुद्ध गुन्हा



**धारणी/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलीस दलाने अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधातील मोहिमेला वेग देत धारणी तालुक्यात मोठी कारवाई केली. बैरागड परिसरात विनापरवाना रेतीची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला पकडून ६ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चालक व मालकाविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे आणि गौण खनिजांच्या बेकायदा वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. ☞(पान २ वर)

# अमरावतीत वेश्याव्यवसायाच्या संघटित रॅकेटचा पर्दाफाश

### राजापेठ पोलिसांची कारवाई; दोघांना अटक,तीन महिलांची सुटका

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरातील राजापेठ पोलिसांनी अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियमांतर्गत मोठी कारवाई करत शहरात सुरू असलेल्या संघटित वेश्याव्यवसायाच्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. सामरा नगर परिसरातील साईदर्शन रेसिडेन्सी येथे टाकलेल्या सापळ्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली असून तीन महिलांची सुटका करण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास आता शहराबाहेरील राज्यांपर्यंत पोहोचला असून डिजिटल पुराव्यांच्या आधारे रॅकेटचे विस्तृत जाळे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.



पोलिसांना ८ जुलै रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेऊन बनावट ग्राहक, पंच आणि पोलीस पथकाच्या मदतीने सामरा नगरातील कृष्ण मंदिराजवळील साईदर्शन रेसिडेन्सी, फ्लॅट ☞(पान २ वर)

# अमरावती ग्रामीण पोलीस दलाला आधुनिक सुविधा

## व्यायामशाळेचे उद्घाटन, पोर्टेबल टॉयलेट व रेनकोटचे वितरण

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती ग्रामीण पोलीस दलाच्या कार्यक्षमतेसह पोलीस कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, सुरक्षितता आणि मूलभूत सुविधांमध्ये भर घालणाऱ्या विविध उपक्रमांचे उद्घाटन व वितरण समारंभ शुक्रवारी (१७ जुलै) जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे उत्साहात पार पडला. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात आलेल्या पोर्टेबल टॉयलेट व रेनकोटचे वितरण तसेच जिल्हा क्रीडा निधीतून नूतनीकरण करण्यात आलेल्या आधुनिक व्यायामशाळेचे उद्घाटन महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते आभासी पद्धतीने करण्यात आले. कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, खासदार अमर काळे, विधान परिषदेचे सदस्य प्रवीण पोटे-पाटील, संजय खोडके, ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, आमदार रवी राणा, सुलभा खोडके, प्रताप अडसड, केवलराम काळे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, उमेश (चंदू) यावलकर, गजानन लवटे यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि पोलीस अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात आलेले पोर्टेबल टॉयलेट मोठ्या बंदोबस्ताच्या ☞(पान २ वर)

# दोन युवा बॉडी बिल्डर्सचा अपघातात मृत्यू

### -पुसदमध्ये पसरली शोककळा

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी येथे गुरुवारी रात्री झालेल्या एका भीषण कार अपघातात जिल्ह्यातील पुसद येथील दोन युवा व अत्यंत होतकरू बॉडी बिल्डर्सचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात हिंगोली येथील एक तरुण जखमी झाला आहे. परिमल राठोड (वय २२, रा. श्रीरामपूर, पुसद) आणि उदय गजरे (वय १९, रा. सप्तगिरी नगर, पुसद) अशी मृत तरुणांची नावे आहेत. या अपघातामुळे पुसद शहरावर शोककळा पसरली आहे.माहितीनुसार, पुसद येथील काही तरुण ☞(पान २ वर)



# दिव्यांग युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर शहरातील बेगमपुरा परिसरात राहणारे दिव्यांग युवक तथा पानखोका व्यावसायिक दिनेश ज्ञानेश्वर गाडगे (वय ४२) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना शनिवारी दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. मृत्युपूर्वी एक इसम धमकी देत असल्याची चिठ्ठीत लिहुन ठेवले आहे .या घटनेमुळे शहरात हळहळ व्यक्त होत असून मृत्यूमागील कारणांचा तपास अचलपूर पोलिसांकडून सुरू आहे. प्राप्त माहितीनुसार, दिनेश गाडगे यांचा तहसील रोडवरील अभिनव कॉलनीजवळ पानखोक्याचा व्यवसाय होता. त्यांच्या टपरीजवळ अवैध सावकरी करणाऱ्या वहीद सोनेरी बालवाला याने दुप्पट पैसे मिळवून ☞(पान २ वर)

पोलीस अधीकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित चिठ्ठी ही आत्महत्येच्या दिवशी नव्हे, तर दीड ते दोन महिन्यांपूर्वी लिहिलेली असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. या चिठ्ठीतील मजकुराच्या आधारे पोलिसांकडून विविध पैलूंवर तपास सुरू करण्यात येईल .

**-ठाणेदार ,नितनवरे अचलपुर**

# नशेत स्वतःचे घर पेटवून पत्नीला मारहाण

### वरूड तालुक्यातील सुरली गावातील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरगुती वादातून एका इसमाने दारूच्या नशेत स्वतःचेच घर पेटवून पत्नीला मारहाण केल्याची धक्कादायक घटना वरुड तालुक्यातील सुरली गावात समोर आली आहे. या आगीत सुमारे १.५० लाख रुपयांचे घरातील साहित्य जळून खाक झाले.माहितीनुसार, आरोपी भूषण विष्णुपंत गोमकाले (वय ४० ) याचे पत्नी आणि मुलीसोबत गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होते. तो पत्नी आणि मुलीवर घर सोडून जाण्यासाठी सतत दबाव टाकत होता.अशात गुरुवारी रात्री पत्नी घराबाहेर गेली होती आणि मुलगी घरात एकटी होती. त्यावेळी नशेत आरोपी घरात आला आणि त्याने घरात तोडफोड सुरू केली. मुलीने घाबरून आईला फोन करून माहिती दिली. पत्नी घरी पोहोचताच तिने आरोपीला अडवण्याचा प्रयत्न केला. त्याच रागातून आरोपीने घरात पेट्रोल शिंपडून आग लावली. पाहता पाहता आगीने विक्राळ ☞(पान २ वर)

# राजकमल चौकात भाजपाचे हनुमान चालीसा पाठ

### उद्धव ठाकरेंच्या रामरक्षा पाठाच्या विरोधात रस्त्यावर

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिवसेना उबाठा प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना सदबुद्धी देण्याची प्रार्थना करत भाजपा पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आज शनिवार १८ जुलै रोजी सकाळी शहरातील राजकमल चौकात सामूहिक हनुमान चालीसा पाठ करत नागपूर मधील उद्धव ठाकरेच्या रामरक्षा आंदोलनाला प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. अयोध्या येथील राम मंदिरात झालेल्या चोरी प्रकरणात उद्धव ठाकरे यांनी रामरक्षा आंदोलन सुरू केले आहे. मुंबई



नंतर आज नागपूर येथील रामनगर मध्ये उबाठा पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. उद्धव ठाकरे यांच्या आंदोलनाला उत्तर देण्यासाठी भाजपाने राजकमल चौकात हनुमान चालीसा पठण करून उद्धव ठाकरे यांना सद्बुद्धी देण्याची प्रार्थना केली. खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे आणि राजेश वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उद्धव ठाकरे यांना 'सद्बुद्धी मिळो' अशी प्रार्थना करण्यात आली.भाजपा नेत्यांनी आपली भूमिका व्यक्त करताना सांगितले ☞(पान २ वर)

# सारांश

जनमाध्यम — एक प्रतिष्ठित सवय

रविवार, १९ जुलै २०२६ E-paper - www.janmadhyam.com


**चारोळी**

माझी दोरी त्याच्या गळ्याला,
त्याची तिसऱ्याच्या गळ्याला
खूप उशिरा कळलं
चैन मार्केटिंग म्हणतात त्याला

मोबाईलने भल्या भल्यांना
शिकविले खोटे बोलायला
मिटिंग मध्ये व्यस्त आहे,
बारमधून बायकोला मेसेज पाठवला

**भारतीय इतिहासकारांकडून अनौपचारिक चर्चांत एक मुद्दा बऱ्याचदा चर्चिला जातो. मोहनदास करमचंद ऊर्फ महात्मा गांधी यांस पोर्तुगालच्या अमलाविरोधात उपोषण करावे लागले असते तर काय झाले असते? या मुद्द्यामागील मथितार्थ असा की ब्रिटिश हे तुलनेने सहिष्णू होते म्हणून ते महात्मा गांधी यांच्या उपोषणांची दखल वेळोवेळी घेत गेले.**

# उद्दामांसमोर उपोषण

भारतीय इतिहासकारांकडून अनौपचारिक चर्चांत एक मुद्दा बऱ्याचदा चर्चिला जातो. मोहनदास करमचंद ऊर्फ महात्मा गांधी यांस पोर्तुगालच्या अमलाविरोधात उपोषण करावे लागले असते तर काय झाले असते? या मुद्द्यामागील मथितार्थ असा की ब्रिटिश हे तुलनेने सहिष्णू होते म्हणून ते महात्मा गांधी यांच्या उपोषणांची दखल वेळोवेळी घेत गेले. तथापि भारतावर ब्रिटिशांऐवजी स्वत:स हुकूमशहा म्हणवून घेणाऱ्या पोर्तुगालचा सम्राट सालाझार याचा अंमल असता तर महात्मा गांधी यांच्या उपोषणाची दखल त्याच्या निर्दयी राजवटीने घेतली असती का? हाच प्रश्न सोनम वांगचुक यांच्या उपोषणाच्या निमित्ताने विचारता येईल. आज देशात लोकशाही आहे. ती दशकभरापूर्वीही होती. त्या वेळी अण्णा हजारे यांच्या उपोषणास दहा दिवस उलटून गेले की माध्यमे टाहो फोडू लागत, सुमार चित्रपट-तारेतारका सरकारला जाब विचारत आणि सामान्य माणूस मेणबत्ती संप्रदायात सहभागी होत असे. वांगचुक यांच्या ताज्या उपोषणाचा १९ वा दिवस उलटत आला तरी यातील काहीही होताना दिसत नाही. माध्यमे- विशेषत: वृत्तवाहिन्या- शांत आहेत, तारे-तारका खाली मान घालून गुमान जगत आहेत आणि मेणबत्ती संप्रदाय तर अस्तित्वातच नाही. ही परिस्थिती अपरिहार्यपणे एका प्रश्नाची प्रेरणा ठरते आणि त्यातून उत्तरही देते. काँग्रेस-कालातील यशस्वी उपोषणकर्ते अण्णा हजारे यांनी आता उपोषण केले तर त्यांना तितकेच 'यश' मिळेल का? याच्या उत्तरातच आता उपोषण करण्याची हिंमत अण्णा का दाखवू शकत नाहीत, या प्रश्नाचे उत्तरही दडलेले आहे.


प्रश्न सरकार कोणत्या पक्षाचे आहे हा मुळीच नाही. ते कोणत्याही पक्षाचे असो. सरकारला दुष्टपणाने वागण्याचा अधिकार नाही. सरकार म्हणजे एक व्यक्ती नव्हे आणि राज्य यंत्रणा म्हणजे अशा एका व्यक्तीची जहागिरी नव्हे. लोकशाहीत सरकार हे घटनेस बांधील असते आणि सर्व नागरिकांप्रति समानतेने वागण्याची शपथ सत्ताधीशांस पद ग्रहण करताना घ्यावी लागलेली असते. ''मी कोणाशीही आपुलकीने वा दुष्टबुद्धीने वागणार नाही'' या शपथेशी मंत्री बांधलेला असतो. या शपथेचे पुढे साग्रसंगीत काय भजे केले जाते ते नव्याने सांगण्याची गरज नाही. विविध 'अ'द्योगपती ते धर्मगट अशा अनेकांबाबत यातील आपुलकीचा भाग ठसठशीतपणे दिसून येतो. तो वाईट. पण सरकारी दुष्टबुद्धी त्यापेक्षाही अधिक वाईट. ती एखादी व्यक्ती, समाज वा संस्था यांचे अस्तित्व पुसून टाकू शकते. दुसरे असे की सरकारी दुष्टपणाविरोधात सामान्यांस कोणीही वाली नसतो. म्हणून माध्यमांचे कर्तव्य हे की त्यांनी या सामान्यांची कड घ्यावी, त्यांचे मुद्दे जनतेपर्यंत व्यापकपणे पोहोचवावेत आणि सत्ताधीशांस पीडित/ वंचित यांच्या वतीने जाब विचारावा. या आपल्या विहित कर्तव्यांचा विसर माध्यमांस पडला वा त्यांनी त्याकडे काणाडोळा केला की काय होते ते सारे वर्तमानात पाहावयास मिळते. हीच माध्यमे दशकभरापूर्वी अण्णा हजारे यांच्या उपोषणाचे थेट प्रक्षेपण करण्यात धन्यता मानत होती आणि बाबा रामदेव ते किरण बेदी यांच्यासारखे अनेक लबाड त्यात त्यामुळे सहभागी होत होते. त्यांच्यापेक्षाही माध्यमांनी त्या वेळी आपले कर्तव्य पार पाडण्याची हिंमत दाखवल्यामुळे या उपोषणांचा इष्ट परिणाम झाला. त्याची बक्षिशी बाबा रामदेव वा किरण बेदी यांस काही ना काही रूपाने मिळाली. परिणामी सोनम वांगचुक यांच्या उपोषणाबाबत मतलबी मेणबत्ती सांप्रदायी सोयीस्कर शांत आहेत.



त्याच वेळी विरोधकही त्याच शांततेचे प्रदर्शन करत असल्याने वांगचुक यांच्या उपोषणास कोणी वाली नाही, अशी परिस्थिती दिसते. मनमोहन सिंग सरकारच्या काळातील आंदोलने/ उपोषणांच्या आगीत त्यावेळच्या विरोधी पक्षाने, म्हणजे भाजपने, सतत तेल ओतले जात राहील याची खबरदारी घेतली. किंबहुना तशी व्यवस्था झाल्यावरच अण्णा आणि अन्य बोलघेवडे रामलीला मैदानात जमा होत. म्हणजे अण्णा हजारे हे केवळ कठपुतळी होते. त्यांच्या आंदोलनाची सूत्रे त्यावेळच्या विरोधी पक्षाहाती- म्हणजे अर्थातच भाजपहाती- होती. वांगचुक यांच्याबाबत तसे नाही. एक तर ते अण्णा हजारे आणि कंपूइतके हलके नाहीत. त्यांचा स्वत:चा असा विचार आहे आणि तो त्यांनी कोणा एका पक्षाच्या दावणीला बांधलेला नाही. आणि दुसरे महत्त्वाचे कारण असे की अण्णांच्या तुलनेत सोनम वांगचुक यांची मागणी अधिक ठोस आहे. अण्णांचे आंदोलन/ उपोषण होते भ्रष्टाचाराविरोधात लोकपाल व्यवस्था केली जावी यासाठी. मनमोहन सिंग सरकारात कोणी राजकीय चाणक्य असते तर त्यांनी ही फोकनाड मागणी लगेच मान्य करण्याचे चातुर्य दाखवले असते. कारण या लोकपाल निर्मितीने शून्य फरक पडणार होता. 'लोकसत्ता'ने त्याही वेळी तसे लिहिले होते. त्याचा प्रत्यय या दिव्य लोकपालाने भ्रष्टाचारविरोधाचा किती उजेड पाडला ते पाहून इतरांसही आला असेल. अण्णांची आणि त्या सर्वच बोलघेवड्यांची मागणी अगदीच भुक्कड होती. सोनम यांच्या आताच्या मागणीचे तसे नाही.त्यांनी याआधीचे आंदोलन केले ते लडाख या प्रदेशास स्वतंत्र राज्याचा दर्जा दिला जावा यासाठी आणि आता ते उपोषण करत आहेत ते शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जावा यासाठी. ते होणे नाही. स्वत: विरोधात असताना सत्ताधाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे वारेमाप आरोप करणारे आणि बसता-उठता चौकशीची मागणी करणारे सत्तेत आले की बरोबर उलट वर्तन करतात याचा अनुभव राजकीय निरीक्षकांस तरी नवा नाही. वांगचुक यांचे राजकारणाचे निरीक्षण किती याचा अनुभव नाही. परंतु विरोधी पक्षात असतानाचा भाजप आणि सत्ताधारी भाजप यांतील आमूलाग्र बदल कळावयास वांगचुक यांनी उशीर केला हे तर स्पष्ट दिसते. राजकीय व्यवस्थेतील एकापेक्षा एक गाळीव रत्ने स्वहस्ते गळ्यात घालून घेणारा भाजप हा पक्ष पूर्वीइतकाच संवेदनशील असेल असे त्यांस वाटले असणार. ते होणारे नव्हते. झालेही नाही. त्यामुळे लडाखच्या आंदोलनासाठी १७० दिवसांचा तुरुंगवास भोगल्यावरही वांगचुक यांच्या हाती काही लागले नाही. उलट त्यांचीही गणना 'देशद्रोही' या गटात होऊ लागली. अलीकडच्या काळात या 'देशद्रोह्यां'ची संख्या भूमिती श्रेणीने वाढताना दिसते. त्याचे सारे श्रेय विद्यमान सत्ताधीशांचे. पण अन्य कोणा 'देशद्रोह्या'ने सरकारविरोधात उपोषण करण्याची हिंमत दाखवली नाही. ती वांगचुक यांनी दाखवली.

आता या उपोषणाने त्यांच्या जिवावर बेतते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली असली तरी सरकारच्या हृदयास पाझर फुटण्याची सुतराम शक्यता नाही. मनमोहन सिंग सरकारकडून एक धडा या सत्ताधीशांनी घेतलेला आहे. तो म्हणजे विरोधकांकडे पाहायचेसुद्धा नाही; मग त्यांची दखल घेणे राहिले दूर. त्यामुळेच सत्ताधारी पक्षातील एका साजिंद्यानेही वांगचुक यांच्या उपोषणावर ब्रदेखील काढलेला नाही. २०१८ मध्ये गंगेच्या स्वच्छतेच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेले ८७ वर्षांचे ज्येष्ठ पर्यावरणवादी प्रा. जी. डी अगरवाल १११ दिवसांच्या उपोषणानंतर निधन पावले तरी या सरकारला पाझर फुटला नव्हता, हा इतिहास काही फार जुना नाही. आज भले दिल्ली उच्च न्यायालयाने सोनम वांगचुक यांच्या उपोषणासंदर्भात काही निकाल दिला असेल. परंतु सरकारतर्फे त्याचे पालन होईलच असे नाही. उच्चच काय, अगदी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाकडेही दुर्लक्ष करण्याचे कसब सत्ताधाऱ्यांनी दाखवलेले आहे. ते या प्रसंगी कामी येणार नाही, असे मानणे चूकच.

सबब झाले तेवढे पुरे. सोनम वांगचुक यांनी या देशातील न्क्ररय बहुतांच्या नावे कानास खडा असे म्हणत उपोषण सोडावे. इतक्या कोडग्या समाजासाठी आपले जीवन संपवण्याचे काहीही कारण नाही. गीता ही शहाण्यांसमोर वाचायची असते आणि उपोषण हे उद्दामांसमोर करायचे नसते हा यातील धडा.



# चौकशांचा गलबला

**संपत थेटे**

लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनतेचे रखडलेले प्रश्न मार्गी लागत असल्याने राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले असते. यंदाच्या पावसाळी अधिवेशनात मात्र आमदार आणि मंत्र्यांची गैरहजेरी हा कळीचा मुद्दा ठरला आणि त्या जोडीला कथित भ्रष्टाचाराची प्रकरणेसुद्धा! तरी काही लोकप्रिय घोषणांमुळे शेतकरी आणि वंचित घटकांना तात्पुरता दिलासा मिळाला असणार.

आर्थिक अडचणीतील लाखो शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची तयारी सरकारने शेवटी दाखवली. प्रत्येक सदस्य व त्याच्या मतदारसंघाला काही ना काही मिळाल्याने उत्तर महाराष्ट्राच्याही पदरात फूल ना फुलाच्या पाकळीचे दान पडेलच. ते जेव्हा मिळायचे तेव्हा मिळेल. तूर्तास विकासकामे वा ठोस आश्वासनांऐवजी डझनभर चौकशाच पदरी पडल्या. एवढ्या मोठ्या संख्येने भ्रष्टाचाराची प्रकरणे आणि त्यावर चौकशांची घोषणा होण्याची ही पहिलीच वेळ असावी. अर्थात, अहवाल अद्याप समोर यायचे आहेत. परंतु, दुर्दैवाने आधीच बदनामीच्या फैरींनी घायाळ झालेल्या विभागाच्या उरल्यासुरल्या इभ्रतीची लक्तरेच वेशीवर टांगली गेली, हेही वास्तव.महात्मा जोतिबा फुले आणि पंतप्रधान जनआरोग्य योजनेतील कथित गैरकारभाराच्या आरोपांनी व्यवस्थेतील भ्रष्टाचाराची पोलखोल केली. आमदार राहुल आहेर यांनी लक्ष वेधून सरकारला आरसा दाखवला. दोन वर्षांत सोळा हजारांहून अधिक संशयास्पद फायलींची जंत्रीच त्यांनी मांडली. एकट्या नाशिक जिल्ह्यात पाच रुग्णालयांनी साडेनऊ हजार बोगस रुग्ण उभे केल्याचा संशय आहे. इतर जिल्ह्यांतही या भ्रष्टाचाराची पाळेमुळे पसरली असण्याच्या शक्यतेपोटी एसआयटीकडे 'ऑपरेशन'ची जबाबदारी सोपवली गेली. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये आठ हजार कोटी रुपये खर्चून उभारला जाणारा बहुचर्चित बाह्य वळण रस्तासुद्धा (रिंग रोड) काम सुरू होण्यापूर्वीच चौकशीच्या फेऱ्यात सापडला. अधिकृत घोषणेआधीच विशिष्ट लोकांनी प्रकल्पालगत जमिनी खरेदी करून रस्त्याचे अलाइनमेंट बदलल्याचे आरोप सुरुवातीलाच झाले; परंतु त्याकडे दुर्लक्ष केले गेले. मंत्री छगन भुजबळ आणि आमदार सुहास कांदे यांच्यातील वैर जुनेच.

परंतु, कांदेंनी या खेपेला अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या चार हजार कोटी रुपयांच्या निविदेत सहाशे कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप करून खळबळ उडवून दिली.

बोगस शालार्थ आयडी, म्हाडा सदनिका घोटाळा गैरव्यवहार, महापालिकेतील घरपट्टी गैरव्यवहार, डायोसेशन ट्रस्ट जमीन खरेदी आदी प्रकरणेही संसदीय पटलावर उपस्थित झाली. त्यानंतर डझनभरापेक्षा अधिक चौकशी समित्या सक्रिय झाल्या.

वास्तविक, काही गुंडाळायचे असेल किंवा अहवालच बाहेर येऊच द्यायचे नसतील तर अशा समित्या नेमल्या जातात असे सामान्यांनाही वाटते. तरीही काही चांगले अधिकारी तपास करीत असल्याने आशा टिकून आहेत. अहवाल जगजाहीर करण्याचा पायंडा ते पाडतील, अशी अपेक्षा. भोंदूबाबा अशोक खरात आणि त्याआधीच्या कथित मधुसापळ्यांनी (हनी ट्रॅप) नाशिकची प्रतिमा मलिन केली होतीच. आता भ्रष्टाचाराने कडी केली. अलीकडच्या काळातच हे सर्व का घडते आहे, हाही चिंतनाचा विषय. भ्रष्टाचाराचा बट्टा लागणे, सामान्यांच्या अडचणींपेक्षा लाचलबाडी, बेइमानीची अधिक चर्चा होणे मुळावरच उठणारे. भ्रष्टाचाराची ही कीड डोळ्यांदेखत अजस्त्र अजगर बनली तरी सारे सुस्तच. त्याची घट्ट मिठी काही केल्या सैल व्हायला तयार नाही. मुळात त्यासाठी कोणी काही प्रयत्न करीत आहेत का, हासुद्धा संशोधनाचा भाग. आपण स्वत:हून गपगुमान अजगराच्या जबड्यात जात आहोत, हे तर आणखी गंभीर.

# परीक्षा नव्हे, अग्निपरीक्षा

महाराष्ट्रात २०१३ साली टीईटी, म्हणजेच टीचर्स एलिजिबिलिटी टेस्ट अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा सुरू केली. डीएड किंवा बीएड पदवी मिळवून शिक्षकी पेशात जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही पात्रता परीक्षा सुरुवातीला घेतली जात होती. इतर स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर सुरुवातीच्या काळात ऑफलाइन व नंतर ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेतली गेली.

सुरुवातीपासूनच या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी तीन ते साडेतीन टक्के एवढीच राहिलेली आहे. बहुपर्यायी प्रश्न पद्धतीच्या या परीक्षेची एकूण काठिण्य पातळी आणि प्रश्नपत्रिकेचे तांत्रिक स्वरूप याबद्दल या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांकडून अनेकदा तक्रारीचाच सूर ऐकला आहे. शिक्षक होण्यासाठीच डीएड किंवा बीएड या प्रकारचे पदविका किंवा पदवी अभ्यासक्रम आखले गेलेले आहेत. ते यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची पुन्हा वेगळी पात्रता परीक्षा घेण्याची गरज भासणे म्हणजे शासनाने आपल्याच व्यवस्थेवर अविश्वास दाखवण्यासारखे आहे. ही परीक्षा घ्यायचीच असेल तर खरे तर ती कल चाचणी या स्वरूपाची असावी. इतर व्यावसायिक स्पर्धा परीक्षांसारखी केवळ वर्तुळे रंगवायला लावणारी परीक्षा एखादी व्यक्ती शिक्षक व्हायला योग्य आहे की नाही हे ठरवण्यास पुरेशी असू शकत नाही. या परीक्षेच्या अतिकाठिण्यपातळीमुळे विद्यार्थ्यांना पुन:पुन्हा या परीक्षेला बसावे लागते आणि त्यासाठीचे शुल्क भरावे लागते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील विद्यार्थ्यांना वारंवार हा खर्च परवडण्याजोगा नसतो.

एकीकडे प्रचंड बेरोजगारी आहे, शिक्षण क्षेत्रातील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी प्राप्त असलेले लाखो विद्यार्थी शिक्षकी पेशात येण्यासाठी उत्सुक आहेत, दुसरीकडे महाराष्ट्रात हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत, पण या दोहोंच्या मध्ये टीईटी परीक्षेचा प्रचंड मोठा अडथळा उभा करून ठेवला आहे.

त्यातच सर्वोच्च न्यायालयाने सर्व सेवारत शिक्षकांसाठीही टीईटी अनिवार्य केली. उत्तीर्ण होण्यासाठी अंतिम मुदत ऑगस्ट २०२८ ही निश्चित केली. सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा पुष्टी केली आहे की, शिक्षण हक्क कायदा (आरटीई), २००९ लागू होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसह, सर्व सेवारत शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य आहे.

सप्टेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर सध्या सेवेत असलेल्या शिक्षकांनाही टीईटी म्हणजेच टीचर्स एलिजिबिलिटी टेस्ट अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा द्यावी लागणार आहे, हे स्पष्ट झाले आहे. ज्या शिक्षकांना ही परीक्षा द्यावी लागणार आहे त्यातील अनेक शिक्षकांची वीस, पंचवीस वर्षे सेवा झालेली आहे. बहुसंख्य शिक्षक वयाची पंचेचाळीशी पार केलेले आहेत. त्यामुळे आता या टप्प्यावर आपण शिक्षक म्हणून काम करण्यास, विद्यार्थ्यांना शिकवण्यास पात्र आहोत, हे परीक्षा देऊन सिद्ध करण्याची वेळ बहुसंख्य अनुभवी शिक्षकांवर आलेली आहे.

हे अगदी शंभर टक्के मान्य आहे की, शिक्षकांनी, शिकवण्याच्या पेशामध्ये असलेल्या सर्वांनीच सतत स्वतःला अपडेट आणि अपग्रेड करत राहिले पाहिजे परंतु, अशा पद्धतीची बहुपर्यायी परीक्षा घेऊन शिक्षकांचे ज्ञान आणि कौशल्य तपासणे योग्य आहे का, याचाही विचार झाला पाहिजे. टीईटी परीक्षा एका अशा संस्थेमार्फत घेतली जाते जी संस्था बँकिंग क्षेत्रातील उमेदवार निवडण्यासाठी स्पर्धा परीक्षा घेते, असे कळते. शिक्षकी पेशा हा काही तांत्रिक पेशा नाही किंवा बँकिंगसारखा तो केवळ आकडेमोडीचा व्यवसाय नाही. शिक्षकांचा संबंध हा शिकण्यास उत्सुक असलेल्या, सतत नवनवीन कल्पनांच्या शोधात असलेल्या शारीरिक




आणि मानसिक वाढीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर असलेल्या विविध वयाच्या विद्यार्थ्यांशी असतो. शिक्षकांसमोर विद्यार्थ्यांची जिवंत ऊर्जा असते. दर पाच वर्षांनी एक पिढी बदलते. त्यामुळे शिक्षकांसमोर असणारी आव्हाने सतत बदलत असतात. वर्गात चाळीस मुले असतील तर ते प्रत्येक मूल वेगळं असतं. दरवेळी विद्यार्थ्यांना हाताळण्यासाठी शिक्षकांना लागणारी कौशल्ये बदलत असतात. ही कौशल्ये अशा प्रकारच्या तांत्रिक पद्धतीच्या परीक्षेमधून तपासणे कसे शक्य आहे?

खरेतर प्रगत होत जाणारे तंत्रज्ञान, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर विकसित होत असलेले शैक्षणिक प्रवाह, सतत बदलत असणारी सामाजिक, राजकीय, आर्थिक, पर्यावरणीय परिस्थिती या अनुषंगाने विद्यार्थ्यांना बदलत्या जीवनशैलीला आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी तयार करणे हे शिक्षकाचे काम असते. मोबाइल आणि इंटरनेटच्या या युगात विद्यार्थ्यांचे वर्तन, त्यांची बदललेली मानसिकता हाताळणे हे शिक्षकांसमोरचे मोठे आव्हान आहे.

सद्यस्थितीत या सर्व आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण शिक्षकांना मिळणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षकांना अशा पद्धतीने प्रशिक्षित करून ही कौशल्ये त्यांना आत्मसात झाली आहेत की नाही याची चाचणी घेणे आणि त्यासाठी त्यांना अधिक काही मार्गदर्शन, मदत हवी असेल तर ती पुरवणे ही शिक्षण विभागाची, शासनाची सहकार्याची, प्रगतिशील भूमिका असली पाहिजे. टीईटी सारखी तांत्रिक चाचणी घेणेच मुळात अयोग्य आहे. या चाचणीच्या निकालातील उत्तीर्णतेची टक्केवारी इतकी कमी असते की ही परीक्षा जाणूनबुजून शिक्षकी व्यवसायाचे प्रशिक्षण घेऊन त्यात यशस्वी झलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षकी पेशात येण्यास रोखणारी आणि विद्यमान शिक्षकांना सेवेबाहेर काढण्यासाठी आहे की काय, अशी शंका यावी.

खरे तर शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याचे कौशल्य ,समोरच्या विद्यार्थ्यांची ग्रहण क्षमता लक्षात घेऊन त्याप्रमाणे अध्ययन पद्धती वापरण्याचे कौशल्य हे अशा लेखी परीक्षेमधून मोजता येणे शक्य नाही.



# फ्लॉप डेब्यूपासून ब्लॉकबस्टर क्वीनपर्यंत

बॉलीवूड मधील आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असलेल्या कतरिना कैफचा आज ४३ वा वाढदिवस आहे. आपल्या सौंदर्य, मेहनत आणि दमदार अभिनयाच्या जोरावर तिने हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली. सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींचा सामना करूनही कतरिनाने कधी हार मानली नाही. त्यामुळेच आज ती बॉलीवूडमधील सर्वाधिक यशस्वी आणि लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. १६ जुलै १९८३ रोजी हाँगकाँगमध्ये कतरिनाचा जन्म झाला. तिचे मूळ नाव 'कतरिना टॉर्कोटी' असल्याचे सांगितले जाते. तिचे वडील मोहम्मद कैफ आणि आई सुझान आहेत. सात भावंडांमध्ये कतरिना चौथ्या क्रमांकावर आहे. लहान वयातच तिने मॉडेलिंगच्या क्षेत्रात पाऊल ठेवले. अनेक फॅशन शो आणि जाहिरातींमध्ये काम करत असताना तिच्याकडे चित्रपटसृष्टीचे दरवाजे उघडले. कतरिनाने २००३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बूम' या चित्रपटातून बॉलीवूडमध्ये पदार्पण केले. या चित्रपटात तिला महानायक अमिताभ बच्चन आणि गुलशन ग्रोव्हर यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाली. मात्र हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. चित्रपटातील बोल्ड आशय आणि कतरिनाच्या ग्लॅमरस लूकची चर्चा झाली, पण तिच्या करिअरला अपेक्षित सुरुवात मिळाली नाही.

पहिल्याच चित्रपटाच्या अपयशामुळे अनेक जण मागे हटले असते, पण कतरिनाने तसे केले नाही. तिने सातत्याने स्वतःवर मेहनत घेतली. हिंदी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. अभिनय कौशल्य सुधारले आणि प्रत्येक संधीचा सकारात्मक वापर केला. 'बूम'नंतर तिने तेलुगू चित्रपट 'मल्लीस्वरी'मध्ये काम केले. हा चित्रपट यशस्वी ठरला आणि कतरिनाच्या आत्मविश्वासात भर पडली. त्यानंतर दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी 'सरकार' चित्रपटात तिला छोटी पण महत्त्वाची भूमिका दिली. या भूमिकेमुळेही तिच्या कामाची दखल घेतली गेली. मात्र कतरिनाच्या आयुष्यातील खरा टर्निंग पॉइंट ठरला तो सलमान खानसोबतचा 'मैंने प्यार क्यों किया' हा चित्रपट. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगले यश मिळवले आणि कतरिनाच्या करिअरला नवी दिशा मिळाली. त्यानंतर तिला मोठ्या बॅनरचे आणि मोठ्या कलाकारांसोबतचे चित्रपट मिळू लागले.

यानंतर कतरिनाने मागे वळून पाहिलेच नाही. 'नमस्ते लंडन', 'वेलकम', 'पार्टनर', 'सिंह इज किंग', 'अजब प्रेम की गजब कहानी', 'राजनीती', 'जिंदगी ना मिलेगी दोबारा', 'जब तक है जान', 'धूम ३', 'टायगर', 'टायगर जिंदा है', 'भारत' आणि 'फँटम' यांसारख्या अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये तिने दमदार भूमिका साकारल्या. रोमँटिक, कॉमेडी, ॲक्शन आणि गंभीर अशा विविध प्रकारच्या भूमिका तिने यशस्वीपणे साकारत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. कतरिनाची स्क्रीनवरील उपस्थिती, नृत्यकौशल्य आणि मेहनती स्वभावामुळे ती प्रेक्षकांची आवडती अभिनेत्री बनली. सुरुवातीला 'आऊटसाइडर' असल्याने आणि हिंदी नीट येत नसल्याने तिच्यावर टीका झाली होती. मात्र तिने त्या टीकेला उत्तर शब्दांनी नाही, तर आपल्या कामगिरीने दिले. आज कतरिना कैफ केवळ यशस्वी अभिनेत्री नाही, तर अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान आहे. अपयशानं तरही खचून न जाता सातत्याने मेहनत केली तर यश नक्की मिळते, हे तिने आपल्या प्रवासातून सिद्ध करून दाखवले.

# समय रैनाला ठोठावला ३ लाख रुपयांचा दंड





सर्वोच्च न्यायालयाने प्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडियन समय रैना यांना त्यांच्या 'इंडियाज गॉट लेटंट' या शोशी संबंधित एका जुन्या प्रकरणावरून कडक शब्दांत फटकारले आहे.समय रैना आणि रणवीर अल्लाहबादिया यांचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात सुरू आहे. त्यांच्या प्रकरणावरमंगळवारी सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या आदेशाचे पालन न केल्याबद्दल समय रैना यांच्यावर प्रत्येकी ३ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ही रक्कम जमा न केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही न्यायालयाने दिला.याव्यतिरिक्त, या प्रकरणात पॉडकास्टर रणवीर अलाहाबादिया आणि युट्युबर आशिष चंचलानी यांच्यावरही दंड ठोठावण्यात आला आहे.

दोघांना फटकारताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, 'हे स्वतःला 'युथ आयकॉन' म्हणवून घेतात. ते नेमके कोणत्या प्रकारचे युथ आयकॉन आहेत, हे मला माहीत नाही. याचा विचार करूनच मला चिंता वाटते. आम्हाला असे वाटते की कॉमेडियन समय रैनाने न्यायालयाची दिशाभूल केली असून आमच्या आदेशांचे उघडपणे उल्लंघन केले आहे.' सुनावणीदरम्यान न्यायालयाने नमूद केले की, समय रैना यांनी यापूर्वी दिलेल्या निर्देशांचे पालन केले नाही. खंडपीठासमोर आश्वासन दिल्यानंतरही त्यांचे पुढील वर्तन नोंदवलेल्या हमींशी सुसंगत नव्हते, असे न्यायालयाने निरीक्षण नोंदवले. वरिष्ठ वकील अपराजिता सिंह यांनी सांगितले की, समय रैना कार्यक्रम करत आहेत; मात्र न्यायालयाच्या आदेशानंतरही त्यांनी एसएमए फाउंडेशन किंवा पीडित व्यक्तींशी संपर्क साधलेला नाही.

न्यायालयाने म्हटले, 'सार्वजनिक जीवनात तुम्ही इतरांचा जितका आदर करता, तितकाच आदर तुम्हालाही मिळतो. आम्ही त्यांना वारंवार सवलत दिली. आम्हाला वाटले होते की तुम्ही सुसंस्कृत आणि प्रतिष्ठित कुटुंबातील तरुण आहात. पण लोकांना कमी लेखणे आणि त्यांची खिल्ली उडवणे हा तुमच्यासाठी जणू फॅशनच बनला आहे.' कॉमेडियनच्या वकिलांनी स्पष्ट केले की, एसएमए फाउंडेशनशी संपर्क न करण्यामागे अहंकार कारणीभूत नव्हता. 'न्यायालयाचे अधिकारी म्हणून आम्ही आमच्या क्लायंटला समजावून सांगण्याचा प्रयत्न करू,' असे त्यांनी सांगितले.

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने 'इंडियाज गॉट लेटेंट' या कार्यक्रमाचे होस्ट समय रैना आणि त्यांच्या सहकारी कॉमेडियनना अपंगत्व तसेच दुर्मिळ आनुवंशिक आजारांनी ग्रस्त व्यक्तींची खिल्ली उडवल्याबद्दल बिनशर्त माफी मागण्याचे निर्देश दिले होते.यानंतर त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली होती. या प्रकरणात त्यांच्या व्यतिरिक्त आणखी चार जणांची नावेही समाविष्ट होती. न्यायालयाने समय रैनाला निर्देश दिले होते की त्यांनी आपल्या कार्यक्रमांमध्ये दिव्यांग व्यक्तींना आमंत्रित करावे. तसेच समय रैना आणि इतर संबंधितांना निर्देश देताना न्यायालयाने सांगितले होते की, दिव्यांगांच्या उपचारांसाठी स्थापन करण्यात आलेल्या निधीला मदत करण्याच्या उद्देशाने त्यांनी दर महिन्याला किमान दोन कार्यक्रम आयोजित करावेत.

# लॉकअप - २मध्ये चाललंय काय...



'लॉक अप २'मध्ये अभिनेत्री शिल्पा शिंदेच्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. शोदरम्यान शिल्पा शिंदे आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर श्रेया कालरा यांनी अभिनेत्री शिवांगी जोशी आणि अभिनेता हर्षद चोप्रा यांच्याविषयी बोलताना केलेल्या टिप्पणीवर सोशल मीडियावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

शोमध्ये शिवांगी जोशी आणि हर्षद चोप्रा एकमेकांशी संवाद साधत असताना, शिल्पा आणि श्रेया यांनी त्यांची नक्कल करत विनोदी शैलीत काही संवाद सादर केले. या वेळी शिल्पाने शिवांगीच्या वैयक्तिक आयुष्याचा आणि तिच्या व्हर्जिनिटीचा संदर्भ देणारी टिप्पणी केली. त्यानंतर श्रेया कालरानेही हर्षदची नक्कल करत या संवादात सहभाग घेतला.या प्रसंगादरम्यान शिवांगी जोशीने कोणतीही प्रतिक्रिया न देता शांत राहणे पसंत केले.

# स्वतःलाच लाखांचे बर्थडे गिफ्ट



मराठी टेलिव्हिजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री तेजश्री प्रधान हिने चाहत्यांसोबत एक आनंदाची बातमी शेअर केली आहे. उत्कृष्ट अभिनयामुळे घराघरात पोहोचलेल्या तेजश्रीने स्वतःसाठी नवी आलिशान मर्सिडीज कार खरेदी केली आहे. विशेष म्हणजे, गाडी खरेदी करून जवळपास महिना उलटल्यानंतर तिने सोशल मीडिया पोस्टद्वारे ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली.

# जेनिफर विंगेट पुन्हा अडकणार विवाहबंधनात?



टीव्ही विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री जेनिफर विंगेट पुन्हा एकदा तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. सोशल मीडिया आणि विविध मीडिया रिपोर्ट्सनुसार, जेनिफर १६ जुलै २०२६ रोजी दुसरे लग्न करू शकते, अशी जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र, या वृत्ताला अद्याप अभिनेत्री किंवा तिच्या टीमकडून कोणतीही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे या बातमीकडे सध्या केवळ चर्चेच्या स्वरूपातच पाहिले जात आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, जेनिफर युनायटेड किंगडममध्ये अत्यंत खासगी पद्धतीने 'व्हाईट वेडिंग' करण्याच्या तयारीत आहे. या समारंभाला फक्त कुटुंबातील सदस्य आणि काही मोजके जवळचे मित्र उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. लग्न समारंभ पूर्णपणे खासगी ठेवण्याचा निर्णय घेतल्याचीही चर्चा आहे.

रिपोर्ट्समध्ये असा दावा करण्यात आला आहे की, जेनिफर सिंगापूरमधील उद्योगपती विल्यम इस्माईल यांच्याशी विवाहबंधनात अडकणार आहे. विल्यम हे प्रसिद्धीपासून दूर राहणारे व्यक्तिमत्त्व असल्याचे सांगितले जाते. गेल्या काही काळापासून दोघे एकमेकांना डेट करत होते आणि त्यानंतर त्यांनी लग्नाचा निर्णय घेतल्याचा दावा केला जात आहे. मात्र, या नात्याबाबतही कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

असेही म्हटले जात आहे की, परदेशातील एका सहलीदरम्यान विल्यम यांनी जेनिफरला लग्नासाठी प्रपोज केले होते आणि तिने त्यांचा प्रस्ताव स्वीकारला. यानंतर दोघांनी लग्नाची तयारी सुरू केल्याची चर्चा आहे. काही रिपोर्ट्सनुसार, जेनिफर या खास दिवशी एका प्रसिद्ध ब्रायडल ब्रँडचा पांढरा वेडिंग गाऊन परिधान करणार आहे. मात्र, या सर्व माहितीची अधिकृत पुष्टी झालेली नाही.

याशिवाय, अभिनेत्रीच्या जवळच्या मैत्रिणी जेनेलिया देशमुख आणि हरलीन सेठी यांनाही या खास समारंभाचे निमंत्रण देण्यात आल्याची चर्चा आहे. पण या दाव्यालाही कोणताही अधिकृत आधार मिळालेला नाही.

जेनिफर विंगेटच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल यापूर्वीही मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली होती. तिने ९ एप्रिल २०१२ रोजी अभिनेता करण सिंह ग्रोवर याच्यासोबत विवाह केला होता. मात्र, दोघांचे वैवाहिक आयुष्य फार काळ टिकले नाही. अवघ्या दोन वर्षांतच त्यांच्यात मतभेद झाले आणि २०१४ मध्ये दोघांचा घटस्फोट झाला. त्यानंतर जेनिफरने आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित केले आणि अनेक लोकप्रिय मालिकांमधून प्रेक्षकांची मने जिंकली.

दुसऱ्या लग्नाच्या चर्चांमुळे सोशल मीडियावर जेनिफरचे चाहते उत्सुक झाले आहेत. अनेकजण तिला आगाऊ शुभेच्छाही देत आहेत. मात्र, अभिनेत्रीने स्वतः याबाबत कोणतेही वक्तव्य केलेले नसल्याने या चर्चांवर अधिकृत शिक्कामोर्तब झालेले नाही.

त्यामुळे जेनिफर विंगेटच्या दुसऱ्या लग्नाबाबत सध्या सोशल मीडिया आणि मीडिया रिपोर्ट्समध्ये अनेक दावे केले जात असले, तरी अभिनेत्री किंवा तिच्या टीमकडून अधिकृत घोषणा होईपर्यंत या वृत्ताकडे केवळ अफवा किंवा अपुष्ट माहिती म्हणूनच पाहणे योग्य ठरेल.

चाहते आता तिच्या अधिकृत प्रतिक्रियेची प्रतीक्षा करत आहेत.

# 'वो मेरा बहोत अच्छा दोस्त है...'






अभिनेत्री शहनाज गिल आणि अभिनेता-डान्सर राघव जुयाल यांच्या नात्याबाबत गेल्या काही वर्षांपासून चर्चा सुरू आहेत. २०२३ मध्ये 'किसी का भाई किसी की जान' चित्रपटात एकत्र काम केल्यानंतर दोघे ही एकत्र असल्याची चर्चांना सुरुवात झाली होती. अलीकडेच राघवच्या वाढदिवसाच्या पार्टीतील एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर या चर्चांना पुन्हा उधाण आले.

या पार्श्वभूमीवर, माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत शहनाज गिलने प्रथमच राघवबाबत भाष्य केले आहे. एका चाहत्याच्या प्रश्नाला उत्तर देताना तिने राघवला 'माझा खूप चांगला मित्र' असे संबोधले. शहनाज म्हणाली, 'माझ्या मित्राचा चित्रपट येत आहे. कृपया त्याला पाठिंबा द्या. तो माझा खूप चांगला मित्र आहे आणि त्याचा चित्रपट यशस्वी होणं खूप महत्त्वाचं आहे.'

यावेळी तिने राघवच्या संघर्षाचाही उल्लेख केला. 'तो इंडस्ट्रीतील घराण्यातून आलेला नाही. त्याने स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर हे स्थान मिळवलं आहे. त्यामुळे त्याच्या पहिल्या मुख्य भूमिकेच्या चित्रपटाला प्रेक्षकांनी नक्की पाठिंबा द्यावा,' असे आवाहनही शहनाजने केले.

शहनाजच्या या वक्तव्यानंतर दोघांच्या नात्याविषयी सुरू असलेल्या चर्चांना पुन्हा वेग आला असला, तरी तिने राघवला केवळ 'चांगला मित्र' असेच संबोधले असून डेटिंगच्या चर्चांबाबत कोणतीही पुष्टी केलेली नाही. दरम्यान, शहनाज गिल सध्या तिच्या आगामी पंजाबी चित्रपट 'इश्कनामा'च्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. जय रंधावा प्रमुख भूमिकेत असलेला हा चित्रपट २४ जुलै २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे.

# आदिनाथ कोठारे - उर्मिला कानेटकरचा घटस्फोट



लोकप्रिय मराठी अभिनेता आदिनाथ कोठारे व अभिनेत्री उर्मिला कानेटकर यांच्या वैवाहिक आयुष्यात वादळ आल्याच्या चर्चा गेल्या काही वर्षांपासून सोशल मीडियावर सुरू होत्या.

मात्र, इतके दिवस आदिनाथ अथवा उर्मिला या दोघांपैकी कोणीही यावर भाष्य केलं नव्हतं.

या सगळ्या चर्चा खऱ्या ठरल्या असून, अखेर आज इन्स्टाग्रामवर संयुक्तरित्या पोस्ट शेअर करत आदिनाथ-उर्मिलाने विभक्त होणार असल्याचा निर्णय जाहीर केला आहे.

तसेच या कठीण काळात सर्वांनी प्रायव्हसची आदर करावा असंही त्यांनी म्हटलं आहे.

घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला असला, तरीही लेक जिजाचं संगोपण ते एकत्र, पूर्ण जबाबदारीने करणार आहेत.

गेल्या काही दिवसांपासून उर्मिला ही कोठारे कुटुंबातून विभक्त राहत असल्याची चर्चा सुरू होती. याशिवाय ती आदिनाथच्या 'पाणी' सिनेमाच्या प्रीमियरला सुद्धा गैरहजर होती.

त्यामुळे या दोघांच्या वैवाहिक जीवनाबद्दल बऱ्याच चर्चा सुरू होत्या.

२० डिसेंबर २०११ रोजी ही जोडी विवाहबद्ध झाली होती आणि आता लग्नानंतर १५ वर्षांनी आदिनाथ-उर्मिलाने विभक्त होणार असल्याचं जाहीर केलं आहे. या दोघांच्या मुलीचं नाव जिजा असून, ती आता ८ वर्षांची आहे.

**चुकीचा आहार आणि चुकीची जीवनशैलीचा परिणाम आता फक्त वयस्कर लोकांपर्यंत मर्यादीत राहिलेला नाही तर लहान मुले आणि वयस्कर लोकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम होत आहे. कमी वयात मुलांचे लठ्ठपणा, प्रीडायबिटीज आणि टाईप- २ डायबिटीज सारख्या समस्या वेगात वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये फिट राहण्यासाठी आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी लोक वेगवेगळे शार्टकट स्विकारतात ज्यापैकी एक आहे दोरीवर उड्या मारणे.**

# रोज दोरीच्या उड्या मारल्याने वजन वाढते की...

चुकीचा आहार आणि चुकीची जीवनशैलीचा परिणाम आता फक्त वयस्कर लोकांपर्यंत मर्यादीत राहिलेला नाही तर लहान मुले आणि वयस्कर लोकांच्या आरोग्यावरही याचा परिणाम होत आहे. कमी वयात मुलांचे लठ्ठपणा, प्रीडायबिटीज आणि टाईप-२ डायबिटीज सारख्या समस्या वेगात वाढत आहे. अशा परिस्थितीमध्ये फिट राहण्यासाठी आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी लोक वेगवेगळे शार्टकट स्विकारतात ज्यापैकी एक आहे दोरीवर उड्या मारणे. आजकाल सोशल मीडियावर दोरीवर उड्या मारतानाचे व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे ज्यामध्ये असा दावा केला जातो की, रोज दोरीवर उड्या मारल्याने वजन कमी होते व वजन वाढते. त्याचबरोबर शरीर देखील तंदरुरस्त राहते. पण या दाव्याला कोणताही वैज्ञानिक आधार आहे की ही चुकीची माहिती आहे जे आधी जाणून घेऊ या.

होमियोपेथिक तज्ज्ञ डॉ. मनदीप दहिया यांच्या मते दोरीवर उड्या मारणे हा एक उत्तम कार्डिया व्यायाम आहे जो फक्त वजन कमी करणे किंवा उंची वाढण्यापुरते मर्यादीत नाही तर पूर्ण शरीराला सक्रिय ठेवणारी आणि एक प्रभावी कार्डीओ व्यायाम आहे. नियमितपणे दोरीवर उड्या मारल्यास हृदय, फुफ्फुस, स्नायू आणि शरीराची कार्यक्षमता सुधारू शकते. मात्र, व्हिडिओमध्ये केलेल्या काही दाव्यांना मर्यादित वैज्ञानिक आधार आहे. रोज १०० वेळा दोरीवरच्या उज्या मारल्याने शरीरावर काय परिणात होतो ? कोणत्या फायद्यांमागे वैज्ञानिक आधारआहे आणि कोणत्या दाव्यांबाबत सावधगिरी बाळगली पाहिजे ते जाणून घ्या.

लसीका संस्था सक्रिय राहते.

रोज जर तुम्ही दोरीवर उड्या मारल्या तर तुमची लसीका संस्था सक्रिय राहते. ही प्रणाली शरीरातून अतिरिक्त द्रव, टाकाऊ पदार्थ आणि संसर्गाशी लढणाऱ्या पेशी वाहून नेण्याची भूमिका बजावते. हे शास्त्रीयदृष्ट्या खरे आहे की शारीरिक हालचाल आणि स्नायूंच्या हालचालींमुळे लसिका प्रवाह सुधारण्यास मदत होते, परंतु दोरी उड्या मारल्याने शरीरातील सर्व जंतुसंसर्ग नाहीसे होतात असे म्हणणे खरे ठरणार नाही.

जर्नल ऑफ अप्लाइड फिजियोलॉजी आणि हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या शोधानुसार, जेव्हा आपण दोरीच्या उड्या मारणे शरीरात वर आणि खाली हालचाल होते. ही गती लसिका वाहिन्या झटपट उघडण्यास व बंद करण्यास मदत करते. ज्यामुळे शरीरातील विषारी आणि संसर्गाशी लढणाऱ्या पांढऱ्या पेशी संपूर्ण शरीरात वेगात पसरतात.पण हे सर्व संसर्गावर उपचार करत नाही, तर ही तुमची अंतर्गत सुरक्षा प्रणाली सक्रिय करते.

माहिती नुसार, दोरीवर उड्या मारणे सर्वात कार्यक्षम उर्जा खर्च करणारा व्यायाम आहे. दोरीवर उड्या मारणे ही उच्च-तीव्रतेचा कार्डिओ व्यायाम आहे ज्यामुळे झटपट उर्जा वापरली जाते. जर तुम्ही संतुलित आहार आणि नियमित व्यायाम करत असाल तर वजन कमी करणे आणि



शरीराचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. हे चयापचय सुधारते. तसेच स्टॅमिना सुधारण्यास देखील मदत करते.

**दोरीवर उड्या मारल्याने वाढू शकते मुलांची उंची**

दोरीवर उड्या मारल्याने थॉयराईड आणि पिट्यूटरी ग्लँड अधिक चांगल्या पद्धतीने कार्य करते ज्यामुळे उंची वाढू शकते. पण वैद्यकीय विज्ञानानुसार, व्यक्तीची उंची विशेषत: आनुवांशिकता आणि ग्रोथ प्लेट्सवर अवलंबून असते. ग्रोथ प्लेट्स बंद झाल्यानंतर केवळ दोरी उड्या मारल्याने उंची वाढत नाही.

मानसिक आरोग्य आणि ऊर्जा पातळीवर होणारा परिणाम

नियमित दोरी उड्या मारल्याने शरीरात एंडोर्फिनसारखे 'फील-गुड' हार्मोन्स सोडले जातात, ज्यामुळे तणाव कमी होऊन मनःस्थिती सुधारते. यामुळे एकाग्रता वाढण्यास, थकवा कमी होण्यास आणि मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत होऊ शकते. पण, वैद्यकीय शास्त्रानुसार दोरी उड्या मारणे हे नैराश्य किंवा इतर मानसिक आजारांवर रामबाण उपाय नाही.

**हार्मोनल आरोग्यावर परिणाम होतो**

अमेरिकन जर्नल ऑफ सायकियाट्री आणि जागतिक पीसीओएस मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दोरी उडीसारख्या उच्च-तीव्रतेच्या व्यायामामुळे शरीरातील इन्सुलिन प्रतिरोध कमी होतो. इन्सुलिनची पातळी सुधारल्याने पीसीओएस, पीसीओडी आणि हार्मोनल असंतुलनाची लक्षणे व्यवस्थापित करण्यास मदत होते. दोरी उडीमुळे थायरॉईडसह हार्मोनल असंतुलनासारख्या समस्या सुधारू शकतात. वैज्ञानिक दृष्ट्या, नियमित व्यायामामुळे हार्मोनल आरोग्य सुधारण्यास आणि पीसीओएसमध्ये वजन नियंत्रित ठेवण्यास मदत होते. जरी दोरी उडी हा या आजारांवरचा इलाज नसला तरी, अशा परिस्थितीत डॉक्टरांचा सल्ला आणि योग्य उपचार आवश्यक आहेत. यामुळे रोगप्रतिकारशक्ती मजबूत होण्यास मदत होते. नियमितपणे दोरी उड्या मारल्याने रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. जर तुम्ही दररोज दोरी उड्या मारल्या, तर रक्ताभिसरण वाढते आणि शरीर सक्रिय राहते. परंतु, यामुळे कर्करोग, दमा यांसारखे सर्व प्रकारचे संसर्ग बरे होतात, हा दावा वैज्ञानिकदृष्ट्या योग्य नाही.

**दोरी उड्या मारण्याची योग्य पद्धत**

डॉ. मनदीप यांच्या मते, दोरी उड्या सकाळी किंवा संध्याकाळी जेवणापूर्वी सुमारे तीन तास आधी सुरू करता येतात. सुरुवातीला १०-२० उड्या मारा आणि हळूहळू संख्या वाढवा. व्यायामापूर्वी पुरेसे पाणी पिणे महत्त्वाचे आहे.

**कोणती खबरदारी घ्यावी?**

जर एखाद्या व्यक्तीला हृदयरोग, उच्च रक्तदाब, सांध्यांच्या गंभीर समस्या यांसारख्या इतर आरोग्य समस्या असतील, तर त्यांनी दोरी उड्या सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. ज्या लोकांना गंभीर हृदयरोग, हृदयाच्या झडपांच्या समस्या, गुडघे किंवा घोट्यांमध्ये तीव्र वेदना, ऑस्टिओपोरोसिस इत्यादी समस्या आहेत, त्यांनी वैद्यकीय सल्ल्याशिवाय दोरी उड्या सुरू करू नयेत.



# पावसाळ्यात 'व्हायरल कॉकटेल' चा धोका

पावसाळ्याच्या वातावरणात कोविड-१९, h1N1 आणि इन्फ्लूएंझा 'S' हे तिन्ही विषाणू एकाच वेळी सक्रिय झाल्यामुळे आरोग्य यंत्रणेसमोर आव्हान निर्माण झाले आहे. मुंबईसह अनेक शहरांमध्ये या आजारांच्या रुग्णांमध्ये वाढ दिसून येत असून, डॉक्टरांनी नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

तज्ज्ञांच्या मते, यंदाच्या पावसाळ्यात एक नव्हे, तर तीन विषाणूंचा धोका एकत्र उद्भवला आहे. पावसाळ्यात नागरिक बंदिस्त ठिकाणी अधिक वेळ घालवत असल्याने, हवेद्वारे आणि थेंबांद्वारे या विषाणूंचा प्रसार वेगाने होत आहे. या परिस्थितीला तज्ज्ञांनी 'व्हायरल कॉकटेल' असे संबोधले आहे.

प्रमुख लक्षणे-या तिन्ही आजारांची लक्षणे जवळपास सारखीच असल्याने नेमका कोणता संसर्ग झाला आहे, हे ओळखणे कठीण होत आहे. खालील लक्षणे आढळल्यास सावध राहणे गरजेचे आहे:

ताप आणि सतत खोकला,घसा दुखणे किंवा खवखवणे, अंगदुखी आणि तीव्र डोकेदुखी, अशक्तपणा श्वास घेण्यास त्रास होणे, काही रुग्णांमध्ये अतिसार,

कुणाला आहे सर्वाधिक धोका?

६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक. मधुमेह, हृदय, फुफ्फुस, मूत्रपिंड किंवा यकृताचे आजार असलेले रुग्ण. कर्करोगग्रस्त रुग्ण किंवा अवयव प्रत्यारोपण झालेले व्यक्ती. प्रतिकारशक्ती कमी करणारी औषधे घेणारे रुग्ण.

डॉक्टरांचा सल्ला आणि खबरदारी

तज्ज्ञ डॉक्टरांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत: १. स्वतःहून औषधोपचार टाळा: विषाणूजन्य संसर्गावर अँटीबायोटिक्सचा काहीही उपयोग होत नाही. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कोणतीही अँटीबायोटिक्स घेऊ नका, कारण त्याचा शरीरावर उलट परिणाम होऊ शकतो. २. वेळेवर तपासणी: लक्षणे ४८ तासांपेक्षा जास्त काळ टिकून असल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा आणि गरज पडल्यास प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावी. ३. साध्या सवयी, मोठा बचाव: गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करा, वारंवार हात धुवा, बंद खोल्यांमध्ये पुरेशी खेळती हवा ठेवा आणि लसीकरण पूर्ण करा. ४. विश्रांती: आजारी असताना कामावर न जाता घरीच विश्रांती घ्या, जेणेकरून संसर्गाची साखळी खंडित होईल.तज्ज्ञांच्या मते, वेळेत निदान आणि योग्य उपचार घेतल्यास या संसर्गाचा धोका सहजपणे टाळता येऊ शकतो, त्यामुळे घाबरून न जाता जागरूक राहणे हाच सर्वोत्तम मार्ग आहे.

# चपाती मऊ होण्यासाठी

पीठ मळताना त्यात पाण्याचा वापर न करता कोमट दुधाचा वापर करा. तसेच चपात्या बनवण्यापूर्वी पिठात थोडे कोमट पाणी किंवा १ चमचा तेल घालून मळून १०-१५ मिनिटे झाकून ठेवा. चपात्या खूप मऊ होतात आणि जास्त वेळ ताज्या राहतात. कणिक मळल्यानंतर ती लगेच लाटू नका. ती १५-२० मिनिटे ओल्या कपड्याने झाकून ठेवा, जेणेकरून पीठ छान मुरेल आणि चपात्या वातड होणार नाहीत. लाटताना कोरड्या पिठाचा वापर कमीत कमी करा.



# उंदरांचा वाढता त्रास

घरात उंदीर दिसणे ही केवळ त्रासदायक बाब नाही, तर ते अन्नपदार्थांचे नुकसान करतात, घाण पसरवतात आणि विविध आजारांचाही धोका वाढवतात. अनेकजण उंदरांना मारण्यासाठी विषाचा वापर करतात. मात्र त्यामुळे लहान मुले आणि पाळीव प्राण्यांनाही धोका निर्माण होऊ शकतो. अशावेळी काही सोपे आणि सुरक्षित घरगुती उपाय करूनही उंदरांचा बंदोबस्त करता येतो. सर्वप्रथम घरात उंदीर कोणत्या मार्गाने येतात हे शोधा. दाराखालची फट, भिंतीतील भेगा, पाइपभोवती असलेली मोकळी जागा किंवा तुटलेल्या जाळ्या या उंदरांच्या प्रवेशासाठी सोप्या वाटा असतात. या जागा धातूची जाळी किंवा मजबूत साहित्य वापरून बंद करा. स्वयंपाकघरात अन्न उघडे ठेवू नका. धान्य, पीठ, डाळी यांसारखे पदार्थ हवाबंद डब्यांमध्ये ठेवा. रात्री सिंकमध्ये घाणेरडी भांडी ठेवू नका. पाळीव प्राण्यांचे उरलेले अन्नही रात्रभर बाहेर ठेवणे टाळा. घराबाहेरचा कचरा, लाकडांचे ढीग किंवा अडगळ नियमित साफ करा.



विष न वापरता उंदीर पकडण्यासाठी ट्रॅप हा उत्तम पर्याय आहे. उंदरांची वर्दळ असलेल्या ठिकाणी ट्रॅप ठेवा. त्यामध्ये शेंगदाणा बटर, सुका मेवा किंवा सुगंधी खाद्यपदार्थ ठेवल्यास उंदीर लवकर आकर्षित होतात. एकापेक्षा अधिक ट्रॅप वापरल्यास यशाची शक्यता वाढते. उंदरांना ओलसर जागा आवडतात. त्यामुळे घरात कुठे पाइप किंवा नळ गळत असेल तर तो तातडीने दुरुस्त करा. घर कोरडे आणि स्वच्छ ठेवल्यास उंदरांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.

# आल्याचा छोटा तुकडा साथीदार

भारतीय आहारात आल्याचा वापर शतका नुशतके केला जात आहे. स्वयंपाकातील मसाल्यांपासून ते पारंपरिक घरगुती उपायांपर्यंत आले महत्त्वाची भूमिका बजावते. चहा, आमटी, भाजी, कढी, सूप आणि विविध मसालेदार पदार्थांमध्ये आले घातल्याने त्या त्या पदार्थाची चव आणि सुगंध वाढतो. अनेक घरांमध्ये सर्दी, खोकला किंवा घसा खवखवणे यांसारख्या किरकोळ त्रासांमध्येही आल्याचा वापर केला जातो. त्यातील नैसर्गिक जैवसक्रिय घटकांमुळे आले हे संतुलित आहाराचा एक उपयुक्त भाग मानले जाते. त्यामुळे भारतीय स्वयंपाकघरात आले हा केवळ मसाला नसून, तो दैनंदिन आहाराचा अविभाज्य घटक बनला आहे.



आले भारतीय आहारात विविध पद्धतीने खाल्लं जातं. अनेक जण चहा, काढा, सूप, आमटी, भाजी, चटणी आणि लोणच्यामध्ये आल्याचा वापर करतात. काही जण सकाळी कोमट पाण्यासोबत किसलेले आले किंवा आल्याचा छोटा तुकडा खातात; तर काही जण आल्याचा रस किंवा आले घालून तयार केलेली हर्बल पेये पितात. स्वयंपाकातील मसाला म्हणून तसेच विविध पाककृतींमध्ये चव आणि सुगंध वाढवण्यासाठी आल्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. त्यामुळे आल्याला भारतीय स्वयंपाकघरातील बहुपयोगी आणि लोकप्रिय घटक मानले जाते.

**भूकवाढीसाठी फायदेशीर**

आल्यामध्ये भूक वाढवण्याचे गुणधर्म असतात, ज्यामुळे भूक वाढण्यास आणि पचन सुधारण्यास मदत होते. त्याचे सेवन केल्याने पचनसंस्थेतील पाचक रसांचे कार्य सक्रिय होते आणि परिणामतः अन्नाचे पचन अधिक प्रभावीपणे आणि चांगल्या प्रकारे होते. त्यामुळे जेवणानंतर जडपणा किंवा आळस जाणवत नाही. आले विशेषतः तणाव किंवा कमकुवत पचनशक्तीमुळे भूक मंदावलेल्या व्यक्तींसाठी फायदेशीर ठरते.

**पचनावर फायदेशीर**

आयुर्वेदानुसार, अन्नाचे योग्य प्रकारे पचन न झाल्यास शरीरात 'आम' (विषारी द्रव्ये) साचते. त्यामुळे गॅस, पोट फुगणे, सुस्ती व अपचन यांसारख्या समस्या उद्भवतात. सुकलेले आले म्हणजे सुंठ अन्नाचे पचन करताना त्याचे योग्य प्रकारे विघटन करून या समस्या कमी करते. तसेच ती चयापचय क्रिया सुधारते, ज्यामुळे पचनप्रक्रिया अधिक कार्यक्षम होते. परिणामी, पचनमार्गात न पचलेले अन्न साचण्यापासून रोखले जाते आणि पचनसंस्थेचे आरोग्य उत्तम राहते.

**कफ आणि वाताचे शमन**

आयुर्वेदात आल्याला नैसर्गिक 'वातहर' औषध मानले जाते. ते पोट फुगणे, गॅस आणि पोटाशी संबंधित इतर समस्यांपासून आराम देते. आल्यामध्ये 'उष्ण वीर्य' गुणधर्म असतो, ज्यामुळे पोटातील 'कफ' व 'वात' दोष कमी होण्यास मदत होते आणि जड अन्नाचेही व्यवस्थित पचन होण्यास साह्य मिळते. त्याव्यतिरिक्त सुंठ पावडरमिश्रित उकळलेले पाणी प्यायल्याने पोटाची सूज आणि वेदना कमी होण्यास मदत होते.

**रोगप्रतिकारक शक्ती वाढते**

आल्याचे सेवन केल्याने पोषक घटकांचे शोषण सुधारते. वास्तविक, आल्याचे दररोज मर्यादित आणि संतुलित प्रमाणात सेवन केल्यास, पचनक्रियेदरम्यान आतडी अन्नातील पोषक घटक अधिक प्रभावीपणे शोषून घेतात. त्यामुळे पोषक घटकांची जैव-उपलब्धता आणि चयापचय क्षमता वाढते, ज्यामुळे शरीरातील उतींपर्यंत अधिक प्रमाणात पोषक घटक पोहोचतात. ही प्रक्रिया शरीराची रोगप्रतिकारशक्ती बळकट करण्यास मदत करते.

**'वात' दोषाचे संतुलन**

आयुर्वेदानुसार, आल्याचे दररोज सेवन केल्याने 'वात' दोष संतुलित राहण्यास मदत होते आणि परिणामी शरीरातील दाह कमी होतो. त्यामुळे केवळ पचनाशी संबंधित समस्याच टाळल्या जात नाहीत, तर सांधेदुखी, शरीरातील ताठरपणा व सूज यांसारख्या समस्यांपासूनही आराम मिळतो. हे फायदे लक्षात घेतले, तर पचनसंस्था आणि संपूर्ण शरीरात यांच्या एकंदर कार्य प्रणालीमध्ये आरोग्यदायी समतोल राखण्यात आले किती महत्त्वाची भूमिका बजावते हे स्पष्ट होते.

# पुदीन्याचा चहा पिताय

पावसाळ्याच्या आगमनाने लोकांचे दैनंदिन जीवन बदलते. त्याचबरोबर दमटपणा, पाऊस व आर्द्रता यांमुळे पावसाळ्यात अनेक प्रकारच्या आजारांचा धोकाही वाढतो. पावसाळ्यात लोकांना सुस्ती आणि थकवादेखील जाणवतो. त्याचबरोबर जीवाणू आणि आर्द्रता यांमुळे संसर्ग, ?लर्जी आणि दमा यांसारख्या जुनाट आजारांचा धोकाही वाढू शकतो. अशा परिस्थितीत शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि आजार टाळण्यासाठी तुम्ही पुदिन्याचा चहा पिऊ शकता. पुदिन्याची पाने त्यांच्या सुगंध आणि चवीमुळे अनेकांना आवडतात. पावसाळ्यात स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी पुदिना तुम्हाला मदत करू शकतो.



भारतीय आहारात पुदिन्याला विशेष स्थान आहे. त्याचा ताजेतवाना करणारा सुगंध आणि चव यांमुळे चटणी, रायता, सलाड, ताक, लिंबूपाणी, पुलाव, तसेच विविध स्नॅक्समध्ये पुदिन्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. पुदिन्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि काही उपयुक्त वनस्पतीजन्य घटक आढळतात, जे पचनक्रियेला मदत करू शकतात. त्यामुळे उन्हाळ्यात शरीराला ताजेतवाने ठेवण्यासाठी आणि जेवणाची चव वाढवण्यासाठी भारतीय स्वयंपाकघरात पुदिना आवर्जून वापरला जातो. संतुलित आहाराचा भाग म्हणून ताज्या पुदिन्याचा योग्य त्या प्रमाणात समावेश करणे हा एक चांगला पर्याय ठरू शकतो.

**पुदिन्याचा चहा कसा बनवायचा?**

एका ग्लासभर पाण्यात मूठभर पुदिन्याची पाने घाला. मंद आचेवर १० मिनिटे शिजवा. चहा बनवताना तुम्ही त्यात ठेचलेले आलेदेखील घालू शकता. चहा पूर्णपणे तयार झाल्यावर गॅस बंद करा आणि पाच मिनिटे तो झाकून ठेवा.

त्यानंतर हा पुदिन्याचा चहा गाळून घ्या आणि एका कपात ओतून प्या.

पुदिन्याच्या पानांमध्ये अँटिऑक्सिडंट्स, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी आणि कॅल्शियम यांसारखी आवश्यक पोषक तत्त्वेदेखील असतात. ही पोषक तत्त्वे शरीराला आतून स्वच्छ करण्यास, पचनक्रिया सुधारण्यास आणि शक्ती देण्यास मदत करतात. पुदिन्याचा चहा प्यायल्याने शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.

पुदिन्यातील मेंथॉलमुळे घशाला थंडावा जाणवतो. त्यामुळे सर्दी, घसा खवखवणे किंवा नाक बंद झाल्यास गरम पुदिन्याचा चहा काही प्रमाणात आरामदायी वाटू शकतो; मात्र तो औषधांना पर्याय नाही.

पुदिन्याचा सुगंध मनाला ताजेतवाने करण्यास मदत करतो. थकवा किंवा दिवसभराच्या कामानंतर पुदिन्याचा गरम चहा घेतल्यास 'फ्रेश' वाटू शकते.

# घरबसल्या मिळावा पार्लरसारखा ग्लो

चेहऱ्याची काळजी घेण्यासाठी आपण नानाविध सौंदर्यप्रसाधनांचा वापर करतो. परंतु अनेकदा ही महागडी सौंदर्य प्रसाधने आपल्या चेहऱ्याला हानी पोहोचवतात. त्यामुळे काही उपचार घरच्या घरी करणे हा पर्याय सर्वात उत्तम. म्हणूनच घरगुती उपायांनी चेहऱ्याला अनोखी चमक द्यायची असल्यास, मध आणि हळद हा सर्वात उत्तम उपाय मानला जातो. त्वचेची काळजी घेण्यासाठी अनेकजण महागड्या उपचारांपेक्षा घरगुती उपायांना पसंती देतात.



मध, हळद आणि कच्चे दूध वापरून तयार केलेला फेसपॅक त्वचेला नैसर्गिक चमक देण्यास मदत करू शकतो. एका वाटीत एक चमचा मध घ्या. त्यात अर्धा चमचा हळद आणि आवश्यकतेनुसार कच्चे दूध घालून मिश्रण तयार करा. तेलकट त्वचा असल्यास त्यात मुलतानी माती आणि गुलाबपाणीही मिसळू शकता.

मध त्वचेला नैसर्गिक मॉइश्चरायझर आणि क्लिन्झरचे काम करतो.हळदीतील अँटीबॅक्टेरियल गुणधर्म त्वचा स्वच्छ ठेवण्यास मदत करतात.

कच्च्या दुधातील लॅक्टिक ॲसिड त्वचेवरील मृत पेशी दूर करून त्वचा उजळण्यास सहाय्य करते.

फेसपॅक थेट चेहऱ्यावर लावण्यापूर्वी कानामागे थोडासा लावून १० मिनिटे थांबा. कोणतीही खाज, लालसरपणा किंवा ॲलर्जी जाणवली नाही तरच चेहऱ्यावर वापरा. फेसपॅक चेहऱ्यावर १५ ते २० मिनिटे ठेवून नंतर थंड पाण्याने धुवा. त्यानंतर मॉइश्चरायझर आणि सनस्क्रीन लावणे विसरू नका. आठवड्यातून दोन ते तीन वेळा हा उपाय केल्यास त्वचा स्वच्छ, मऊ आणि उजळ दिसण्यास मदत होऊ शकते.

कोणताही फेसपॅक चेहऱ्यावर लावताना आधी पॅच टेस्ट करून बघणे हे गरजेचे आहे. ही पॅच टेस्ट केल्यानंतरच घरगुती उपाय करणे हितावह ठरते.

# बालपणाचा बदलता चेहरा

**ए**खाद्या समाजाचे भविष्य काय असेल, याचा अंदाज त्या समाजातील मुलांच्या बालपणाकडे पाहून येतो. कारण बालपण ही केवळ आयुष्यातील एक अवस्था नसते; ती व्यक्तिमत्त्व घडविण्याची, मूल्ये रुजविण्याची आणि संस्कारांची पेरणी करण्याची वेळ असते. बालपण बदलत आहे, हे वास्तव आहे; पण हा बदल विकासाच्या दिशेने आहे की संवेदनांच्या ऱ्हासाकडे याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. गेल्या काही वर्षांत भारतीय कुटुंबव्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. आई-वडील दोघेही नोकरी किंवा व्यवसायात व्यस्त आहेत. संयुक्त कुटुंबांची जागा विभक्त कुटुंबांनी घेतली आहे. मुलांसोबत वेळ घालवणारी आजी-आजोबांची पिढी अनेक घरांत उरलेली नाही. परिणामी, मुलांना गुंतवून ठेवण्यासाठी मोबाईल हा सर्वात सहज उपलब्ध पर्याय बनला आहे. डे-केअर, प्ले-स्कूल आणि ॲक्टिव्हिटी क्लासेस यांची



चलती वाढत आहे. ही या बदलत्या जीवनशैलीचीच परिणती आहे. या सगळ्यात मुलांच्या हातात आलेला स्मार्टफोन हा केवळ एक साधन

**वैष्णवी भोगले**

राहिलेला नाही; तो त्यांच्या बालविश्वाचा केंद्रबिंदू बनत चालला आहे.आज अनेक घरांमध्ये सकाळचा दिवस एकाच दृश्याने सुरू होतो. आई-वडील दोघेही कामावर जाण्याच्या तयारीत असतात. मुलाला शाळेत सोडायचे, स्वतः ऑफिसला वेळेत पोहोचणे, वाहतुकीचा ताणतणाव, वेळेची धावपळ या सगळ्यात मुलांना काही वेळ शांत बसवायचे असेल, तर सर्वात सोपा उपाय म्हणजे मोबाईल. मुलगा किंवा मुलगी क्षणात स्क्रीनमध्ये रमतात आणि घरात शांतता पसरते. ही शांतता मात्र वरवरची आहे. कारण त्या शांततेत हळूहळू कोवळ्या पिढीचा संवाद हरवत आहे.


आज दोन-तीन वर्षांचे मूल स्मार्टफोन इतक्या सहजपणे वापरते, की अनेकदा मोठ्यांनाही आश्चर्य वाटते.

# कृत्रिम त्वचेचा शोध

**विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय ने मानवी जीवनाचा ताबा घेतला असतानाच आता रोबोटिक्सच्या क्षेत्रात एक अत्यंत विस्मयकारक आणि क्रांतिकारी शोध लागला आहे. आजवरचे रोबोट्स हे केवळ पाहणे, ऐकणे किंवा दिलेल्या आज्ञेनुसार हालचाल करणे यापुरतेच मर्यादित होते.**

**वि**ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय ने मानवी जीवनाचा ताबा घेतला असतानाच आता रोबोटिक्सच्या क्षेत्रात एक अत्यंत विस्मयकारक आणि क्रांतिकारी शोध लागला आहे. आजवरचे रोबोट्स हे केवळ पाहणे, ऐकणे किंवा दिलेल्या आज्ञेनुसार हालचाल करणे यापुरतेच मर्यादित होते. मात्र आता त्यांना मानवासारखीच स्पर्शज्ञान आणि संवेदनशीलता देणारी प्रगत कृत्रिम त्वचा विकसित करण्यात शास्त्रज्ञांना यश आले आहे. दक्षिण कोरियातील सोल नॅशनल युनिव्हर्सिटीच्या (एादल्त् ैूदर्हेत् ळहग्नेगूब्) यांत्रिक अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक सुंग ह्वान को आणि त्यांच्या संशोधन पथकाने हे अभूतपूर्व तंत्रज्ञान जगासमोर आणले आहे. या नव्या शोधामुळे आता रोबोट्स केवळ वस्तू उचलणार नाहीत, तर मानवी त्वचेप्रमाणेच एकाच वेळी ती वस्तू गरम आहे की थंड आणि त्यावर किती दाबाने पकड ठेवायची आहे, हे अचूकपणे ओळखू शकणार आहेत.

भौतिक जगात वावरताना आणि मानवाशी संवाद साधताना रोबोट्सना स्पर्शाची जाणीव असणे अत्यंत आवश्यक मानले जाते, ज्याला तांत्रिक भाषेत फिजिकल एआय असे म्हटले जाते. मानवी त्वचा ही निसर्गाची एक अद्भुत रचना आहे, जी एकाच वेळी अनेक प्रकारच्या संवेदना मेंदूपर्यंत पोहोचवते. यापूर्वी रोबोट्सना तापमान आणि दाब कळावा यासाठी वेगवेगळ्या थरांचे किंवा अनेक प्रकारच्या सेन्सर्सचे क्लिष्ट जाळे एकत्र



जोडले जायचे. यामुळे रोबोट्सचे हात जड आणि जाड व्हायचे, तसेच त्यांची काम करण्याची गती कमालीची संथ असायची. हाच मोठा अडथळा दूर करण्यासाठी

**प्रसाद ताम्हणकर**

कोरियन शास्त्रज्ञांनी चांदी आणि कॉपर ऑक्साइडच्या अतिसूक्ष्म तारांचे एक विशेष जाळे तयार केले आहे. हे जाळे इतके पातळ आहे की, ते केवळ एकाच थरामध्ये सेकंदाला तब्बल १६ वेळा आपले मोड बदलू शकते. म्हणजेच एकाच सेकंदात हे तंत्रज्ञान १६ वेळा तापमान आणि दाबाची आलटून पालटून पडताळणी करते.

या अतिसूक्ष्म आणि अत्याधुनिक संरचनेमुळे या कृत्रिम त्वचेचा प्रतिसाद देण्याचा वेग मानवी डोळ्या च्या पापणी लवण्याच्या वेगापेक्षाही हजारो पटीने वेगवान आहे.

दाबाची जाणीव होण्यासाठी या सिस्टिमची गती मायक्रोसेकंद, तर तापमानासाठी मिलिसेकंद पातळीवर मोजली गेली आहे. शास्त्रज्ञांनी या कृत्रिम त्वचेचा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा मेळ घालून केलेल्या प्रयोगादरम्यान रोबोटने दैनंदिन वापरातील २० वेगवेगळ्या वस्तू मानवी हाताच्या अचूकतेने निव्वळ स्पर्शाने ओळखल्या. यामध्ये एखादी वस्तू हाताळताना ती किती मऊ किंवा कडक आहे, तसेच तिचे तापमान काय आहे, याचे पृथक्करण रोबोटच्या सिस्टिमने रिअल-टाईममध्ये केले. या संशोधनाचे जागतिक स्तरावर कौतुक होत असून विज्ञान जगतातील अत्यंत प्रतिष्ठित मानल्या जाणाऱ्या नेचर मटेरियल्स या नियतकालिकात या शोधनिबंधाला स्थान मिळाले आहे.

भविष्यात या तंत्रज्ञानाचा वापर प्रामुख्याने वैद्यकीय क्षेत्रात कृत्रिम अवयव बनवण्यासाठी मैलाचा दगड ठरेल. ज्या व्यक्तींनी अपघातात आपले हात किंवा पाय गमावले आहेत, त्यांना लावण्यात येणाऱ्या कृत्रिम हातांना जर या त्वचेचे आवरण दिले, तर त्यांना पुन्हा एकदा स्पर्शाचे सुख अनुभवता येऊ शकते.

# सरकती नदी

**आ**ख्खी नदीच्या नदी कशी 'सरकेल?' आणि समजा अशी नदी असलीच तर ती आहे कुठे? तिचं 'सरकणं' कसं काय समजतं? प्रश्न अनेक आहेत. त्याची उत्तरंही भौगोलिकदृष्टय़ा फार रंजक आहेत. परंतु ज्या परिसरातून वाहाते, त्यांच्यासाठी ती एक अनिश्चिततेची टांगती तलवारच आहे!



या नदीचं नाव कोसी तिच्या लहरी प्रवाहबदलामुळे ती ज्या बिहारमधून वाहते तिथे तिची ओळख बिहारचे अश्रू (टिअर्स किंवा सॉरॉ ऑफ बिहार) असं म्हटलं जातं. असं कोणतं 'दुःख' देते कोसी? एरवी आपल्याकडे नदीला मातेच्या स्वरूपात पाहिलं जातं. मग एखादी नदी त्रासाचं रूप कसं धारण करेल? महापूर आल्यानंतरची गोष्ट वेगळी. तो अतिवृष्टीचा परिणाम असतो. बाकी नद्या संथपणेच वाहात असतात. अनेक संस्कृती, शतकानुशतकं जोपासत असतात. कोसीचे 'पात्र' (प्रवाह) बदलण्यालाही ती स्वतः जबाबदार नाही. ज्या हिमालयात ती उगम पावते आणि तिबेट, नेपाळ असा प्रवास करत अखेरीस बिहारमध्ये गंगेला मिळते. या नदीचा जलसंचयाचा प्रदेश (कॅचमेन्ट एरिया) तिबेटचं पठार, हिमालयाचा उतार आणि शेवटी बिहारचं पठार सुमारे ७३० किलोमीटरचा आहे. तिबेटमध्ये, सागरसपाटीपासून २६००० फुटांवर उगमस्थान असलेल्या या नदीचा प्रवाह, दक्षिणेकडे हिमालयात असलेल्या हिमटेकड्यांमधून अवखळपणे, वेगाने खाली उतरतो. त्यातील दूध-कोसी भागात ३६ हिमखंड (ग्लेसिअर) येतात.

सागराच्या दिशेने सुसाट धावणाऱ्या कोसीला आठ छोटय़ा नद्या मिळतात. पूर्वी त्यातील सात ठाऊक असल्याने या संगमाला 'सप्तकोषी' असंही म्हटलं जातं. तिबेटपासून 'कोसी'ची नावं बदलत जातात. तामूर हे तिबेटी नाव. नंतर अरुण आणि सूर्य नावाने ती वाहते. पण या नदीला 'बिहारचे अश्रू' अशी विचित्र उपाधी का मिळाली? सुमारे २१००० चौरस किलोमीटर सिंचन क्षेत्र असलेली ही नदी, हिमालयातील खळाळत्या प्रवाहामुळे प्रचंड गाळ (सिल्ट) वाहून आणते. पुढे पठारावर तो गाळ साचत जातो आणि प्रवाहालाष्ठ अवरोध करतो. त्यावेळी 'प्रवाह' त्याचा उतार इतरत्र वळवतो आणि पुढची नदीच्या नदी सरकते! गेल्या काही शतकात कोसी या प्रकारे सुमारे १०० ते १२० किलोमीटर पश्चिमेला सरकली आहे. म्हणजे तत्कालीन प्रवाहाकाठची गावं आणि घाट ओस पडले असणार.

# भव्यदिव्य घोषणा



**म**हाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचे शुक्रवारी सूप वाजले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला भव्य-दिव्य घोषणांची आवड आहेच. त्यामुळे या अधिवेशनात देखील मुख्यमंत्री आणि त्यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना सरसकट दोन लाखांपर्यंतच्या कर्जमाफीपासून मुंबईसाठी १३ हजार कोटी रुपयांची पूरनियंत्रण योजना, समान नागरी संहिता तयार करण्यासाठी उच्चाधिकार समिति स्थापणे आणि मुंबईतील हजारो जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाला चालना देणाऱ्या कायदेविषयक बदलांपर्यंत अनेक मोठ्या निर्णयांच्या घोषणा केल्या. यातील प्रत्येक निर्णय स्वतंत्रपणे अत्यंत महत्त्वाचा आहेच. मात्र, यातील राजकीय मथितार्थ म्हणजे विरोधकांनी मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर मिसिंग लिंकपासून ते मुंबईची तुंबई असा कितीही टीकात्मक सूर आळवला तरीही अर्थव्यवस्था मंद गतीने पुढे सरकत असतानादेखील हे सरकार न डगमगता निर्णय घेत राहील, हे मुख्यमंत्र्यांनी जनमानसात रुजवणे हाच आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा विधानसभेच्या शेवटच्या आठवड्यात विरोधकांनी दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी केली. २०१९मध्ये जाहीर झालेल्या महात्मा फुले शेतकरी कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यास मंजुरी देतानाच नव्या योजनेची मर्यादा ५० हजार रुपयांवरून दोन लाखांपर्यंत वाढवली. अनेक सत्ताधारी आमदारांनी २०१९च्या योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही नव्या योजनेचा लाभ मिळावा, अशी मागणी केली होती, याकडे मुख्यमंत्र्यांनी डोळेझाक केली नाही. शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजनांवर सरकार ९५ हजार कोटी रुपये खर्च करत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

मुंबईतील पूरनियंत्रण योजनेच्या घोषणेची मात्र कितपत व कधी पूर्तता होईल, ते पाहावे लागेल. कारण १३ हजार कोटींच्या या योजनेची पूर्तता केंद्र सरकारच्या हातात आहे. अर्थात फडणवीस यांचे दिल्ली दरबारी असलेले वजन पाहता त्याबाबतीतही अडचणी जाणवणार नाहीत. मात्र, मुंबईतील खड्डे, साचणारे पाणी यावर तोडगे काढताना काही प्रतिबंधात्मक उपायांबाबतही सरकारने विचार करण्याची गरज आहे. एकाच वेळी मुंबईत सुरू असलेल्या पायाभूत सुविधा व इमारतींच्या पुनर्विकासाच्या बेसुमार कामांमुळे पावसाळ्यात येणारे पुराचे संकट गडद झाले आहे. या संकटाची व्याप्ती केवळ मुंबईपुरती वा एमएमआरपुरती न राहाता पुण्यासारख्या शहराचीही तीच अवस्था होऊ लागली आहे. त्यामुळे विकासाच्या नावाखाली आपण नक्की काय करतो आहोत, याचा सरकारने साकल्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

महाराष्ट्रासाठी समान नागरी संहिता तयार करण्यासाठी सेवानिवृत्त सर्वोच्च न्यायालय न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समिती स्थापन करण्याचेही जाहीर करण्यात आले. हिवाळी अधिवेशवनात हे विधेयक चर्चेसाठी विधिमंडळात ठेवण्यात येईल, असे सांगितले गेले. महाराष्ट्र हे भाजपशासित राज्यांमध्ये उत्तराखंडनंतर समान नागरी कायदा आणणारे दुसरे राज्य यामुळे ठरेल. या विधेयकावर मुस्लिम समाजातून टीका होण्याची शक्यता आहे. मात्र, बहुपत्नीत्वाची प्रथा बंद झाल्यास त्यातून मुस्लिम महिलांना दिलासाच मिळेल.



महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास कायद्यातील दुरुस्ती दोन्ही सभागृहांनी मंजूर केली. यामुळे म्हाडाला पागडी प्रणाली इमारतींना धोकादायक घोषित करण्याचा अधिकार पुन्हा मिळणार आहे. या दुरुस्तीमुळे दक्षिण मुंबईतील सुमारे १३,८०० इमारतींचा पुनर्विकास होण्याची शक्यता आहे. या इमारतींमध्ये सुमारे २० लाख रहिवासी राहतात.

धोकादायक इमारतींमध्ये जीव मुठीत घेऊन जगणाऱ्या इतक्या मोठ्या लोकसंख्येला या नव्या कायद्याने दिलासा मिळेल. या अधिवेशनाच्या पूर्वसंध्येलाच शिवसेना (उबाठा)तील सहा खासदार फुटले होते. त्याचे सावट अधिवेशनावर कायम राहील, असे वाटले होते. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या घोषणांनी ते सावट पार संपून गेले. विरोधकांमधील भास्कर जाधव, आदित्य ठाकरे, जयंत पाटील ही काही मोजकी नावे सोडता फारसा प्रभाव टाकणारेही कुणी दिसले नाही.

दुसरीकडे मंत्री व अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे या दोन्ही सभागृहांचा एक तास वाया गेला. मुख्यमंत्र्यांनी तंबी देऊनही मंत्र्यांची अधिवेशनाप्रति असलेली ही अनास्था हाच काय तो सरकारच्या दृष्टीने चिंतेचा विषय म्हणावा लागेल.

# एक मोबाईल, एक डेस्कटॉप आणि स्वतःची मेहनत...

**आ**ज 'वर्क फ्रॉम होम' किंवा 'वर्क फ्रॉम एनीव्हेअर' ही संकल्पना सर्वश्रुत झाली आहे. मात्र जगाला या पद्धतीची सवय होण्याच्या कित्येक वर्षांपूर्वी एका भारतीय महिलेने या संकल्पनेवर विश्वास ठेवत स्वतःचा व्यवसाय उभा केला होता. केवळ २५ हजार रुपयांच्या भांडवलावर घरातून सुरू झालेला तिचा हा प्रवास भांडवलाच्या हजारपट पोहोचला आहे. ही कहाणी आहे श्वेता जैन सन्याल यांची.

२००९ मध्ये त्यांनी कोलकाता येथून 'कनेक्शन्स' ही रिक्रूटमेंट कन्सल्टन्सी सुरू केली. सुरुवातीला ना मोठे कार्यालय, ना कर्मचारी, ना मोठी गुंतवणूक. फक्त एक डेस्कटॉप संगणक, एक मोबाईल फोन आणि स्वतःवर असलेला अढळ विश्वास. आज त्यांची कंपनी देशभरातील नामांकित एफएमसीजी, एफएमसीडी, उत्पादन उद्योग, बँकिंग, वित्तीय संस्था आणि नव्या युगातील स्टार्टअप्ससाठी वरिष्ठ आणि मध्यम स्तरावरील कर्मचाऱ्यांची भरती करते. कंपनीची उलाढाल काही कोटी रुपये इतकी झाली. श्वेताचा जन्म आणि शिक्षण झारखंडमधील हजारीबाग या छोट्याशा शहरात झाले. रांचीपासून सुमारे ९० किलोमीटर अंतरावर असलेल्या या शहरात ती एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढली. सेंट झेवियर्स स्कूलमधून बारावीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर तिने विनोबा भावे विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात बी. ए. आणि एम. ए. केले. लग्नानंतर नोकरी सांभाळत श्वेताने दूरस्थ शिक्षणाद्वारे एमबीए पूर्ण केले. शिक्षण आणि करिअर या दोन्ही गोष्टींमध्ये सातत्य ठेवण्याचा तिचा निर्धार पुढे तिच्या यशाचा पाया ठरला. २००४ मध्ये श्वेताचा विवाह मनुष्यबळ क्षेत्रातील व्यावसायिक ब्रंतिंद्र सन्याल यांच्याशी झाला. लग्नानंतर श्वेता मुंबईत स्थायिक झाली. सुरुवातीला तिने सिटीकॉर्पमध्ये कस्टमर केअर एक्झिक्युटिव्ह म्हणून काम केले. २००६ मध्ये तिने एका छोट्या एचआर आणि रिक्रूटमेंट कन्सल्टन्सीत काम सुरू केले. काही महिन्यांतच पतीच्या नोकरीमुळे



तिला हैदराबादला स्थलांतर करावे लागले. तिथे श्वेताने टाइम्स जॉब्समध्ये रिक्रूटर म्हणून काम केले. कर्मचाऱ्यांची निवड आणि भरती या क्षेत्रातील तिचा अनुभव इथे अधिक समृद्ध झाला. २००७ मध्ये पुन्हा कोलकाताला स्थलांतर झाले. तिथे तिने जागतिक दर्जाच्या रिक्रूटमेंट कंपनी असलेल्या अडेकोमध्ये काम करत उद्योगातील बारकावे जवळून अनुभवले.

२००८ मध्ये श्वेता यांनी नोकरीचा राजीनामा दिला. नोकरी करताना तिने अनेक कंपन्यांशी व्यावसायिक संबंध निर्माण केले होते. स्वतःची कंपनी सुरू करण्यापूर्वी तिने काही ग्राहकांशी चर्चा केली. जर मी उत्तम दर्जाचे उमेदवार उपलब्ध करून दिले, तर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवाल का? असा प्रश्न तिने विचारला. या प्रश्नाला व्यावसायिक कंपन्यांकडून सकारात्मक उत्तर मिळाले. २००९ मध्ये श्वेताने अवघ्या २५ हजार रुपयांत 'कनेक्शन्स'ची स्थापना केली. ही संपूर्ण रक्कम तिने 'नोकरी डॉट कॉम'च्या डेटाबेसचे सदस्यत्व घेण्यासाठी खर्च केली. सुरुवातीला श्वेताकडे स्वतःचे कार्यालय नव्हते. आपल्या बेडरूममधूनच तिने काम सुरू केले. एक डेस्कटॉप, एक मोबाईल आणि स्वतःची मेहनत एवढीच तिची संपत्ती होती. आज अनेक कंपन्या घरून काम करण्याची सुविधा देतात. पण श्वेताने ही कल्पना २००९ मध्येच स्वीकारली होती. तिच्या मते, प्रत्येक कामासाठी कार्यालयात बसणे आवश्यक नसते. याच विचारातून तिने घरातून काम करणाऱ्या महिलांचे नेटवर्क तयार करण्यास सुरुवात केली. विशेषतः अशा महिला, ज्यांना मुलांची किंवा कुटुंबाची जबाबदारी सांभाळत करिअर करायचे होते, त्यांच्यासाठी तिने लवचिक कामाची संधी निर्माण केली. कोरोनाच्या कित्येक वर्षांपूर्वीच तिने प्रत्यक्षात 'वर्क फ्रॉम एनीव्हेअर' मॉडेल यशस्वी करून दाखवले. आज श्वेताच्या कंपनीत ११ पूर्णवेळ कर्मचारी आणि १८ फ्रीलान्सर कार्यरत आहेत. ऑफिस नसल्यामुळे सुरुवातीच्या काळात अनेक ग्राहक साशंक होते. काही कंपन्यांनी तर काम देण्यापूर्वी श्वेताच्या कार्यालयाची पाहणी करण्याची अट घातली होती. मात्र, श्वेताने दर्जेदार सेवा आणि योग्य उमेदवार उपलब्ध करून देत ग्राहकांचा विश्वास जिंकला. कोका-कोला आणि इमर्सन या दोन कंपन्यांपासून सुरू झालेला प्रवास हळूहळू विस्तारत गेला. आज तिच्या ग्राहकांमध्ये अनेक मोठ्या भारतीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचा समावेश आहे. पहिल्या वर्षी कंपनीचा महसूल ५.७५ लाख रुपये होता. त्यानंतर दरवर्षी व्यवसाय वाढत गेला आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये कंपनीची उलाढाल २.५० कोटी रुपये झाली. आज तिची कंपनी पूर्णपणे नफा कमावणारी कंपनी आहे.

# पडताळणीचा जाच

**अ**नेक राज्यांतील मतदारयाद्या सखोल पडताळणी मोहिमेतील (एसआयआर) अनुभव जमेस धरून महाराष्ट्रातील प्रक्रियेत सुधारणा होण्याची अपेक्षा होती; मात्र राज्यात सध्या सुरू असलेल्या प्रक्रियेतही अनेक अडचणी उद्भवत आहेत. त्यामुळे वर्षानुवर्षे मतदान करीत असूनही 'आपण मतदार आहोत,' हे सिद्ध करताना हजारो नागरिकांना अनेक दिव्यांमधून जावे लागत आहे. विरोधी पक्षांचे या मोहिमेबाबत आक्षेप आहेतच.

यामागील राजकारण बाजूला ठेवले, तरी प्रक्रियेतील अडचणी दाखवून देणाऱ्यांना थेट मोडीत न काढता, नागरिकांच्या योग्य तक्रारी समजावून घेणे आणि त्यांचे निराकरण करून ही प्रक्रिया सुटसुटीत व पारदर्शक कशी होईल, हे पाहणे सद्यस्थितीत योग्य ठरेल.

वर्षानुवर्षे अद्ययावत न केलेल्या मतदारयाद्या 'शुद्ध' करण्याच्या उद्देशाने 'एसआयआर' मोहीम हाती घेण्यात आली. आजवर या मोहिमेअंतर्गत बिहारमधून ६५ लाख, पश्चिम बंगालमधून ९० लाख,



तमिळनाडूमधून ७४ लाख आणि गुजरातमधून ६८ लाख नावे वगळण्यात आली. आता महाराष्ट्रासह १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांममध्ये या मोहिमेचा तिसरा टप्पा राबविण्यात येत आहे. महाराष्ट्रात सध्या केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन अर्जांचे वाटप करीत असले, तरी त्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे अर्जांचे शंभर टक्के वितरण झालेले नाही; तसेच पावसाळ्याच्या काळात अनेक जण शेतीच्या कामांमुळे आणि हजारो जण पालखी सोहळ्यातही सहभागी झाल्याने घरी भेटलेले नसल्याचे आढळले आहे.

त्यातच नव्या मतदारांनाही यादीत नाव समाविष्ट करण्याच्या अर्ज क्र. ६च्या जोडीने 'एसआयआर' चे घोषणापत्रसुद्धा अनिवार्य केल्याची माहिती आयोगाकडून देण्यात आली आहे. त्यामुळे नवे मतदार ओळखणे आणि त्यांच्या नोंदी जुळवणे शक्य होईल आणि अर्जदारांच्या कागदपत्रांची संख्या कमी होईल, असा दावा आयोगाकडून करण्यात येत आहे. मात्र, 'एसआयआर' च्या नियमांनुसार एखाद्याच्या पालकांची नावे वगळली गेली, तर त्यांच्या पाल्यांना अर्थात नवमतदारांनाही त्याचा फटका बसणे अपरिहार्य आहे.